<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ११**
**ऑक्टोंबर २०२१**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा सोमवार,दि.१८/१०/२०२१ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता <u>हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.</u>

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**
**महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.**

**स्थायी समितीचे ठराव**

<u>विषय क्र.२६१</u>

संदर्भ –
१) मे.महाराष्ट्र शासन यांचेकडील जा.क्र. टीपीएस.–१८१७/१०९१/प्र.क्र.१८४/१७/नवि/–१३ दि.१७/१/२०१८ रोजीचे पत्र.
२) इकडील आ.क्र. ६६२५ दि.२३/३/२०१८ रोजीचे मे.संघवी इरेक्टर प्रा.लि. तर्फे श्री.अनिल संघवी यांचे पत्र
३) श्री.अनिल संघवी यांची दि.११/७/२०१७ रोजीची खरेदी सुचना (परचेस नोटीस)
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/९७ दि.३०/५/२०१८ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.६९६,दि.२४/७/२०१८
६) मनपा ठराव क्र.६६५,दि.२८/९/२०१८
७) मनपा ठराव क्र.९२१,दि.१४/१२/२०१८
८) मनपा ठराव क्र.१२१, दि.१८/६/२०१९
९) मनपा ठराव क्र.८६७, दि.२०/१/२०२०

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ संगमवाडी टी.पी.स्किम, अंतिम भूखंड क्र. ३३, येथील मिळकतीवरील मान्य विकास आराखडा सन २०१७ नुसार आरक्षण 'एम.पी.–१७ (Municipal Purpose)' ३०३२.११ चौ.मी. क्षेत्र आरक्षित असलेल्या मिळकतीची जागा भूसंपादन कायद्यान्वये अथवा एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ४९(७) अन्वये जागा ताब्यात घेणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३१८ दि.२१/९/२०२१ चा झाला आहे )**

<u>विषय क्र.२६२</u>

संदर्भ –
१) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचेकडील जा.क्र. पीएससीडीसीएल/प्रा.वि./९७३/२०१८–१९, दि.११/१२/२०१८ चे पत्र. आ.क्र. एल/३४८८ दि.१२/१२/२०१८
२) मा.सुनील कांबळे व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.१७/१२/२०१८ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १८४५ दि.१७/१२/२०१८
४) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९२६ दि.१७/१२/२०१८
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आकाशचिन्ह/९३२ दि.३१/१२/२०१८ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९८८ दि.२/१/२०१९
७) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४०९ दि.५/२/२०१९
८) मा.मारुती तुपे व मा.राजाभाऊ बराटे यांचे दि.१४/२/२०१९ ची उपसूचना
९) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४८० दि.१४/२/२०१९
१०) मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. २०/२/२०१९ चे फेरविचाराचे पत्र.

११) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१८,दि.२१/२/२०१९
१२) मनपा ठराव क्र.८७८, दि.२१/१/२०२०

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. २४८० दि.१४/२/२०१९ चा फेरविचार करण्यात आला.–

मा.महा.आयुक्त यांचे संदर्भांकित क्र. ५ चे विषयपत्र अवलोकन केले तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मा.स्थायी समिती दि. ५/२/२०१९ विषय क्र. २४०६ (विषय क्र. २४७७ दि.१२/२/२०१९) मा.महा.आयुक्त यांनी दिलेल्या फेरविचाराच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे समवेत समन्वय करुन संयुक्त निविदा प्रक्रिया राबविण्यास तसेच सदर निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यावर मा.स्थायी समितीकडे सदर प्रस्ताव दाखल करुन मान्यता घेण्यास व पुढील कार्यवाही पुणे महानगरपालिका व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांनी संयुक्तरित्या करण्यास तसेच मा.मुख्य सभा ठराव क्र. ९२६ दि.१७/१२/२०१८ चा निरस्त करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र.१८४५दि.१७/१२/२०१८चा निरस्त करण्यात येत आहे.
'मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी'

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २४८० दि.१४/२/२०१९ चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३१९, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२६३**

संदर्भ – १) जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,महसूल शाखा क्र.पमह/१२४०/९९ दि.१६/०८/१९९९ चे आदेश
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे पत्र आ.क्र.४०२६ दि.१०/७/२०१८
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/५८१ दि.८.१०.२०१८ चे पत्र.
४) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.३९१ दि.२५/१/२०१९
५) मा.सुनिल कांबळे व मा.मारुती तुपे यांची दि.२७/२/२०१९ ची उपसूचना
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६६९,दि.२७/२/२०१९
७) मनपा ठराव क्र.९१८, दि.१८/२/२०२०
८) मनपा ठराव क्र.१६५, दि.२१/१२/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

बालेवाडी स.नं.२६/१ अ पैकी ४ हे.१२ आर क्षेत्राचा वापर मल्टी मॉडेल ट्रान्झिट हबचा प्रकल्प उभारणेस मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळेल या भरवशावर सदर क्षेत्र मल्टीमॉडेल ट्रान्झिट हब उभारणेसाठी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांना हस्तांतरीत करण्यास तसेच ज्यांच्या जागा या प्रकल्पासाठी घेत आहोत त्या संबंधितांना पर्यायी जागा देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१७४, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र. २६४**

संदर्भ – १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४१७ दि.२८/१/२०१०
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आकाशचिन्ह परवाना/१३ दि.१६/४/२०१९ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.११८,दि.४/६/२०१९
४) मनपा ठराव क्र.८७७, दि.२१/१/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३ व ३७६ नुसार मशिनरी परमिट व साठा परवाना शुल्कामध्ये वाढ करणे व उक्त नियमाचे कक्षेत असलेले मात्र परवानगी न घेतलेले नविन व्यवसायांना शुल्क आकारणी करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्त्यात नमुद दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित दरवाढ मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतर येणाऱ्या चालू आर्थिक वर्षापासून लागू करणेस

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु असलेले, मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३ व ३७६ नुसार पुणे महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक असतानाही, परवानगी न घेतलेल्या सर्व व्यवसाय/उद्योगधंद्याना व्यवसायाचे शॉप ॲक्टचे दिनांकापासून जुन्या दराने व प्रस्तावित दरवाढ लागू झालेनंतर नविन दराने शुल्क आकारणी करणेस.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२०, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२६५**

संदर्भ – १) मा.हेमंत रासने व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि. ९/७/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७४,दि.९/७/२०१९
३) मनपा ठराव क्र.८७४, दि.२०/१/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.३६ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १८.सांस्कृतिक केंद्रे, पान क्र. १०४, अ.क्र.१, शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाटयगृह कलादालन बांधणे, स्मारके उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी एसजे १६), पान क्र. २६०, अ.क्र. ३१, शास्त्रीय संगीत, नृत्यकला, चित्रकला आदी कलांचे प्रदर्शन, कार्यशाळा, प्रशिक्षणासाठी पुणे मनपाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीत किंवा ५ झोन विभागांमध्ये सांस्कृतिक केंद्र उभारणे | १ कोटी | --- |
| नवीन सुचविलेली कामे | | |
| १) प्रभाग क्र.३६ ब, मध्ये शंकर महाराज मठाजवळ भक्त निवास बांधणे. | --- | ३० लाख |
| २) प्रभाग क्र.३६ ब, मध्ये इंदिरानगर येथील दळवी सांस्कृतिक भवन येथे बहुउद्येशीय हॉल बांधणे. | --- | १५ लाख |
| ३) प्रभाग क्र.३६ ब मधील चिंतामणराव देशमुख शाळेसमोर मिनी मार्केट विकसित करणे. | --- | ३० लाख |
| ४) प्रभाग क्र.३६ ब मध्ये अण्णाभाऊ साठे सभागृहामागील मोकळ्या जागेत बहुउद्देशीय संकुल उभारणे. | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२१, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२६६**

संदर्भ :- १) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.३७४,दि.२४/३/२००५
२) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.२५१,दि.२४/८/२०१५
३) मे.केंद्र शासन पथविक्रेता अधिनियम ( उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन ) २०१४
४) मा.शहरफेरीवाला समिती सभा दि.३०/०३/२०१५ रोजीच्या बैठकीतीचे इतिवृत्त.
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अतिक्रमण/११४,दि.२७/६/२०१९ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९६,दि.१६/७/२०१९

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेकडील अधिकृत फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र/परवाना वारस व्यक्तीस हस्तांतरण करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.३७४,दि.२४/३/२००५ निरस्त करणेस.

२) नोंदणीकृत पथविक्रेत्याचा मृत्यू झाल्यास अथवा त्यास कायमचे अपंगत्व आल्यास अथवा आजारी असल्यास त्याचे नावावरील नोंदणी प्रमाणपत्र/परवाना खालील प्राधान्यक्रमाने वारसाचे नावे वर्ग करणेस.

अ) पथविक्रेत्याचे पती अथवा पत्नी

ब) पथविक्रेत्यावर अवलंबून असलेली त्यांची मुले

३) पथविक्रेत्याच्या वारसाचे नावे नोंदणी प्रमाणपत्र/परवाना वर्ग करणेकरीता पथविक्रेता अधिनियम २०१४ चे तरतुदीनुसार मा.शहरफेरीवाला समितीच्या दि. ३०/०३/२०१५ रोजीच्या बैठकीत मान्य केलेले परवाना वर्ग शुल्क र.रू.१०००/- आकारणेस.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२९७, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.२६७</u>**

संदर्भ – १) मा.बंडु गायकवाड व मा.सौ.पुजा कोद्रे यांचे दि.१६/७/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५३७,दि.६/८/२०१९

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

दि.३१/७/२०१९ अखेर पुणे मनपा हद्दीतील गोठे स्थलांतराची मुदत संपुष्टात येत आहे तथापि गोठे धारक स्थलांतर होवू इच्छित असल्याने व काहीचे प्रिमीयम फी भरुन घ्यावयाची असल्याने दि.३१/१२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०४, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.२६८</u>**

संदर्भ – १) घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम २०१६

२) महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीमधून घ्यावयाची कामे मार्गदर्शक तत्वे नियम २००१

३) मा. स्थायी समिती मध्ये दि. २/१/२०१९ रोजी झालेली चर्चा

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्यव./१०३० दि.८/१/२०१९ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र. २१६६ दि. १६/१/२०१९

६) मा.पक्षनेते सभा दि.५/७/२०१९ रोजी झालेला निर्णय

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.५८६,दि.६/८/२०१९

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले तसेच पक्षनेते सभेची शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर वॉर्डस्तरीय निधीमधून व इतर वर्गीकरणांच्या निधीमधून एकाच प्रभागात खालीलप्रमाणे खरेदी करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) र.रुपये ५ (पाच) लाखापर्यंत बेंचेस खरेदी करणेस

२) र.रुपये ५ (पाच) लाखापर्यंत बकेट किंवा पिशव्या किंवा ढकलगाडी खरेदी करणेस

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०९, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय-२६९**

संदर्भ – १) मा.राजेंद्र शिळीमकर, मा.दिलिप वेडेपाटील, मा.दिपक पोटे, मा.महेंद्र पठारे व मा.विशाल धनवडे यांचे दि.६/८/२०१९ चे पत्र

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.६९१,दि.६/८/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेकडून अतिक्रमण निर्मुलन कारवाईत जप्त करण्यात आलेल्या हातगाडया जप्त करण्यात आल्यानंतर सध्या रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) दंड आकारुन हातगाडी सोडली जाते.

अनेकवेळा या हातगाडयांची व त्यावरील मालांची किमंत रुपये ५,०००/- पेक्षा कमी असते त्यामुळे अनेक हातगाडी चालक ते सोडवून घेण्यासाठी येत नाहीत. त्यामुळे सदर जप्त केलेल्या हातगाडया व त्यावरील माल सांभाळणे, त्याची साठवणूक करणे यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मालकीची बरीच जागा व्यापली जाते अनेक क्षेत्रिय कार्यालयात यामुळे जागा देखील शिल्लक नाही. तसेच ती उघड्यावर ठेवल्याने तो परिसर अस्वच्छ होणे, पाणी साठून डास निर्माण होणे यामुळे आरोग्यविघातक परिस्थिती निर्माण होते. त्या माल व हातगाडया सुरक्षित ठेवणे, त्याची नोंद ठेवणे, देखभाल करणे यावर बराच वेळेचा अपव्यय व खर्च होतो.

यावर उपाय म्हणून अतिक्रमण विभागाने जप्त केलेल्या हातगाडया सोडवण्यासाठी सध्या असलेला दंड रुपये५,०००/- हा कमी करुन तो रुपये १,०००/- इतका करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०५, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७०**

संदर्भ – १) मा.राजाभाऊ लायगुडे व मा.धनराज घोगरे यांचे दि.३१/७/२०१९ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४४ दि.३१/७/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.६९२,दि.६/८/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेचे स्व.मुरलीधर लायगुडे दवाखाना , राजयोग सोसायटी सिंहगड रोड, पुणे येथे गेल्या अनेक वर्षापासून बांधून तयार आहे. सध्या या ठिकाणी ५ मजले असून सुमारे २५००० स्वे. फुट बांधकाम असून केवळ तळ मजल्यावर बाहयरूग्ण विभाग कार्यरत आहे.

पुणे महानगरपालिकेचे सिंहगड रोड परिसरामध्ये कोणतेही मोठे रूग्णालय अस्तित्वात नाही.तेथील परिसरातील नागरिकांना खाजगी रूग्णालयावर अवलंबून रहावे लागते.स्व.मुरलीधर लायगुडे दवाखाना ही इमारत अनेक वर्षापासून विनावापर पडून आहे. सदर ठिकाणी शासकीय दरामध्ये आऊटसोर्सिंग पध्दतीने अद्ययावत रूग्णालय चालू केल्यास तेथील नागरिकांना त्याचा फायदा होईल. स्व.मुरलीधर लायगुडे दवाखाना प्रशासना मार्फत तातडीने आऊटसोर्सिंग पध्दतीने चालविण्यास देण्याची कार्यवाही करण्यास मान्यता द्यावी अशी शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०६, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७१**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/२१३ दि.८/८/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३७,दि.१९/८/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

धायरी फाटा येथील टँकर पाईंट वरील खाजगी टँकरचे दर निश्चितीबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सदर भागाची पाण्याची गरज व नागरीकांची मागणी पहाता, सदर र.रू.२००/- प्रति टँकर (रॉ वॉटर) खाजगी टँकर धारकांकडून भरून घेऊन, त्यांना धायरी येथील टँकर पाईंटवरून टँकर भरून देणेस.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०७, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७२**

संदर्भ – १) मा.राजेंद्र शिळीमकर, मा.श्रीमती रंजना टिळेकर, मा.महेंद्र पठारे, मा.प्रकाश ढोरे, मा.विशाल धनवडे व मा.दिपक पोटे यांचे दि.१९/८/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७७५,दि.१९/८/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे शहरात पथारी,हातगाडी व छोटे स्टॉलधारक तसेच मोठे स्टॉलधारक यांचे सध्या आकारण्यात येणारे भाडे वाजवी नसल्याने सदर भाडे भरण्यासाठी कोणीही तयार होत नाहीत तसेच हे भाडे अन्यायकारक असल्याने कमी करणेसाठी सर्व स्तरातुन मागणी होत आहे.पूर्वी छोटे स्टॉलधारक यांना मासिक भाडे र.रु.२०/- व मोठे स्टॉलधारक यांना र.रु.२०००/- एवढे होते.तरी पथारी,हातगाडी व छोटे स्टॉलधारक यांचे मासिक भाडे र.रु.१५००/- करण्यास व मोठे स्टॉलधारक यांचे मासिक भाडे र.रु.४०००/- करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०८, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७३**

संदर्भ- १) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४०८,दि.१२/२/२०१३

२) मा.मुख्य सभा ठराव क्र.६८८,दि.२०/२/२०१३

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य /४०७,दि.९/९/२०१९ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.११२९,दि. ९/९/२०१९

५) मनपा ठराव क्र.९१२,दि.२१/१/२०२०

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे महानगरपालिकेची प्रयोगशाळा भाडे तत्वावर चालविणेस देणेसाठी ( निविदा क्र.८३-२०१८) खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. पुणे मनपाची कोंढवा येथील प्रयोगशाळा SHINDE ASSOCIATES AND MULTISERVICES (प्रोपा. सागर अरूण शिंदे) यांना प्रतीमहा र.रू. २,५१,७८६/- याप्रमाणे १० वर्ष मुदतीसाठी करार पद्धतीने भाड्याने देण्यास व त्याकरीता करारनामा करण्यास.

२. SHINDE ASSOCIATES AND MULTISERVICES (प्रोपा. सागर अरूण शिंदे) यांचेकडून देण्यात येणा-या भाडे रक्कमेत दरवर्षी १०% वाढ करण्यास व त्यांचेकडून र.रू. ३०० लाखाची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी अनामत रक्कमेपोटी घेण्यास

३.ठेकेदार यांनी पुणे मनपाचे विविध विभागांकडील सॅम्पलची तपासणी मनपाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दरांप्रमाणे करण्यास.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२३, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७४**

संदर्भ - १)महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार,दि.६ मार्च २००८

२)शासन निर्णय क्र.नमाशा २००९/(४९७/९)माशि-१,दि.११/६/२००९

३)मा.महापालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका ठ.क्र.६/६१,दि.२१/४/२०१८

४)स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत जेईई (मेन)जेईई(ॲडव्हान्स)नीट चे वर्ग सुरु करणे संबंधी या कार्यालयाकडील जाहीर प्रकटन दि.२३/४/२०१८

५) मा.महा. आयुक्त यांचे जावक क्रं.मआ/ इओ/ १६६९, दिनांक .२०/३/२०१९ चे पत्र.

६) मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.५२ दि.११/९/२०१९

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२३१,दि.१६/९/२०१९

८) मनपा ठराव क्र.८९६, दि.२१/१/२०२०

विषय - पुणे महानगरपालिका माध्यमिक शाळांमधून शिकणा-या आर्थिक दृष्ट्या दुर्बल परंतु गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी आणि १२ वी शास्त्र शाखेचे (व्दिलक्षी अभ्यासक्रम) दर्जेदार व मोफत शिक्षण देणेबाबत.

---

मा.महिला व बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेवून-

महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार दि.६ मार्च २००८ पुणे महानगरपालिका मिळकत / जागा वाटप मान्य नियमावलीतील भाग-२ मधील क्र.७ चे १,२व ३ अन्वये खालील नमूद बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) जे मिळकत/जागा वाटप मान्य नियमावली भाग-९ क्र.१९ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या शाळांच्या इमारतीमधील काही वर्ग खोल्या शैक्षणिक वापरासाठी अन्य संस्थांना भाडेपट्टयाने द्यावयाचे झाल्यास त्या वर्ग खोल्या निविदा मागवूनच भाडेपट्ट्याने देण्यात येतील. या ऐवजी पात्र शैक्षणिक व सामाजिक संस्थांना महानगरपालिकेच्या शाळांच्या इमारतीमधील काही वर्ग खोल्या शैक्षणिक वापरासाठी भाडेपट्ट्याने न देता भाडेपट्ट्याच्या मोबदल्यात वर्गाच्या पटावरील एकूण विद्यार्थी संख्येच्या ५०% विद्यार्थी हे पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील ३०%विद्यार्थी आणि महानगरपालिका क्षेत्रातील अल्प उत्पन्न गटातील २०% विद्यार्थी अशा एकूण किमान ५०%विद्यार्थ्यांना दर वर्षी मोफत प्रवेश देण्याची अट,त्यांच्या बरोबर करण्यात येणाऱ्या करार नाम्यामध्ये समाविष्ठ करणेस.

२) पात्र शैक्षणिक व सामाजिक संस्थेबरोबर १० वर्षाच्या कालावधीसाठी करारनामा करणेस.
३) जाहीर प्रकटनाव्दारे क्र.८ पेस एज्यु.ट्रस्ट,मुंबई या संस्थेचा प्रस्ताव मान्य करणेस.
४)मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र. २ नुसार शासन निर्णयानुसार शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर जाहिर प्रकटनातील अटी व शर्ती विचारात घेऊन पुणे महानगरपालिका क्र.८ पेस एज्यु.ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने २०१९-२० या शैक्षणिक वर्षात कै.रामचंद्र(अप्पा) बनकर या महानगरपालिकेच्या शाळां इमारतीत व्दिलक्षी अभ्यासक्रमाने शास्त्र शाखेचे इयत्ता ११वी आणि १२वी चे कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस.
५)प्रकटनातील अटी व शर्तींची पूर्तता करणेसाठी पुणे महानगरपालिका आणि क्र.८ पेस एज्यु.ट्रस्ट,मुंबई यांच्यामध्ये स्वतंत्र करार करणेस.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२४, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७५**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था-४/६१५ दि.२४/९/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३५,दि.७/११/२०१९
३) मनपा ठराव क्र.५८९, दि.१९/११/२०१९
४) मनपा ठराव क्र.८८६, दि.२१/१/२०२०

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सन २०११ चे सुधारणेनुसार स्पष्टीकरणामध्ये- वेतनमान किंवा वेतन संरचना यांतील कोणतीही सुधारणा किंवा विशेष वेतन किंवा श्रेणी देण्याबाबत किंवा भत्यांतील सुधारणा (महागाई भत्ता वगळून) किंवा पदनामातील बदल हे पोट कलम (४) च्या प्रयोजनार्थ नवीन पदांची निर्मिती असल्याचे मानण्यात येईल. असे निर्देशित केले आहे.

अधिनियमातील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद तरतुदीनुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील 'कनिष्ठ अभियंता, वर्ग-३' या वर्गातील एकूण १० मंजूर पदांना मोटार सायकल भत्ता (पेट्रोल भत्ता) मे.शासन मान्यतेच्या दिनांकापासून अनुज्ञेय करणेस व तसा प्रस्ताव मे.राज्य शासनाचे मंजुरीस सादर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२५, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७६**

संदर्भ – १) भूसंपादन व व्यवस्थापन विभागाकडील पत्र जा.क्र. एलएएम/ओ/१९९५ दि.३०/११/२०१८
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./१३४० दि.११/२/२०१९ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५००,दि.१९/११/२०१९
४) मनपा ठराव क्र.८८७, दि.२१/१/२०२०

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे, पेठ बाणेर स.नं. १०४/१, १०५/३ येथील पी.एम.टी. -१ आरक्षण क्षेत्र ७११५.०० चौ.मी. व पार्किंग (पी-७) आरक्षण क्षेत्र ४०००.०० चौ.मी. या आरक्षित जागेकरिता जागामालक सौ.इंदिरा शेट्टी यांनी पुणे म.न.पा.स महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२६, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७७**

संदर्भ – १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे दि.३१/८/२०१८ चे निर्देश
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/१११ दि.२७/६/२०१९ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५०२,दि.१९/११/२०१९
४) मनपा ठराव क्र.८८९, दि.२१/१/२०२०

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागामार्फत ( घरपाडी विभागामार्फत ) अनधिकृत बांधकामावर करणेत येणाऱ्या कारवायांची बिले कारवाई धारकांना पाठविताना आकारणी करावयाचे दर खालील नमुद तक्ता ड मध्ये चौरस फुटांप्रमाणे निश्चित करणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

प्रस्तावित दर तक्ता ड (पुणे महानगरपालिका)

| अ.क्र. | तपशील वर्गवारीनुसार | पुणे मनपाने केलेल्या कारवाईचे अनुषंगाने काढलेला दर |
|---|---|---|
| १. | पत्रा शेड, झोपड्या, लेबर कॅम्प | १००/– चौ.फुट |
| २. | कच्चे बांधकाम | २००/– चौ.फुट |
| ३. | स्टील स्ट्रकचर, गर्डर, लोड बेरिंग बांधकाम | ३००/– चौ.फुट |
| ४. | धोकादायक इमारत | २००/– चौ.फुट |
| ५. | आर.सी.सी. बांधकाम | ४००/– चौ.फुट |

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२७ , दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७८**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शअ/१६६६ दि. १८/३/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५०४,दि.१९/११/२०१९
३) मनपा ठराव क्र.८९०, दि.२१/१/२०२०

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये सादर झालेली खरेदी सुचना व मे.महाराष्ट्र शासनाने कायम करणेत आलेली परचेस नोटीस पुणे मनपाकडे दाखल होत असतात. त्यामुळे कलम १२७ चे बाबत मुख्य सभा ठराव क्र. ३४ दि.२२/६/२००६ च्या धर्तीवर कलम ४९ अंतर्गत खरेदी सूचना बाबत परचेस नोटीसचे अनुषंगाने भू-संपादन कार्यवाही करणेसाठी खालील प्रमाणे कार्यप्रणाली अवलंबिणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीस आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यात विषयपत्र स्थायी समितीकडे सादर करणेस.

२) मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र सादर झाल्यापासून एक महिन्यात मा.स्थायी समितीने मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेस.

३) मा. स्थायी समितीने जर एक महिन्यात निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी सदरचा विषय मा.मुख्य सभेकडे पाठविणेस.

४) मा.मुख्य सभेने जर याबाबत दोन महिन्याच्या मुदतीत निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीसबाबत भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२८ दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२७९**

संदर्भ – १) ॲड्.एम.एम.धनगर यांनी सदर मिळकतीबाबत आरक्षित जागेकरिता पुणे म.न.पा.स दि.२०/४/२०१९ रोजी दिलेली परचेस नोटीस
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/२०६ दि.८/८/२०१९ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५०५,दि.१९/११/२०१९
४) मनपा ठराव क्र.८९१, दि.२१/१/२०२०

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ बालेवाडी स.नं. १७/५/५,१७/५/६ व १७/४/७ येथील प्ले ग्राउंड (पीजी-२) या आरक्षित जागेकरीता जागामालक श्री. बाबु हुलवंतराव मरलापल्ले , श्री. मंजुनाथ स्वामीराव मगनहल्ली व सौ. सरोज जवाहर पटेल यांनी पुणे म.न.पा स महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२९**

**दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२८०**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/माव्य/११२,दि.२७/६/२०१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १५५ दि.२३/८/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८२२,दि.२४/१२/२०१९
४) मनपा ठराव क्र.८६३, दि.२०/१/२०२०

-----

शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ बुधवार महात्मा फुले मंडई परिसरातील हुतात्मा बाबुगेनू (आर्यन) येथील वाहनतळ ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी फेर टेंडर काढण्यास मान्यता दयावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३० दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२८१**

संदर्भ – १) मा.स्थायी समिती ठ.क्र. १६४९ दि.४/१/२०१८
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९९६ दि.२९/१/२०१८
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शिवि(प्रा)/८५६ दि.१६/१२/२०१९ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८६८,दि.२४/१२/२०१९
५) मनपा ठराव क्र.८३७, दि.२०/१/२०२०

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे मनपाकडील शाळा विलिनीकरणासाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या यादीतील शाळांचे त्याच इमारतीमधील मूळ शाळेत तसेच शेजारच्या शाळेत विलिनीकरण करणेस,

२.अतिरिक्त ठरलेले २ मुख्याध्यापक,२२ प्राथमिक शिक्षक,६ बालवाडी शिक्षिका व ६ बालवाडी सेविका यांचे शाळेतील सेवाज्येष्ठतेने (शाळेत प्रथम आलेल्या) रिक्त पद असलेल्या इतर शाळेत बदलीने समायोजन करणेस,

३.विलिनीकरणानंतर शाळेची वेळ RTE नियमानुसार ठरविणेस,

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३१, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२८२**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/९०० दि. ३०/१२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९४१,दि.३१/१२/२०१९
३) मनपा ठराव क्र.८४८,दि.२०/१/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे –

सन 2018-19 चे अंदाजपत्रक 'अ' चे रक्कम रुपये 47,61,74,44,409 व अंदाजपत्रक 'क' चे रक्कम रुपये 11,08,25,55,591 असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रुपये 58,70,00,00,000 चे अंदाजपत्रकास मा.मुख्य सभेने मंजुरी दिली होती. हिशोबान्ती जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे असून सदरच्या जमा खर्चास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## अंदाजपत्रक 'अ'

जमा बाजू

| | | |
|---|---|---|
| 1 | दिनांक 1 एप्रिल, 2018 ची शिल्लक | 1,00,000 |
| 2 | सन 2018-19 मधील जमा | 36,08,46,72,767 |
| 3 | आरंभीच्या शिलकेसह जमा | 36,08,47,72,767 |

खर्च बाजू

| | | |
|---|---|---|
| 1 | सन 2018-19 मधील खर्च | 40,75,94,41,638 |
| 2 | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | 1,00,000 |
| 3 | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | 40,75,95,41,638 |
| 4 | वर्षात येणारी तूट | 4,67,47,68,871 |
| 5 | वॉर्डस्तरीय कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिल्याने ओढून घ्यावयाची रक्कम (2018-19 मधील अप्रत्यक्ष खर्च) | 12,09,17,693 |
| 6 | अंदाजपत्रकाची 'अ' ची सन 2018-19 ची एकूण तूट | 4,79,56,86,564 |

## अंदाजपत्रक 'क'

जमा बाजू

| | | |
|---|---|---|
| 1 | दिनांक 1 एप्रिल, 2018 ची शिल्लक | 1,00,000 |
| 2 | सन2018-19 मधील जमा | 7,82,57,61,170 |
| 3 | आरंभीच्या शिलकेसह जमा | 7,82,58,61,170 |

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| 1 | सन 2018-19 मधील खर्च | 12,23,49,00,124 |
| 2 | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | 1,00,000 |
| 3 | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | 12,23,50,00,124 |
| 4 | अंदाजपत्रकाची 'क' ची सन 2018-19 ची तूट | 4,40,91,38,954 |

| | | |
|---|---|---|
| 1 | अंदाजपत्रकाची 'अ' ची सन 2018-19 ची तूट | 4,79,56,86,564 |
| 2 | अंदाजपत्रकाची'क' चीसन2018-19 ची तूट | 4,40,91,38,954 |
| 3 | अंदाजपत्रकाची'अ' व'क' ची सन2018-19 ची तूट | 9,20,48,25,518 |

सन 2018-19 चे हिशोबामध्ये रक्कम रुपये 9,20,48,25,518 इतकी तूट येत आहे. तरी खालील निधीतून कामे पूर्ण होऊन शिल्लक असलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे तूट समायोजित करण्यात आलेली आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३२, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२८३**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त मान्यता ठराव क्र. ६/६१९ दि.२१/१२/२०१८

२) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे उद्यान कार्यालय आ.क्र. ५०६२, दि.३०/०९/२०१९ चे पत्र.

३) उद्यान विभाग कार्यालय पत्र जा.क्र. २५१३,दि.३१/०७/२०१९.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१०४८ दि.४/२/२०२० चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्र.२१६८,दि.४/२/२०२०

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ पर्वती स.नं. १२१,१२२ येथील फेज-३ मधील कलाग्रामचे कामाकरीता सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात CE26A336/SU-1314 या अर्थशिर्षकावर प्रभाग क्र. ३० पु.ल.देशपांडे उद्यान येथे कलाग्राम विषयक कामे करणे या कामासाठी उपलब्ध झालेली र.रू. २००.०० लक्ष तरतूद ही पुणे स्मार्ट सिटी डेव्हलमेंट कॉर्पोरेशन लि.पुणे यांना वर्ग करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३४६, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.२८४</u>**

संदर्भ – १.मा.मुख्य सभा ठराव क्र. ७६७ दि.१८/२/२०१४
२.इकडील जा.क्र.६८६२ दि.१०/०२/२०१६ चे पत्र
३. इकडील आ.क्र.१३४९१ दि.२१/०२/२०१९ चे पत्र
४. इकडील आ.क्र.२५१० दि.२६/०६/२०१९ चे पत्र
५.इकडील जा.क्र.३१५६ दि.२९/०७/२०१९ चे पत्र
६.इकडील जा.क्र.४०७९ दि.६/०८/२०१९ चे पत्र
७.मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/९७८,दि. १८/१/२०२० चे पत्र.
८. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६२ दि.१४/२/२०२०
९. मा.स्थायी समिती ठराव क्र.२२४१,दि.१७/२/२०२०

विषय– पुणे पेठ एरंडवणा, स.नं.३९/२/२ सी.स.नं.९४३ युगाय मंगल को–ऑप सोसायटीमधील ऑफिस गाळयांचा विनियोग करणा–या मा.सहा. जिल्हा निंबधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयास मुदतवाढ देणेबाबत

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेवून –

मा.सह.जिल्हा निबंधक वर्ग १, मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे मागणीनुसार सदर सहा गाळयांचे मुल्यांकन या विभागामार्फत करणेत आलेले असून ते इकडील जा.क्र.३३५४ दिनांक ०३/०८/२०१९ अन्वये मा. शहर अभियंता यांचे मान्यतेस सादर करणेत आलेले आहे. मा. शहर अभियंता यांच्या मान्यतेनुसार भाडे आकारणी करण्यात येणार आहे. सदर सहा गाळयांचे मासिक भाडे र.रू.४८,२९७/– इतके आहे. यामध्ये ३ वर्षाने १२% दरवाढ करण्यात येईल. तरी वरील बाबींचे अवलोकन होवून खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.सह.जिल्हा.निबंधक वर्ग १ मुद्रांक जिल्हाधिकारी, कार्यालय यांना देणेत आलेल्या गाळा क्र.१,२ व ३ हे दिनांक०१/०१/२०१८ आणि गाळा क्र.४ व ६ हे दिनांक ०१/१०/२०१८ पासून पुढील ५ वर्षाकरिता मुदतवाढ देणेस पश्चात मान्यता मिळणेस
२) गाळा क्र.५ हा मा.सह. जिल्हा निबंधक वर्ग १ मुद्रांक जिल्हाधिकारी, कार्यालय पुणे यांना मुख्य सभेच्या मान्यतेनंतर ५ वर्ष मुदतीकरिता हस्तांतरीत करणेस
३) मा.सह.जिल्हा निबंधक वर्ग १ मुद्रांक जिल्हाधिकारी, कार्यालयास शासकीय संस्था असल्याने अनामत रक्कम भरून घेणेस सुट देणेस
४) सदर गाळयांचे हस्तांतरण दस्त पूर्वीपासूनच्या कालावधीपासून १० वर्षे कालावधीकरिता नोंदणीकृत करणेस

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३५२, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.२८५</u>**

संदर्भ – १) क्रेडाई पुणे मेट्रो यांचे पत्र क्र.CREDAI-PM/18-19/162/१८-१९/१६२ दि.८/६/२०१८
२) बृहन्मुंबई महानगरपालिका परिपत्रक क्र. CHE/DP/14770/GEN दि.१७/९/२०१९
३) मा.अवरसचिव महाराष्ट्र शासन यांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता जा.क्र. टिपीबी–४३१९/प्र.क्र.१५६/२०१९/नवि–११ दि.१९/९/२०१९.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१३५ दि. १६/६/२०२० चे पत्र.
५) मा.सौ.मानसी देशपांडे व मा.दिपक पोटे यांची दि.११/८/२०२० ची उपसूचना
६) मा.महेंद्र पठारे व मा.अशोक कांबळे यांची दि.११/८/२०२० ची उपसूचना
७) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३७२ दि.११/८/२०२०
८) मा.सौ.वर्षा तापकीर, मा.राजेंद्र शिळीमकर व मा.महेंद्र पठारे यांचे दि.२५/८/२०२० चे पत्र.
९) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७३,दि.२५/८/२०२०
१०) मनपा ठराव क्र.४४, दि.२१/१२/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

विविध प्रकारच्या बांधकाम परवानगी अंतर्गत आकारण्यात येणारे विविध प्रिमियम/शुल्क टप्पेनिहाय भरणेची सवलत देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे महानगरपालिका अधिनियम मनपा/लोकसेवा/मआ/४५९/२०१५ दि.१५ जुलै २०१५ अन्वये येणारे प्रिमियम शुल्क र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास अशा सर्व प्रस्तावांना प्रिमियम (Fire Premium) सह ४०%, ३०% व ३०% असा भरणा १ ल्या, १२ व्या व २४ व्या महिन्यांत भरणेची सवलत देणेस

२) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १७.१, १७.३, १७.४, २४.१ व २४.१० अन्वये महानगरपालिकेकडे देय निवासी, व्यापारी, औद्योगिक व आय.टी.क्षेत्राच्या प्रिमियम एफ.एस.आय. ( F.S.I.) पोटी जमा होणाऱ्या मनपाच्या हिस्स्याचे देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

३) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १.४ नुसार डी.सी.पी.आर. २०१७ व डीसीआर वापरण्याच्या विकल्पास २०१७ मधील कलम १७.७, १८.२६ व विकास नियंत्रण नियमावली मधील कलम १५.४.२ अन्वये बाल्कनी, जीना, पॅसेज, डबल हाईट टेरेस इत्यादी मधील देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

४) दुसरा तीसरा किंवा चौथा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास १८% प्रतिवर्ष इतक्या दंडाची आकारणी करण्यास

५) शेवटचा हप्ता भरेपर्यंत एकुण बांधीव क्षेत्राच्या १०% अथवा सर्वात वरील एका मजल्याचा (यापैकी जास्तीत जास्त) पूर्णत्वाचा दाखला राखून ठेवण्यास

६) याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस

७) वरील प्रस्ताव मे.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस

८) विकसकांनी पूर्ण रक्कम एक रकमी भरणार असेल तर त्यांना १०% सवलत देणेस,

९) सदरचा प्रस्ताव मे.राज्य शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे. यास कालावधी लागणार असल्याने बांधकाम शुल्क टप्प्याटप्प्याने स्विकारण्याची कार्यवाही मा.मुख्य सभा व मे.राज्य शासनाची मान्यता मिळेल या भरवशावर म.न.पा. प्रशासनाने कार्यवाही करण्यास

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३७२ दि.११/८/२०२० चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१७५, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२८६</u>

संदर्भ –
१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्र.नमाशा२००९ / (४९७/०९) माशी–१,दि.११/६/२००९
२) मा.मुख्यसभा विषय क्र.६६८,ठ.क्र.६४०,दि.२६/९/२०१६
३) सहाय्य प्रशासकिय अधिकारी,प्राथमिक शिक्षण विभाग पुणे महानगरपालिका यांचे दि.२८/५/२०१९ चे पत्र
४) मा.महापालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका पुणे महानगरपालिका यांचा ठ.क्र .६/११०४ , दि.३/३/२०२० ने जाहिरात देणेस मान्यता
५) दैनिक वर्तमानपत्र लोकमत महाराष्ट्र टाईम्स मध्ये दि.५/३/२०२० आणि दि.८/५/२०२० रोजी दिलेली स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत शाळा सुरू करणेसाठी दिलेली जाहिरात
६) श्रीशैल मल्लिकार्जुन शिक्षण संस्था यांचे दि.२१/८/२०१९ दि.९/१/२०२० आणि दि.१५/१/२०२० चे पत्र.
७) श्री.ज्ञानसागर एजु.सोसायटी यांचे दि.८/६/२०२० चे पत्र.
८) आयटीच संस्थेचे दि.१५/१/२०१९ आणि दि.११/५/२०२० चा प्रस्ताव
९) श्रीविद्यापन शिक्षण प्रसारक मंडळ यांचा प्रस्ताव दि.२६/५/२०२० व दि.१२/६/२०२०
१०) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शि.वि.माध्य व तांत्रिक शिक्षण/१६८,दि.१५/७/२०२० चे पत्र.
११) मा.महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ३५ दि.७/८/२०२०
१२) मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सुनिल कांबळे, आमदार यांची दि. १५/९/२०२० ची उपसूचना
१३) मा.महेंद्र पठारे व मा.दिपक पोटे यांची दि.१५/९/२०२० ची उपसूचना
१४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९८,दि.१५/९/२०२०
१५) मनपा ठराव क्र.५६, दि.२१/१२/२०२०

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

शैक्षणिक वर्ष सन २०२०–२१ मध्ये नवीन माध्यमिक शाळा स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने सुरु करणे आणि सुरु असलेल्या काही शाळा अन्य स्वयंसेवी संस्थाना हस्तांतरीत करणेबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) खालील तक्ता अ मध्ये नमूद केल्यानुसार संबधित शाळांमधून सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत इ.९ वी व नैसर्गिक वाढीने पुढील वर्षी इ.१० वी चे वर्ग सुरु करणेस.

२) खालील तक्त अ मध्ये नमूद संबंधित संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या शाळेमधून पुणे महानगरपालिका आणि आयटीच संस्था यांचे संयुक्त विद्यमाने इ.९ वी व इ.१० वी चा वर्ग सुरु करणेस

३) खालील तक्ता ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्था बदल करणेस व बदल केलेल्या संस्थानी स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२०–२०२१ मध्ये इ.९ वी व इ.१० वी चा वर्ग सुरु करणेस.

४) पुणे मनपा शाळा क्र. 90G येथे इंग्रजी माध्यमाचा 8 वी चा वर्ग सुरु करणेस

**तक्ता अ (सुरु करावयाच्या नवीन माध्यमिक शाळा)**

| अ.क्र. | संस्थेच नाव | नविन शाळा | वर्ग | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | आयटीच संस्था | कै .केशवराव जेधे इंग्रजी माध्यमिक विद्यालय,गुरुवार पेठ | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी |

स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत संस्थेमार्फत सुरु असणाऱ्या शाळांच्या संस्थामध्ये बदल करावयाच्या माहितीचा तक्ता

**तक्ता ब (हस्तांतरीत शाळा)**

| अ.क्र. | संस्थेच नाव | नविन शाळा | वर्ग | माध्यम | पूर्वीच्या संस्थेच नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आयटीच संस्था | पंडित दीनदयाळ उपाध्याय इंग्रजी माध्यमिक शाळा | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी | श्रीशैल मल्लिकार्जुन एज्युकेशन ट्रस्ट |
| २ | श्रीविद्यापन शिक्षण प्रसारक मंडळ | १)लोकनेते यशवंतराव चव्हाण इंग्रजी माध्यमिक शाळा ,येरवडा<br>२)माता रमाबाई आंबेडकर इंग्रजी माध्यमिक शाळा चिखलवाडी<br>३)हैबतराव शिळीमकर शाळा | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी | |
| | | ४) कै .रामचंद्र(आप्पा)बनकर माध्यमिक विद्यालय हडपसर | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी | श्री.ज्ञानसागर एजु.सोसायटी |

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१७६, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२८७</u>

संदर्भ – १) क्रेडाई पुणे मेट्रो यांचे पत्र क्र. CREDAI-PM/18-19/162/१८–१९/१६२ दि.८/६/२०१८

२) बृहन्मुंबई महानगरपालिका परिपत्रक क्र. CHE/DP/14770/GEN दि.१७/९/२०१९

३) मा.अवरसचिव महाराष्ट्र शासन यांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता जा.क्र. टिपबी–४३१९/प्र.क्र.१५६/२०१९/नवि–११ दि.१९/९/२०१९.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१३५ दि. १६/६/२०२० चे पत्र.

५) मा.सौ.मानसी देशपांडे व मा.दिपक पोटे यांची दि.११/८/२०२० ची उपसूचना

६) मा.महेंद्र पठारे व मा.अशोक कांबळे यांची दि.११/८/२०२० ची उपसूचना

७) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३७२ दि.११/८/२०२०

८) मा.सौ.वर्षा तापकीर, मा.राजेंद्र शिळीमकर व मा.महेंद्र पठारे यांचे दि.२५/८/२०२० चे पत्र.

९) मा.स्थायी समिती ठराव क्र. ४७३ दि. २५/८/२०२०

१०) मा.सुनिल कांबळे, आमदार व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.१५/९/२०२० चे फेरविचाराचे पत्र.

११) मा.स्थायी समिती ठराव क्र.५३२,दि.१५/९/२०२०

१२) मनपा ठराव क्र.६१, दि.२१/१२/२०२०

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४७३ दि. २५/८/२०२० चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या

चर्चेस अनुसरुन –

विविध प्रकारच्या बांधकाम परवानगी अंतर्गत आकारण्यात येणारे विविध प्रिमियम/शुल्क टप्पेनिहाय भरणेची सवलत देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे महानगरपालिका अधिनियम मनपा/लोकसेवा/मआ/४५९/२०१५ दि.१५ जुलै २०१५ अन्वये येणारे प्रिमियम शुल्क र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास अशा सर्व प्रस्तावांना प्रिमियम (Fire Premium) सह ४०%, ३०% व ३०% असा भरणा १ ल्या, १२ व्या व २४ व्या महिन्यांत भरणेची सवलत देणेस

२) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १७.१, १७.३, १७.४, २४.१ व २४.१० अन्वये महानगरपालिकेकडे देय निवासी, व्यापारी, औद्योगिक व आय.टी.क्षेत्राच्या प्रिमियम एफ.एस.आय. (F.S.I.) पोटी जमा होणाऱ्या मनपाच्या हिस्स्याचे देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

३) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १.४ नुसार डी.सी.पी.आर. २०१७ व डीसीआर वापरण्याच्या विकल्पास २०१७ मधील कलम १७.७, १८.२६ व विकास नियंत्रण नियमावली मधील कलम १५.४.२ अन्वये बाल्कनी, जीना, पॅसेज, डबल हाईट टेरेस इत्यादी मधील देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

४) दुसरा तीसरा किंवा चौथा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास १८% प्रतिवर्ष इतक्या दंडाची आकारणी करण्यास

५) शेवटचा हप्ता भरेपर्यंत एकुण बांधीव क्षेत्राच्या १०% अथवा सर्वात वरील एका मजल्याचा (यापैकी जास्तीत जास्त) पूर्णत्वाचा दाखला राखून ठेवण्यास

६) याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस

७) वरील प्रस्ताव मे.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस

८) विकसकांनी पूर्ण रक्कम एक रकमी भरणार असेल तर त्यांना १०% सवलत देणेस,

९) पुणे महापालिकेच्या हिस्स्यामधील बांधकाम शुल्क/प्रिमियम टप्पेनिहाय सवलत देण्यास मा.मुख्य सभेची मान्यता मिळेल या भरवशावर मनपा प्रशासनाने कार्यवाही करण्यास

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ४७३ दि. २५/८/२०२० चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१७७,दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२८८</u>

संदर्भ – १)मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य/१२२५,दि.१६/३/२०२० चे पत्र.
२)मा.धनराज घोगरे व मा.आनंद रिठे यांची दि.२६/६/२०२० ची उपसूचना
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२६,दि.२६/६/२०२०
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७७,दि.६/१०/२०२०
५) मनपा ठराव क्र.१७ दि.२१/१२/२०२०

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महापालिकेमार्फत बांधणेत आलेल्या बहुउद्देशिय हॉलच्या (मल्टीपर्पज हॉल) विनियोगाबाबतचे खाली नमूद केलेल्या धोरणास (पॉलिसी) मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

**पुणे महानगरपालिका**

बहुउद्देशिय हॉल (मल्टीपर्पज हॉल) वापरावयाच्या अटी शर्ती

बहुउद्देशिय हॉलच्या (मल्टीपर्पज हॉल) विनियोगाबाबतच्या अटी /शर्ती .मा.उपआयुक्त,सांस्कृतिक केंद्रे यांच्या नियंत्रणाखाली असतील .त्याबाबतची अंमलबजावणी मा.उप आयुक्त ,सांस्कृतिक केंद्र यांनी करावयाची आहे तसेच अटी/शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल/वाढ/रद्द करणे बाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना राहतील. अटी/शर्ती बाबत वाद निर्माण झाल्यास मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

**परिशिष्ट ''अ'' – उपलब्धता (वापर)**

१.१. पुणे महापालिकेमार्फत बांधणेत आलेले बहुउद्देशीय हॉल हे नाटयप्रयोग,सांस्कृतिक कार्यक्रम/ जादूचे प्रयोग/परिषद/स्नेहसंमेलन/करमणूकीचे कार्यक्रम,रंगीत तालीम, मेळावे,वाढदिवस, बारशे, लग्न समारंभ, मुंज, साखरपुडा,रिसेप्शन,सभा व अनुषंगिक कार्यक्रमांसाठी नियमानुसार भाडे भरून उपलब्ध करून देणेत येतील

१.२.सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कोणकोणत्या कार्यक्रमांचा समावेश असेल या संबंधीत अंतिम निर्णय मा.उपआयुक्त, सांस्कृतिक केंद्र यांचा राहील.

१.३. व्यक्ती, नाटककार , संस्था, वाद्यवृंद समुह, नोंदणीकृत सेवाभावी संस्था, प्रतिष्ठान, क्लब, मंडळ, सार्वजनिक/सांस्कृतिक संस्था इत्यादींना बहुउद्देशीय हॉल कार्यक्रमासाठी योग्य ते शुल्क आकारून उपलब्ध करून देणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्र यांना राहतील.

१.४. बहुउद्देशीय हॉल दररोज सकाळी ८.०० ते ३.००. दु.३.०० ते १०.०० या काळात उपलब्ध राहील. तसेच संपूर्ण दिवसाकरिता सुद्धा उपलब्ध करून देण्यात येईल.

## परिशिष्ट ‘‘ब’’ – आरक्षण

**२.१** बहुउद्देशीय हॉलच्या मागणीच्या लेखी अर्ज केल्यावर अर्जदारास तारखा देणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.उप आयुक्त,सांस्कृतिक केंद्रे यांना राहतील.

२.२ जी संस्था अथवा अर्जदार सर्वप्रथम मागणी करेल, अशा संस्था अथवा अर्जदार यांना प्राधान्य देणेत येईल.यासाठी कोणाचीही शिफारस अथवा वाढीव फी विचारात घेतली जाणार नाही.

२.३.शासकीय,निमशासकीय व पुणे मनपाच्या आकस्मित कार्यक्रमासाठी पूर्वीचा आरक्षित कार्यक्रम रद्द केला गेल्यास सदर ,संस्थेस अर्जदारास २४ तास अगोदर याबाबत अवगत करणेत येवून जमा केलेली सर्व रक्कम परत करणेत येईल.

**२.४** कार्यक्रमाच्या आरक्षणासाठी मा.उपआयुक्त,सांस्कृतिक केंद्रे या नावाने किमान १५ दिवस अगोदर लेखी अर्ज केला पाहिजे.अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे गरजेचे आहे.

२.५ बहुउद्देशीय हॉलचे शुल्क, अनामत रक्कम व इतर कर कार्यक्रमापूर्वी पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक केंद्रे विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. त्याखेरीज कार्यक्रमास बहुउद्देशीय हॉल उपलब्ध करून देणेत येणार नाही.

२.६. संपूर्ण भाडे व अनामत रक्कम भरल्याशिवाय आरक्षण मान्य झाल्याचे गृहीत धरता येणार नाही.

२ .७.जादा जागा, वीज इत्यादी वापरासाठी मान्य दराने अलाहिदा शुल्काची आकारणी केली जाईल.

२.८. अर्जदाराकडून ठरवून दिलेल्या नियमाचा भंग झाल्यास पुढील वर्षी हॉल उपलब्ध करून दिला जाणार नाही. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल तसेच तीन वर्षे भंग केल्यास त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल.

२.९. आरक्षण मागणी अर्ज नाकारणे, आरक्षण रद्द करणे, तसेच अर्जामध्ये दिलेली माहिती खोटी आहे असे सिध्द झाल्यास मान्य आरक्षण रद्द करण्याचे अधिकार मा.उपआयुक्तसांस्कृतिक केंद्रे यांना राहील.

**२.१०** अर्जदारास पुढील वाढीव सत्राची आवश्यकता असेल, त्यासाठी अन्य मागणी नसल्यास पुढील संपूर्ण सत्राचे भाडे शुल्क आदा करावे लागेल. त्यासाठी संपूर्ण दिवसाच्या भाड्याची सवलत मिळणार नाही.

**<u>आरक्षित तारखेस कार्यक्रम होऊ शकत नसल्यास</u>**

३.१.अपरिहार्य कारणास्तव आरक्षित तारखेस कार्यक्रम होऊ शकत नसल्यास, अर्जदार/संस्था यांनी आरक्षित तारखेपूर्वी कामकाजाच्या ०५ दिवस कार्यालयीन कालावधीत लेखी पत्राने सूचित करणे बंधनकारक राहील. तदनंतर अर्ज प्राप्त झाल्यास जागेचे शुल्क व अनामत रक्कम ५०% कापून परत करण्यात येईल.

३ .२.आरक्षण शुल्क जमा न केल्यास ,तसेच मान्य मुदतीपेक्षा जादा वापर केल्यास व त्यामुळे बहुउद्देशीय हॉलचा वापर पुढील कार्यक्रमासाठी न झाल्यास होणारे नुकसान भाडे आकारून अथवा अनामत रकमेतून वजावट करण्यात येईल.

## परिशिष्ट ‘‘क’’

**<u>अनामत, शुल्क व परतावा</u>**

४.१ अनामत रक्कम भाड्याच्या ५०% इतकी राहील. तसेच र.रू.१०००/- इतके सफाई शुल्क वेगळे आकारणेत येईल.

४.२ बहुउद्देशीय हॉलचा ताबा घेताना भाड्याचे शुल्क व अनामत रक्कम भरणा केलेची पावती दाखविणे आवश्यक आहे. अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा अन्य फायदे देय असणार नाही.

४.३ अर्जदाराच्या लेखी विनंतीनुसार अनामत रक्कम पुढील आरक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल

४.४ कार्यक्रमानंतर अर्जदाराच्या अधिकृत लेखी अर्जानुसार अनामत रक्कम संबंधितास परत करता येईल.त्यासाठी अर्जासोबत अनामत रक्कम भरणा केलेची मूळ पावती जोडणे आवश्यक आहे.

४.५ नुकसान भरपाई, जादा आकारणी शुल्क व इतर येणे जमा न झाल्यास अशा रक्कमेची अनामत रक्कमेतून वजावट करण्यात येईल.

४.६ मा.राष्ट्रपती,मा.पंतप्रधान,मा.मुख्यमंत्री,मा.पालकमंत्री,मा.महापौर यांच्या तसेच नैसर्गिक आपत्ती, मतदानासारख्या अत्यावश्यक कार्यक्रमासाठी बहुउद्देशीय हॉलला प्राधान्य देणेत येतील. अर्जदारास याबाबत अवगत करणेत येवून जमा केलेली सर्व रक्कम परत करणेत येईल.

## <u>परिशिष्ट ''इ ''– इतर</u>

१) कार्यक्रमाचे जाहिरातीचे फलक आरक्षित दिनांकापूर्वी ४ दिवस अगोदर बहुउद्देशीय हॉलच्या आवारात ठरवून दिलेल्या जागी प्रदर्शित करता येतील

२) सेमिनार, संमेलन, प्रवचने, नाटय इत्यादी तत्सम कार्यक्रमांसाठी माईक, स्पीकर, साऊंड मिक्सर सह ध्वनी व्यवस्था व लाईट व्यवस्था संबंधीतांस करावी लागेल. सामान नेणे, आणणे, त्यांची सुरक्षितता त्याची जबाबदारी पुणे महापालिकेची असणार नाही.

३) उपलब्ध वीजभारापेक्षा अधिक जादा वीजभार कार्यक्रमासाठी आवश्यकता असल्यास सदर संस्थेने स्वखर्चाने त्या क्षमतेचा जनरेटर आणून वापर करणे बंधनकारक राहील.

४) मोठया कालावधीसाठी वीज पुरवठा व जनरेटर व्यवस्था खंडीत झाल्यामुळे कार्यक्रम होऊ शकला नाही व त्यामुळे संबंधिताना बहुउद्देशीय हॉलचा वापर करता येणे न शकल्यास त्यांना भाडे परताना केले जाणार नाही.

५) संस्थेस स्वतःचे लाईट सामान वापरण्याची सवलत आहे. त्याची सुरक्षितता (जबाबदारी) पुणे महापालिकेची असणार नाही. कार्यक्रमाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग, टेप रेकॉर्डिंग मा.उपआयुक्त ,सांस्कृतिक केंद्र यांचे पूर्वपरवानगीने करता येईल. संस्थेस स्वतःची स्टेज प्रॉपर्टी वापरण्याची सवलत राहील. तथापि सामान नेणे, आणणे, त्यांची सुरक्षितता त्याची जबाबदारी त्यांचेवर राहील.

६) कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य सतरंजी, समई, इलेक्ट्रिक फॅन, तांब्या भांडे इत्यादी सह इतर आवश्यक साहित्य संबंधीताने स्वखर्चाने स्वतःचे जबाबदारीवर आणावयाचे आहे. हे साहित्य मनपाकडून उपलब्ध करून दिले जाणार नाही.

७) बहुउद्देशीय हॉलच्या परिसरात धुम्रपान, मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे. या नियमाचा भंग झाल्यास प्रसंगी चालू असलेले कार्यक्रम बंद करून त्यांचेवर रितसर कारवाई करणेत येईल. या गैरवर्तनाबद्दल संबंधीत संस्था, कलाकार, व्यक्ती यांना पुढील कार्यक्रमासाठी उपलब्ध करून दिले जाणार नाही व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

८) बहुउद्देशीय हॉलमधील कार्यक्रमाच्या व्यवस्थेसाठी अर्जदाराने व्यक्तीची अगर संस्थेची नेमणूक केली असेल तर त्याची माहिती पुणे मनपास उपलब्ध करावी.

९) बहुउद्देशीय हॉलमध्ये व परिसरात अन्न शिजविणेस कोणासही परवानगी दिली जाणार नाही.

१०) वाद्यवृंद समुह, लोकनाटय, लावणी, पत्रकार परिषद वा अन्य कार्यक्रमाच्या वेळी प्रेक्षागृहात गडबड गोंधळ होऊ नये यासाठी संबंधीत व्यक्ती अथवा अर्जदार संस्था यांनी पोलीस मदतीची/ सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करणे आवश्यक आह.

११) रात्री १० नंतर ध्वनीवर्धक.लाऊडस्पीकर वापरण्यास बंदी असेल,ध्वनीक्षेपक ,

१२) तिकिट विक्री (बुकींगसाठी) काऊंटर कार्यक्रमाचे दिवस धरून ४ दिवस अगोदर वापरता येईल.

१३) प्रवेशद्वाराचे कमानीवरील जाहिरातीस आकाश चिन्ह विभागाची परवानगी व शुल्क भरणे आवश्यक आह.

१४) मुख्य प्रवेशद्वाराजवळ वाहतूक कोंडी होऊ नये याची खबरदारी संबंधित अर्जदाराकडून घेण्यात यावी.

१५) इमारतीस तसेच रंगमंच इत्यादींच भिंतीस ,फर्निचरला खिळे ठोकणे यास मनाई आहे.

१६) बहुउद्देशीय हॉलचा वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस इजा झाल्यास अगर कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यांचे नुकसान झाल्यास, त्याची तोषीस पुणे महापालिकेस असणार नाही.

१७) बहुउद्देशीय हॉलची देखरेख करणाऱ्या म.न.पा. सेवकास बक्षिस (टिप)देण्यात येऊ नये.

१८) बहुउद्देशीय हॉल पूर्वतयारीसाठी कार्यक्रमापूर्वी एक तास अगोदर ताब्यात देण्यात येईल व कार्यक्रम झाल्यानंतर अर्ध्यातासामध्ये संबंधितानी सदरचा हॉल स्वच्छ व पूर्ववत करून पुणे मनपाच्या ताब्यात देणे अनिवार्य आहे.

१९) अर्जदाराने कार्यक्रमाचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे.

२०) इमारत, फर्निचर, खुर्च्या, फीटींग्ज, वीजेची उपकरणे अगर अन्य साधनसामुग्री यांची मोडतोड झाल्यास संबंधीतांकडून जरूर ती भरपाई वसूल केली जाईल. अशी नुकसान भरपाई भरण्यास कुचराई केल्यास सदर रक्कम अनामत रकमेतून वसूल केली जाईल व संबंधीतांना बहुउद्देशीय हॉल उपलब्ध करून देता येणार नाही.

२१) आवश्यक असलेले सर्व परवाने अर्जासोबत अथवा कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी पुणे मनपास सादर करावेत. तसेच शुल्क व अनामत रक्कम जप्त करून .सदर हॉल उपलब्ध करून देण्यात येणार नाही सादर न केल्यास .घेण्यात येईल

२२) बहुउद्देशीय हॉलच्या वापरासाठी अर्ज नाकारणे, आरक्षण रद्द करणे, तसेच अटी/शर्तीचा भंग केल्यास व अर्जात खोटी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास दिलेले आरक्षण रद्द करण्याचा अधिकार मा.उप आयुक्तसांस्कृतिक केंद्र , यांना राहील.

२३) बहुउद्देशीय हॉल रात्री १० ००.ते सकाळी ८००. वाजेपर्यंत बंद करण्यात येईल. या बाबत प्रशासन अधिकारी यांच्याशी वाद घालू नये.

२४) बहुउद्देशीय हॉलच्या आवरात मा.उप आयुक्तसांस्कृतिक केंद्रे, यांच्या परवानगी शिवाय कोणतेही सामान ठेवण्यात येऊ नये अथवा परिसर अस्वच्छ करू नये.

२५) शनिवार व रविवार या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात येईल.

**<u>परिशिष्ट ""ई"शुल्क आकारणी</u>**

**<u>प्रस्तावित</u>**

**<u>संदर्भ क्र.२ च्या उपसूचना प्रमाणे-</u>**

पुणे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या बहुउद्देशिय हॉलच्या विनियोगाकरिता नाट्यप्रयोग,सांस्कृतिक कार्यक्रम,जादूचेप्रयोग,परिषद,स्नेहसंमेलन,करमणुकीचेकार्यक्रम,रंगीत तालीम,मेळावे,वाढदिवस,बारसे,लग्न,मुंज, साखरपुडा,रिसेप्शन,सभा व अनुषंगिक कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यास.

| **अ.क्र.** | **बहुउद्देशिय हॉलचे क्षेत्रफळ** | **प्रतिसत्र शुल्क** | **संपूर्ण दिवस शुल्क** |
|---|---|---|---|
| १ | १०० चौ.मी.पर्यत | र.रु.३०००/- | र.रु.५०००/- |
| २ | २०० चौ.मी.पर्यत | र.रु.४५००/- | र.रु.८०००/- |
| ३ | ३०० चौ.मी.पर्यत | र.रु.६०००/- | र.रु.१०,०००/- |
| ४ | ४०० चौ.मी.पर्यत | र.रु.८५००/- | र.रु.१२०००/- |
| ५ | ४०१ चौ.मी.पर्यत | र.रु.१०५००/- | र.रु.१५०००/- |

उपरोक्त नमूद क्षेत्राच्या बहुउद्देशिय हॉलचा वापर विषयपत्रामध्ये नमूद कारणाव्यतिरीक्त ३ दिवसांपेक्षा जास्त कालावधीपेक्षा मागणी केल्यास मूल्यांकनानूसार येणारे भाडे आकारणी करून निविदा पध्दतीने वाटप करणेस.

**टीप-:**

१) बहुउद्देशिय हॉलमध्ये पार्किंग सुविधा उपलब्ध असेल तर र.रू.१,०००/- इतके ज्यादा शुल्क आकारण्यास.

२) सफाई शुल्क म्हणून र.रू.१,०००/- इतके शुल्क आकारावे

३) वरील शुल्का व्यतिरिक्त ५०% रक्कम अनामत तसेच नियमनुसार जी.एस.टी.रक्कम आकारण्यास.

४) वरीलप्रमाणे सर्व शुल्क आकारणी करून सदर हॉल उपलब्ध करून देणेची सर्व जबाबदारी मा.उप आयुक्त सांस्कृतिक केंद्रे यांची राहील

५) वरील संपूर्ण नियमावलीमध्ये बदल/सुधारणा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांचे राहतील.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१७८, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२८९</u>

संदर्भ – १) पाणी आरक्षण मंजूर कोटा शासन पत्र क्र.बीकेएस२०११/(३११/११)/सिंव्य(धो) दि.७/१२/२०११

२) पाणी आरक्षण मंजूर कोटा शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१२/(३४३/२०१२) सिंव्य(धो) दि.१६/०२/२०१३

३) अधिक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ पुणे यांचे दि.२७/०७/२०१७ चे कोटा रद्द झालेबाबतचे पत्र.

४) मा.मुख्य अभियंता पाणीपुरवठा विभाग पुणे मनपा जा.क्र.४२१४,दि.३१/७/२०१८ पाणी आरक्षण फेरप्रस्ताव सादर

५) दि.८/०३/२०१९ मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या समवेत भामा आसखेड धरण प्रकल्पग्रस्त यांच्या समवेत पुनर्वसन अनुदान देणे व सिंचन पुनर्स्थापना खर्च भरणे याबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

६) पाणी आरक्षण मंजूर कोटा मुदतवाढ शासन निर्णय क्र.बिसिआ/२०१९/(१८०/१९)सिंव्य (धो–२) दि.२७/०८/२०२०

७) मुख्य अभियंता जलसंपदा विभाग पुणे यांच्याकडून प्राप्त ज्ञापन मुअ(जसं)/काअ–२/ (७०/२०१८) /प्रशा–८ क्र.२९८४,दि.१०/०९/२०२०

८) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु(भाआ)/२८८ दि.१५/९/२०२० चे पत्र.

९) मा.स्थायी समिती ठराव क्र.५५४,दि.२४/९/२०२०

१०) मनपा ठराव क्र.७, दि.२१/१२/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचेबरोबर भामा आसखेड धरणातून पुणे शहरासाठी आवश्यक असलेल्या पाणी वापरासाठी करावयाच्या कराराचा मसूदा मान्य करणे व करारनामा करणे यासाठी मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) जलसंपदा विभाग व पुणे महानगरपालिका यांचे दरम्यान पाणी वापराबाबतचा करारनामा मंजुर कोटयाप्रमाणे व MWRRA च्या अटी शर्तीसह करारनामा करणेस.

२) जलसंपदा विभाग व पुणे महानगरपालिका यांचे दरम्यान पाणी वापराबाबत कोटयाप्रमाणे करारनामा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्रदान करणेस.

३) शासन निर्णयानुसार वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या दरानुसार पाणी वापराची देयके जलसंपदा विभागाकडे अदा करणेस.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२०१, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२९०</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/४१४ दि. ३/११/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.८३५,दि.१५/१२/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

सन २१९-२० चे अंदाजपत्रक **अ** चे रक्कम रूपये ५१,८१,९८,००,००० व अंदाजपत्रक **क** चे रक्कम रूपये १५,८३,०२,००,००० असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रूपये ६७,६५,००,००,००० चे अंदाजपत्रकास मा.मुख्यसभेने मंजुरी दिली होती. हिशोबान्ती जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे असून सदरच्या जमाखर्चास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

**सन २०१९- २०२० चे अंदाजपत्रक अ व क जमा खर्चाचा तपशील**

जमा बाजू

| | | |
|---|---|---|
| 1 | दिनांक 1 एप्रिल, 2019 ची शिल्लक | 1,00,000 |
| 2 | सन 2019-20 मधील जमा | 36,66,19,02,616 |
| 3 | आरंभीच्या शिलकेसह जमा | 36,66,20,02,616 |

खर्च बाजू

| | | |
|---|---|---|
| 1 | सन2019-20मधील खर्च | 47,51,07,82,796 |
| 2 | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | 1,00,000 |
| 3 | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | 47,51,08,82,796 |
| 4 | वर्षात येणारी तूट | 10,84,88,80,180 |
| 5 | वॉर्डस्तरीय कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिल्याने ओढून घ्यावयाची रक्कम ( 2019-20 मधील अप्रत्यक्ष खर्च ) | 16,82,78,859 |
| 6 | अंदाजपत्रकाची 'अ' ची सन2019-20ची एकूण तूट | 11,01,71,59,039 |

**अंदाजपत्रक 'क'**

जमा बाजू

| | | |
|---|---|---|
| 1 | दिनांक 1 एप्रिल, 2019 ची शिल्लक | 1,00,000 |
| 2 | सन 2019-20 मधील जमा | 7,80,47,25,131 |
| 3 | आरंभीच्या शिलकेसह जमा | 7,80,48,25,131 |

खर्च बाजू

| | | |
|---|---|---|
| 1 | सन 2019-20 मधील खर्च | 13,63,85,11,003 |
| 2 | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | 1,00,000 |
| 3 | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | 13,63,86,11,003 |
| 4 | अंदाजपत्रकाची 'क' ची सन2019-20चीतूट | 5,83,37,85,872 |

| | | |
|---|---|---|
| 1 | अंदाजपत्रकाची 'अ' ची सन 2019-20 ची तूट | 11,01,71,59,039 |
| 2 | अंदाजपत्रकाची 'क' ची सन 2019-20 ची तूट | 5,83,37,85,872 |
| 3 | अंदाजपत्रकाची 'अ' व 'क' ची सन 2019-20 ची तूट | 16,85,09,44,911 |

सन २०१९-२० चे हिशोबामध्ये रक्कम रूपये १६,८५,०९,४४,९११ इतकी तूट येत आहे. तरी खालील निधीतून कामे पूर्ण होऊन शिल्लक असलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे तूट समायोजित करण्यात आलेली आहे.

| | निधी | |
|---|---|---|
| 1 | भांडवली निधी | 10,67,53,46,000 |
| 2 | पाणीपुरवठा + गटारे व नाले | 1,51,43,08,000 |
| 3 | पाणीपुरवठा + गटारे व नाले प्रकल्प | 1,36,24,14,000 |
| 4 | सार्वजनिक वाहतूक सुधारणा | 3,29,88,76,911 |
| | **एकूण** | **16,85,09,44,911** |

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२५३, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२९१**

विषय :- मेट्रो प्रकल्पाने बाधित लोकांचे तात्पुरत्या स्वरूपात पुनर्वसन करणेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आर- ७ अंतर्गत पुणे मनपाच्या ताब्यात असणा-या वडगांव बु।। येथील सुविधा प्रोजेक्ट मधील ६० सदनिकांना मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्र. ६/६१३, दिनांक २०/१२/२०१८
२) महामेट्रो कडील दिनांक २६/०८/२०२० चे पत्र.
३) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/४१२, दि. ०२/११/२०२० चे पत्र.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८१ दि.१२/११/२०२०
५) मा.स्थायी समिती ठराव क्र. ९२० दि.५/०१/२०२१

---

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रामध्ये दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन.

मेट्रो प्रकल्पाने बाधित लोकांचे पुनर्वसन करणेसाठी उपलब्ध करून देण्यात आर-७ अंतर्गत पुणे मनपाच्या ताब्यात असणाऱ्या वडगांव बु।। येथील सुविधा प्रोजेक्टमधील ६० सदनिकांचे रक्कम रूपये ३,०५५/- प्रति सदनिका इतके मासिक भाडे आकारून दिनांक ०२/१२/२०२० पासून पुढील तीन वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ देणेबाबतचे आणि तद्नुषंगिक करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२१४, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२९२**

विषय :- **कात्रज स. नं. ५५/१/१ब येथे पुणे महानगरपालिका विकास आराखडयामधील २४ पी पार्किंगसाठी आरक्षित असणारी एक एकर जागा पी.एम.पी.एम.एल.ला भाडेतत्वावर देणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. मनिषा कदम, मा. श्रीमती रंजना टिळेकर, मा. सौ. वृषाली कामठे व मा. वीरसेन जगताप यांचे दि. ०९/०३/२०२० चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १, दि. १२/०६/२०२०.
३) पी.एम.पी.एम.एल. कडील जा. क्र. पी.एम.पी.एम.एल./स्थावि/८४२,दि. ४/८/२०२० चे पत्र.
४) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्या/४०९, दि. ०२/११/२०२० ने पाठविलेला अभिप्राय.
५) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८२ दि.१२/११/२०२०
६)मा.स्थायी समिती ठराव क्र.९२१ दि.५/०१/२०२१

---

मा. महापालिका आयुक्त यांचा अभिप्राय अवलोकन केला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये ज्या मिळकतीचे मूल्य र.रू. ५००/- पेक्षा अधिक नसेल किंवा शासनाचे मान्यतेने महापालिकेने निश्चित केलेल्या मूल्यापेक्षा अधिक नसेल अशा मिळकती भाडेकराराने देण्याबाबत नमूद आहे. तसेच कोणतीही स्थावर मालमत्ता भाडेकराराने हस्तांतरित करताना द्यावयाचे भाडे/प्रिमियम रक्कम मिळकतीचे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांची प्रचलित मूल्यनिर्धारण सूचीतील चालू बाजार किंमत अथवा ती जागा संपादित करणेकरिता आणि विकसित करणेकरिता आलेल्या खर्चाची एकूण बेरीज यापैकी जी जास्त असेल त्या रकमेपेक्षा कमी असणार नाही असे नमूद केले आहे. सदर जागेचे मासिक भाडे चालू शिघ्रसिध्दगणकानुसार र. रू. २,१०,८६८/- इतके होत आहे.

तसेच संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये पी.एम.पी.एम.एल. ने सदर जागेची मागणी केली आहे. मिळकत वाटप नियमावली भाग ६(१) व ६ (५) नुसार मा. महापालिका आयुक्त यांना प्रथम १२ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी व त्यांनतर मा. मुख्य सभेच्या मान्यतेने कमाल ३० वर्षेपर्यंत जागा भाडेकराराने देता येते. त्यामुळे सदर जागा ही पुणे महानगर परिवहन महामंडळास प्रथम ११ महिने व त्यानंतर ३० वर्षे मुदतीसाठी भाडेकराराने देण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्यसभेकडे शिफारस आहे.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२१२, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२९३**

संदर्भ :- १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४७६ दि.२२/२/२००७
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२५४ दि. २६/१०/२००६
३) मा.मुख्य सभा ठराव क्र. १६२ दि.२८/९/२००७
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/५५१ दि. ४/१/२०२१ चे पत्र.
५)मा.स्थायी समिती ठराव क्र.९५३ दि.१२/१/२०२१

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी **स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित** या शासकिय संस्थेबरोबर दि.१२ फेब्रुवारी २०२१ पर्यंत १ महिना मुदतवाढ देऊन तात्पुरती करारवाढ करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१ पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी व शहरातील साफसफाई व स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने **स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित** या अशासकिय संस्थेबरोबर दिनांक १ जानेवारी २०२१ पासून दि. १२ फेब्रुवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन तात्पुरती करारवाढ करणेस

२ स्वच्छ सहकारी संस्थेला देखरेख व व्यवस्थापन,प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च, आवश्यक सेवकवर्गाचे मानधन, महानगरपालिकेशी समन्वय साधणे, क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे, प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे, जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ.बाबींसाठी दि.१२ फेब्रुवारी २०२१ पर्यंत १ महिना मुदतवाढ देणेस.

३ दिनांक १ जानेवारी २०२१ पासून दि.१२ फेब्रुवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन ढकलगाडी दुरूस्तीकरिता प्रति महिना प्रति कचरा वेचक र.रू.५०/- आदा करणेस.

४ कचरा वेचकांसाठी आवश्यकतेनुसार सुरक्षा प्रावरणे, ढकलगाडया व बकेट देणेस.

५ अ) वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी प्रत्येक घरापाठीमागे रू.७०/- दरमहा इतके शुल्क प्रस्तावित सहकारी संस्थेमार्फत नागरिकांकडून आकारण्यास.
आ) झोपडपट्टीमध्ये प्रति झोपडी र.रू.५० प्रति महिना आणि प्रत्येक कचरा वेचकास प्रति झोपडी प्रति महिना र.रू.१०/- प्रोत्साहन भत्ता म्हणून देणेस.
इ) व्यावसायिकांकडून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन करणेसाठी दरमहा र.रू.१४०/- इतके शुल्क आकारणेस.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२१३, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२९४**

संदर्भ :- १) मा.मनपा मुख्य सभा ठराव क्र. ३४९ दि.४/१०/१९८३
२)मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/५७७ दि.११/१/२०२१ चे पत्र.
३)मा.स्थायी समिती ठराव क्र.९६० दि.१२/१/२०२१

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे पुणे महानगरपालिकेचे महसूली, भांडवली इ. उत्पन्न व खर्चाचा आराखडा ('अ' व 'क') संदर्भांकिंत क्र. १ च्या महानगरपालिका मुख्य सभा ठरावानुसार दि. १५ जानेवारी अगर तत्पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. परंतू काही अपरिहार्य कारणामुळे सदरचा अंदाजपत्रक आराखडा दि.२९/१/२०२१ रोजी सकाळी ११:३० वा. सादर करणेत येणार असून तसेच त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यास व याबाबत यापुर्वी झालेल्या मा.मनपा मुख्य सभा ठराव क्र. ३४९ दि.४/१०/१९८३ चा दुरुस्त करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सन २०२१-२२ साठी मा.महा.आयुक्त यांनी अंदाजपत्रक आराखडा (अ व क) सादर करणे | २९ जानेवारी २०२१ अगर तत्पूर्वी |
| २) | सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकाबाबत स्थायी समितीत अंतिम निर्णय घेणे | ५ फेब्रुवारी अगर तत्पुर्वी |
| ३) | सन २०२१-२२ साठीचे स्थायी समितीने तयार केलेले | २४ फेब्रुवारी अगर तत्पुर्वी |

| | | |
|---|---|---|
| | अंदाजपत्रक मा.सभासदांना देणे | |

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२१५, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२९५**

संदर्भ :- १) PMPML /टीएम/पास/२०७६,दि.१५/१०/२०१९
२) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/४८०,दि.१२/११/२०२०
३) माहिती व जनसंपर्क कार्यालय जा.क्र.मावजसंका/३६१,दि.०४/११/२०२०
४) समाज विकास विभाग जा.क्र.सविवि/१४०६,दि.२८/१०/२०२०
५) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग जा.क्र.इ.ओ./५४९,दि.०४/११/२०२०
६) सामान्य प्रशासन विभाग जा.क्र. साप्रवि/आस्था/प्र–४/६२०४ दि.१०/१२/२०२०
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/५८२ दि. ११/१/२०२१ चे पत्र.
८)मा.स्थायी समिती ठराव क्र.९६१ दि.१२/१/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

सन २०१९–२० या वर्षात वितरीत केलेल्या मोफत/सवलतीचे बसपासपोटी PMPML संस्थेस र.रू. २१,७७,१६,६६९/- आदा करणेस, तसेच त्यापैकी यापूर्वीच उचल स्वरूपात आदा करण्यात आलेले र.रू.२० कोटी समायोजित करून उर्वरित र.रू.१,७७,१६,६६९/- PMPML संस्थेस RE58A101B या अर्थशीर्षकातून आदा करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२१६, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.२९६**

संदर्भ- १) मा.स्थायी समिती,पुणे महानगरपालिका यांजकडेस मान्यतेसाठी दाखल केलेली निविदा क्र.२०३,
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/५५६ दि. ५/1/२०२1 चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र.१००१,दि.१९/१/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट ११ गावांसाठी (लोहगाव, शिवणे, मुंढवा, हडपसर, साडेसतरा नळी, आंबेगाव खु., उंड्री व येवलेवाडी, धायरी, आंबेगाव बु., उरुळी देवाची, फुरसुंगी) व प्रस्तावित २३ गावांसाठी पाणीपुरवठा योजनेतील डिझाईन, देखरेख संपूर्ण प्रकल्प व्यवस्थापन करणे या कामासाठी तज्ञ सल्लागार यांचेकडून निविदा मागविणेबाबत ("Request For Proposal (RFP) for Design, Supervision and Project Management Consultancy for implementation of Water supply system in newly merged 11 villages (Lohagaon, Shivane, Mundhawa, Hadapsar, Sade, Satra Nali, Ambegaon (Kd) , Undri, Yewalewadi, Dhayari, Ambegaon (Bk) , Uruli Devachi, Fursungi) and proposed 23 villages in Pune Municipal Corporation) म.न.पा. हद्दीत समावेश प्रस्तावित असलेल्या २३ गावांना शुध्द पाणीपुरवठयासाठी डी.पी.आर. करुन त्याप्रमाणे पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याचे स्त्रोत, जलशुध्दीकरण केंद्रे, पाण्याच्या टाक्या, जलवाहिन्या इ. कामांसाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८९ अन्वये तसेच या कामी आवश्यक तरतुद पुढील आर्थिक वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन घेणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७२(ब)अन्वये करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२१७, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२९७</u>

संदर्भ – १) मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि. १/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१०,दि.१४/७/२०२०
३) पुणे मनपा ठराव क्र.१४४,दि.२१/१२/२०२०
४) मनपा ठराव क्र.७१,दि.२२/६/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये एका इमारतीवरुन दुसऱ्या इमारतीवर ओव्हरहेड टि.व्ही. केबल, इंटरनेट/ब्रॉडबँड केबल तसेच ओ.एफ.सी. केबल टाकण्यासाठीची तरतुद नाही त्यामुळे अशा प्रकारच्या सर्व बेकायदेशीर केबल्स शहराचे विद्रुपीकरण करीत असल्याने काढुन टाकण्यात याव्यात.पुणे महानगरपालिकेमध्ये याबाबत योग्य ठराव करुन सदर सर्व प्रकारच्या टाकलेल्या ओव्हरहेड केबल्स आणि नव्याने टाकण्यात येणाऱ्या केबल्स यामध्ये सुसूत्रता आणून प्रती मीटर एकरकमी किंवा वार्षिक ठराविक शुल्क आकारुन त्यातून महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह विभाग आकारत असलेल्या शुल्काच्या प्रमाणात उत्पन्न मिळविता येईल. किंवा सदर सर्व केबल धारकांना इमारतीवरुन ओव्हरहेड केबल टाकण्यास मनाई करुन त्या सर्व केबल्स पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या भुमिगत डक्ट मधून टाकण्यास बंधनकारक करुन, केबल धारकांना प्रती मीटर एकरकमी किंवा वार्षिक शुल्क आकारुन महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसूल मिळवता येईल.तरी करोना विषाणूच्या संसर्गामुळे पुणे महानगरपालिकेच्या महसुलामध्ये घट झालेली आहे ती भरुन काढणेसाठी महानगरपालिकेचा महसुल वाढविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४३८, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२९८</u>

संदर्भ – १) मा.मुख्य सभा ठराव क्र. २५७ दि. २४/८/२०१५
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्य./१४० दि.२५/६/२०२० चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४३८,दि.१८/८/२०२०
४) पुणे मनपा ठराव क्र.८१,दि.२१/१२/२०२०
५) मनपा ठराव क्र.७२,दि.२२/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी स्वच्छ सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थे अंतर्गत कार्यरत कचरा वेचकांस कोविड आजाराच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रोत्साहन भत्ता देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) वस्ती पातळीवरील दारोदारी कचरा संकलन करणाऱ्या कचरा वेचकांस महानगरपालिकेमार्फत प्रत्येक घरामागे देण्यात येणारा प्रोत्साहन भत्ता हा १० रु. ऐवजी २० रुपये प्रती घर प्रति महिना याप्रमाणे सहा महिने कालावधीकरीता अदा करणेस

२) हा प्रोत्साहन भत्ता पुनर्वसन केलेल्या झोपडपट्ट्या (SRA) तसेच अघोषित झोपडपट्टी क्षेत्रासही लागू करणेस

३) वेळोवेळी आढावा घेऊन धोरणात बदल/आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

४) स्वच्छ सहकारी संस्थेचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविण्यात येईल व पर्यायी व्यवस्था करण्यात येईल व याबाबतचा निर्णय घेण्याचा व पर्यायी व्यवस्था करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४३९, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.२९९</u>

संदर्भ– १) मा.सौ.अर्चना तुषार पाटील यांचे दि.१७/०५/२०२१ चे पत्र
२) मा.क्रिडा समिती ठराव क्र. १० दि. ९/६/२०२१
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९४, दि.२२/६/२०२१

––––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

आमचे प्र.क्र.१९ मध्ये लोहियानगर काशेवाडी येथे कै.जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम येथे असलेले लहुजी वस्ताद फिटनेस क्लब (व्यायाम शाळा) याबाबत मी मा.मुख्यसभा माहे मे २०२१ चे कार्यपत्रिकेवरील प्रश्नोत्तरामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. सदर प्रश्नामध्ये मी सदरील फिटनेस क्लब कोणत्या खाजगी संस्थेस पुणे मनपा समवेत करारनामा करून चालविण्यास देण्यात आलेले आहे का? याबाबतचे लेखी उत्तर संबंधित विभागाकडून आले असता, त्यामध्ये सदरील व्यायाम शाळा कोणत्याही खासगी संस्थेस चालविण्यात दिलेले नाही,असे कळविण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात सध्य:स्थितीमध्ये सदरील व्यायाम शाळेचा ताबा विनाकरारनामा राजकीय व्यक्तीच्या वरदहस्ताने अन्य कोणत्या व्यक्तीकडे असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे सदरील व्यायाम शाळा ही विनाकरारनामा अनधिकृतपणे ताब्यात घेवून पुणे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदरील भाग हा झोपडपट्टीमध्ये असून त्या ठिकाणी कोणताही अनर्थ घडला तर त्यास पुर्णपणे पुणे मनपा प्रशासन जबाबदार असणार आहे.

तरी प्र.क्र.१९ मध्ये लोहियानगर काशेवाडी येथे कै.जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम येथे असलेले लहुजी वस्ताद फिटनेस क्लब (व्यायाम शाळा) पुणे मनपाने सील करून स्वत:च्या ताब्यात घेण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४०७, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३००**

संदर्भ :- १) पुणे कॅन्टोन्मेंट विभाग यांचे पत्र दि.२३/११/२०२०
२) पुणे कॅन्टोन्मेंट विभाग यांचे दि.१८/१/२०२१ रोजीचा मेल
३) पुणे कॅन्टोन्मेंट विभाग यांचे दि.१९/१/२०२१ रोजीचा मेल
४) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घकव्यका/७५७ दि. १६/२/२०२१ चे पत्र
५) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२३५, दिनांक १६/२/२०२१
६) पुणे मनपा ठराव क्र.३३०,दि.१७/३/२०२१
७) मनपा ठराव क्र.२५,दि.२१/६/२०२१

------

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे कॅन्टोन्मेंट मधील कचरा प्रकल्पामध्ये पुणे महापालिकेचा कचरा, प्रक्रिया करणेसाठीदेणेबाबत व प्रक्रिया प्रकल्प उभारण्यास शास्त्रोक्त भू भराव करण्यास पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे निधी वर्ग करणेसाठी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या भागात वापरला जाणार असल्याने व ती जागा पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या मालकीची असल्याने सदर निधी बोर्डाकडे वर्ग करणेस व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांची जागा वापर करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार खालील बाबीस मान्यताद्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातर्फे प्रकल्प क्षमता १०० मे टन वाढवणे करिता येणारा अंदाजे खर्च र रु. ७.३९ कोटी ( RO प्लांट च्या खर्चासह ), शास्त्रीय भू भराव तयार कारणेसाठी पुणे मनपाच्या अस्तित्वातील उरुळी देवाची येथील भू भराव तयार करणे करिता आलेला मूळ खर्च अंदाजित र. रु. १०.७९ कोटी व शास्त्रीय भू भराव तयार करणे करिता संपूर्ण खर्च करणे व शास्त्रीय भू भराव तयार झालेनंतर त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रतिवर्षी येणारा अंदाजित खर्च र. रु. ८.२१ कोटी इतका खर्च त्याच्या वापराच्या प्रमाणात म्हणजेच ७० ( पुणे मनपा ) ; ३० (पुणे कॅन्टोन्मेंट) या नुसार करणे इतका निधी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे वर्ग करणेस.

२) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातर्फे पुणे मनपाचा दैनंदिन १०० मे टन कचरा प्रोसेस करणेकरिता पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डास टिपिंग फी र रु ४०२/- प्रती मे टन प्रती दिवस अधिक १० % प्रशासकीय शुल्क व टिपिंग फी १०% पप्रतिवर्षी दरवाढ करणे तसेच १०० मे टन कचरा प्रोसेस करणे करिता विद्युत बिलाचा खर्च प्रक्रियेचा प्रमाणात विभाजित करणे , रिजेक्ट ची विल्हेवाट पुणे मनपाने लावणेस,

३) ८ एकर क्षेत्र गृहीत धरून येणारा खर्च या नुसार पुणे कॅन्टोन्मेंट जागेमध्ये शास्त्रीय भूभराव करणे व त्याची ७० ( पुणे मनपा ) ; ३० (पुणे कॅन्टोन्मेंट) या प्रमाणात विभागणी करून रिजेक्ट जमा करणेसाठी वापरणेस,

४) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या जागेतील परिस्थिती व वस्तुस्तिथी विचारात घेऊन व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे मार्फत तयार करण्यात येणारे पु ग प हे पुणे मनपा व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या नव्याने स्थापन संयुक्त समिती मार्फत तपासणी केलेनंतर पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे मार्फत निविदा मागविण्यात येणार असून मागविण्यात आलेल्या निविदा व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड त्यांच्या प्रस्तावानुसार तयार करण्यात येणाऱ्या शास्त्रीय भूभरावाकरिता येणारा अंदाजित खर्च व शास्त्रीय भूभराव तयार झालेनंतर प्रतिवर्षी शास्त्रीय भूभरावाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च त्याच्या वापराच्या प्रमाणात म्हणजेच ७० ( पुणे मनपा ) ; ३० (पुणे कॅन्टोन्मेंट) या नुसार विभाजित करणेस,

५) उपरोक्त बाबीच्या मान्यतेच्या अनुषंगाने पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे समवेत १०० टन प्रकल्प क्षमता वाढविले नंतर प्रकल्पाची १५ वर्ष मुदतीकरिता करारनामा करणेस,

६) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातर्फे निविदा मागविण्यात आले नंतर निविदा प्राप्त झालेनुसार निविदा जास्त / कमी या प्रमाणात अनु क्र १ नुसार रक्कम पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डास वर्ग करणेस,

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४०, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३०१**

संदर्भ :- १) मा.राजेंद्र शिळीमकर व मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि.१६/२/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२३३, दिनांक १६/२/२०२१
३) पुणे मनपा ठराव क्र.३२९,दि.१७/३/२०२१
४) मनपा ठराव क्र.२३,दि.२१/६/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

बिबवेवाडी येथील स.नं.६५१ ते ६५७,६२१,६२३,६२७,५५६,६२६,६२० सदरच्या ठिकाणी अनेक असे पत्र्याचे शेड उभे आहेत. सदरच्या शेडला खाते मार्फत २६७ प्रमाणे कर लावला जातो. परंतु सदरचे ठिकाणी कोणतेही पक्के स्वरूपाचे वीट बांधकाम केलेले नाही. त्यामुळे या सर्व शेडला एक पटीमध्ये कर आकारणी करण्यास जेणे करून आपल्या पुणे महानगरपालिकेच्या महसुलामध्ये वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे सदरच्या ठरावानुसार या ठरावाची कारवाई अतित्वर्य करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४५५, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३०२**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/घन.व्यव./८९५ दि.९/३/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३७,दि.९/३/२०२१
३) मनपा ठराव क्र.२४,दि.२१/६/२०२१

----

मा.अति.महा.आयुक्त(इ) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे व वाहतुक करणे या कामासाठी खात्या अंतर्गत शिल्लक तरतुदीमधून र.रु. ११ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन, शहरातील कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणेसाठीचे प्रकल्प उभारणीसाठी होणारा अतिरिक्त खर्च CE19A189 | ११ कोटी | ---- |
| नविन सुचवलेले काम –<br>घनकचरा व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी प्राथमिक वाहतुकीसाठी गाडया आऊटसोर्सिंग तत्वावर मनपा ठेकेदाराकडील चालविणे RE19A149 | ---- | ११ कोटी |

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४५६, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३०३**

संदर्भ :- १. मा.अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/९४७ दि.१६/३/२०२१ चे पत्र.
२. मा.स्थायी समिती ठराव क्र.१४८०,दि.१६/३/२०२१
३. मनपा ठराव क्र.७६,दि.२२/६/२०२१

----

मा.अति.महा.आयुक्त (ई) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील झाडण हद्दीतील कामे आउट सोर्सिंगने करणे करण्याकरिता र.रु. १७,८१,१९,०००/- चे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| खाते | कामाचेनाव | वर्ग करावयाची रक्कम रू पये (कोटीत) | खाते | बजेटकोड | अधिक खर्च रूपये |
|---|---|---|---|---|---|
| घनकचरा व्यवस्थापन | PPT/BOT Development TDR इ माध्यमातुन बंडगार्डन पुणे जंक्शन ते मुढंवा पुलापर्यत मान्य विकास आराखडया नुसार दर्शविलेल्या नदीकाठच्या दक्षिणेकडील ३० मीटर डी पी रस्त्याच्या कामाचाDPR तयार करणे रस्ता विकसित करणे तद्नुषंगिक कामे करणे CE20D170/L1-13 | १७८११९००० | ढोलेपाटील | RE 19A 210 D | १४२००००० |
| | | | नगररोड | RE 19A 211 D | ९०००००० |
| | | | येरवडा कळस धानोरी | RE 19A 214 D | ८७००००० |
| | | | औंध बाणेर | RE 19A 212 D | ० |
| | | | कोथरूड बावधन | RE 19A 204 D | १३७००००० |
| | | | घोलेरोड शिवाजीनगर | RE 19A 203 D | ४२१९००० |
| | | | वारजेकर्वेनगर | RE 19A 213 D | २६४००००० |
| | | | सिहगंडरोड | RE 19A 205 D | ३३०००००० |
| | | | धनकवडी /सहकारनगर | RE 19A 215 D | ० |
| | | | कोढंवा येवलेवाडी | RE 19A 206 D | ८०००००० |
| | | | हडपसर मुंढवा | RE 19A 209 D | ४०००००००० |
| | | | वानवडी हडपसर | RE 19A 216 D | ९९००००० |
| | | | बिबवेवाडी | RE 19A 207 D | ० |
| | | | भवानीपेठ | RE 19A 208 D | ० |
| | | | कसबा विश्रामबागवाडा | RE 19A 202 D | ११०००००० |
| | | १७८११९००० | | | १७८११९००० |

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४७७, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३०४</u>**

संदर्भ :- १. मा. मुख्य सभा ठराव क्र. ३१२ दि. २६/०९/१९९७.
२. मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयाकडीलप्राप्त अर्ज.
३. मा. विधी अधिकारी यांचा अभिप्राय जा.क्र. ४११ दि. ३०/०६/२०२०.
४. मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/माव्य/९२९ दि. १५/३/२०२१ चे पत्र.
५. मा.स्थायी समिती ठराव क्र.१५,दि.५/४/२०२१
६. मनपा ठराव क्र.३८, दि.२१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरणातील बाधित व्यावसायिकांना पुर्वी भाडयाने दिलेल्या गाळयांच्या हस्तांतरणाचे खालीलप्रमाणे धोरण ठराविणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**धोरण ठरविणेचीआवश्यकता –**

१) पुनर्वसित गाळाधारक स्वतः व्यवसाय करण्यास सक्षम नसल्यास/मयत झाल्यास कुटुंबातील सदस्यांकडून करारनामा करता येणे अशक्य होते. गाळा वारसदाराचे नावे वर्ग झाल्यास नव्याने ३० वर्षे मुदतीचा करारनामा केल्यास भाडेकरार

अटीतील अनियमितेस प्रतिबंध होईल. गाळ्याचा करारनामा नियमित झाल्यास भाडे वसुलीस अडचण येणार नाही.
२) पुनर्वसन केलेल्या गाळाधारकाने परस्पर दुसऱ्या व्यक्तीस गाळा चालविण्यास दिल्यास, गाळा भाड्याने दिल्याचे अगर विकत दिल्याचे सिद्ध करणेस अडचणी येणे. अशा बाबी निदर्शनास आल्या व त्यानुसार कारवाई प्रस्तावित केल्यास नाहक

कोर्ट कब्जे होतात. अशा परस्पर व्यवहारामध्ये महापालिकेने हस्तांतरासाठी तडजोड शुल्क आकारल्यास मनपाचे आर्थिक हितहोईल व नात्याने आर्थिक स्त्रोत निर्माण होईल.
३) पुणे सोलापूर रस्त्याच्या रूंदीकरणा मध्ये ३४६ गाळेधारकांचे मनपाची रिकामी जागा देवून पुनर्वसन करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या गाळेधारकांकडून जागा भाडेपोटी नियतकालीन उत्पन्न व थकबाकी तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| पेठ | गाळ्यांचीसंख्या | मासिक भाडे (रू.) | वार्षिक भाडे (रू.) | थकबाकी (रू.) |
|---|---|---|---|---|
| हडपसर | ३०९ | १,१६,३४५/- | १०,२२,७००/- | ५०,६२,०३३/- |
| वानवडी | ३७ | २०,७९४/- | २,४९,५२८/- | ८,३३,१५७/- |
| **एकूण** | **३४६** | **१,३७,१३९/-** | **१२,७२,२२८/-** | **५८,९५,१९०/-** |

यापैकी किमान ४०% गाळेधारकांचे हस्तांतरण झाल्यास त्यापैकी १०० गाळेधारकांचे कुटुंबातल्या कुटुंबात हस्तांतरण गृहीत धरल्यास त्यांचेकडून प्रस्तावित हस्तांतरण शुल्कापोटी रू. २५ लक्ष व ५० गाळेधारकांची कुटुंबाबाहेरील व्यक्तीकडे हस्तांतरण गृहीत धरल्यास त्यांचेकडून प्रस्तावित हस्तांतरण शुल्कापोटी रू. १ कोटी असे सुरूवातीस अंदाजे रू. १.२५ कोटी उत्पन्न महापालिकेस मिळणे अपेक्षितआहे. तसेच धोरण निश्चित झाल्यास वेळोवेळी पुणे मनपास हस्तांतरणापोटी उत्पन्न मिळणार आहे. त्याचप्रमाणे हस्तांतरण करताना संबंधीत गाळेधारकाची संपूर्ण थकबाकी वसुलकरणेची अट ठेवल्यामुळे थकबाकीची संपुर्ण वसुली होवून गाळेधारक नियमानुकूल होण्यास मदत होईल.

**कायदेशीरतरतुद –**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ ड** – जो मोबदला घेवून, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

**पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८**

**भाग ८ मिळकत/मालमत्ता वाटपाच्या प्रमुख शर्ती** – (९) मध्ये महानगरपालिकेची एखादी मालमत्ता एखाद्या संस्थेस/व्यक्तीस भाडेकराराने वाटप करण्यात आली असेल अशी मालमत्ता संबंधीत संस्थेने/व्यक्तीने **मा.महापालिकाआयुक्त यांच्या मान्यते शिवाय** गहाण ठेवणे, विकणे, पोट भाडयाने अथवा अन्य रितीने अन्य संस्थेस/व्यक्तीस हस्तांतरीत करणे अनुज्ञेय राहणार नाही. म्हणजेच अशा बाबीस मा. महापालिका आयुक्त यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

**भाग ११ – महानगरपालिकेच्या मिळकतीचे हस्तांतरण –**

(२४) महानगरपालिकेच्या कोणत्याही मिळकती अथवा बांधीव गाळे ज्या संबंधीत संस्था/व्यक्ती यांना दिर्घ मुदतीचे भाडे कराराने विशिष्ट कारणासाठी देण्यात आले असतील अशा मिळकती संबंधीत संस्था/व्यक्ती महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय परस्पर पोट भाडयाने अन्य संस्था/व्यक्ती यांना देणे अनुज्ञेय होणार नाही.

(२५) वर उल्लेख केलेल्या मिळकतींची संबंधीत संस्था/व्यक्ती यांना आवश्यकता नसेल तर त्या महापालिकेस परत करणे आवश्यक असेल अथवा ज्या विशिष्ट हेतूच्या दृष्टीने अशा मिळकतीचे वाटप करण्यात आले असेल त्या हेतूबाबत पात्र असणाऱ्या संस्था/व्यक्ती यांना महापालिकेची पूर्वपरवानगी घेवून अशा मिळकती उर्वरीत करार कालावधीसाठी हस्तांतरीत करता येतील. मात्र अशा हस्तांतरणासाठी संबंधीत जागेचे मुल्य व पूर्वीच्या संस्था/व्यक्ती यांचेकडून आकारण्यात आलेले मुल्य यांचेतील फरकांचे निवासी वापरासाठी २५% व व्यापारी वापरासाठी ५०% हस्तांतरण फी आकारण्यात येईल. तसेच ज्या संस्थेस/व्यक्तीस संबंधीत मिळकत हस्तांतरीत करावयाची आहे अशा संस्था/व्यक्ती यासाठी मा. मुख्य सभेची मान्यता घेवून व पुन्हा त्यांचेबरोबर रितसर करारनामा करून घेवून आणि हस्तांतरण फी भरून घेवून असे हस्तांतरण करण्यात येईल.

**पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण व ग.व.नि. विभागातील प्रचलित कार्यपद्धती –**

**१) अतिक्रमण विभाग –** महापालिकासभा ठराव क्र. २५१ दि. २४/०८/२०१५ अन्वये अधिकृत फेरीवाल्यांनी त्यांचे परवाने परस्पर हस्तांतरण करून दिलेले नोंदणीकृत व्यवसायिकांकडून तडजोड हस्तांतरण शुल्काची आकारणी करणेस मान्यता देण्यात आली आहे.

| नोंद रजिस्टर मधील परवान्याचा प्रकार | पूर्वीची परवाना श्रेणी (सध्या व्यवसाय करीतअसलेल्या ठिकाणची श्रेणी) | वसुल करावयाचे हस्तांतरण तडजोड शुल्क रूपये |
|---|---|---|
| स्टॉल | १. विशेषश्रेणी (तुळशीबाग, सारसबाग, हॉंगकॉंगगल्ली व नवीनधोरणांतर्गत अ+ | २ लाख |

| | | |
|---|---|---|
| | वर्गवारीतीलजागा इ.<br>२.अ श्रेणी<br>३. ब श्रेणी<br>४. क श्रेणी | <br>१ लाख ५० हजार<br>१ लाख<br>५० हजार |
| हातगाडी/बैठा/गटई (विशेष श्रेणीतील नमूद ठिकाणां वरील परवाने वगळून) | श्रेणीलागूनाही | २५ हजार |
| गुऱ्हाळशेड | श्रेणी लागू नाही | १ लाख |

**२) झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग (ग.व.नि.) –** गलिच्छ वस्ती नियंत्रण विभागाकडून झोपडीधारकांचे, निवासी व बिगर निवासी यांच्या हस्तांतरणाचे धोरण महाराष्ट्र शासन निर्णय क्र. झोपसृ–२०१०/प्र.क्र. १/झोपसृ–१, मंत्रालय मुंबई दि. ०२/०१/२०१२ अन्वये निश्चित करण्यात आलेले आहे. शासन निर्णयातील –

भाग अ मधील अ.क्र. २ – अर्हता दिनांका पूर्वीच्या अस्तित्वातील मुळ संरक्षण पात्र झोपडीतील सध्या वास्तव्य करणारा झोपडीधारक तेथे किमान १ वर्ष पूर्वीपासून वास्तव्य करीत असल्यास ती संरक्षण पात्र झोपडी त्याच्या नावे हस्तांतरीत करता येईल.

अ.क्र. ३ – संरक्षण पात्र झोपडीचे हस्तांतरण करून घेणाऱ्या व्यक्तीने त्याच्या नावावर किंवा पत्नी/पतीच्या नावे अथवा अज्ञान मुलाच्या नावे संबंधीत महानगरपालिका क्षेत्रात अन्य झोपडी किंवा घर मालकीतत्वावरनसल्याचेहमीपत्र भरूनदेणेआवश्यक राहील.

अ.क्र. ४ संरक्षणपात्र झोपडीचे हस्तांतरण करून घेणाऱ्या व्यक्तीस अथवा कुटुंबाच्या नावे केवळ एकाच झोपडीचे हस्तांतरण होवू शकते.

भाग ब – ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर या शहराकरीता संरक्षणपात्र झोपडया हस्तांतरीत करणेसाठी हस्तांतरण शुल्क निवासी प्रयोजना करीता वापरावयाच्या झोपडीकरीता रू. ४०,०००/– व अनिवासी संयुक्त वापरातील झोपडीकरीता रू. ६०,०००/– प्रमाणे हस्तांतरण शुल्क आकारणी करून हस्तांतरणास मान्यता देण्यात यावी.

भाग ब (८) – ज्या झोपडीधारकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा फायदा मिळाला असेल अशा व्यक्तीला किंवा त्याच्या/तिच्या पत्नीला/पतीला अथवा अज्ञान मुलांना झोपडी विकतघेता येणार नाही अथवा हस्तांतरीत करून घेता येणार नाही.

भाग ब (९) – पूर्वीच्या विक्रीबाबत प्रत्येक टप्याचे हस्तांतरण शुल्क न आकारता केवळ सध्याच्या हस्तांतरण टप्यावरील हस्तांतरणाचे शुल्क आकारण्यात येईल. तसेच भविष्यात प्रत्येक हस्तांतरणाबाबत हस्तांतरण शुल्क आकारण्यात येईल.

**३) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाचा प्रस्ताव –**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ ड, पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ मधील भाग ८ (९) व भाग ११ (२४) व (२५) यांना अधीन राहून रस्ता रूंदी बाधितांसाठी भाडयाने दिलेल्या गाळयांचे/जागांचे हस्तांतरणासाठी खालीलप्रमाणे हस्तांतरण प्रकार निहाय हस्तांतरण शुल्क आकारणी प्रस्तावित करीत आहोत.

| **अ.क्र.** | **पुनर्वसनप्रकार** | **हस्तांतरणप्रकार** | |
|---|---|---|---|
| | | **कुटुंबातल्या कुटुंबात हस्तांतरण शुल्क** | **कुटुंबा बाहेरील हस्तांतरण शुल्क** |
| १. | पर्यायी/अदला बदलीने दिलेलीजागा | २५,०००/– | १,००,०००/– |
| २. | भाड्याने दिलेलीजागा | ५०,०००/– | २,००,०००/– |

**शुल्क निर्धारणाबाबत कारण मिमांसा –**

**भाग ११ (२५) मध्ये** – हस्तांतरणासाठी संबंधीत जागेचे मुल्य व पूर्वीच्या संस्था/व्यक्ती यांचेकडून आकारण्यात आलेले मुल्य यांचेतील फरकांचे निवासी वापरासाठी २५% व व्यापारी वापरासाठी ५०% हस्तांतरण फी आकारण्यात येईल. तथापी अशी तरतूद असली तरी पुणे सोलापूर रस्ता रूंदीकरणामध्ये पुनर्वसन करून पर्यायीअथवा भाडयाने दिलेल्या गाळयांचा आकार सरासरी १०० चौ. फुटाच्या जवळपास आहे. त्यामुळे या क्षेत्राचे शिघ्रसिद्ध गणकानुसार येणारे मुल्यांकन अत्यंत अल्प येते.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. झोपसृ–२०१०/प्र.क्र. १/झोपसृ–१, मंत्रालय मुंबई दि. ०२/०१/२०१२ अन्वयेअनिवासी संयुक्तवापरातीलझोपडीकरीता रू. ६०,०००/– प्रमाणेहस्तांतरणशुल्क आकारणीकरूनहस्तांतरणास मान्यतादेण्यात यावी. असे आदेशआहेत व त्यानुसारपुणे महानगरपालिकेकडीलग.व.नि. विभागाकडून कार्यवाहीसुरू आहे.

अतिक्रमण विभागाकडीलस्टॉलच्याहस्तांतरणाच्यातरतुदीप्रमाणे – स्टॉलकरीता अ+ वर्गवारीतीलश्रेणीकरीताहस्तांतरण फी र.रू. २,००,०००/– इतकी आकारण्यात येतआहे.

त्यामुळेगाळा/जागाहस्तांतरणाचेशुल्क अतिक्रमण विभागाकडीलतरतुदीप्रमाणेचप्रस्तावितकेलेआहेत.

**हस्तांतरणासाठी पूर्वअट –**

१)हस्तांतरण मागणीपूर्वी संपूर्ण भाडे थकबाकी एकरकमी भरणे बंधनकारक राहील.

२) कुटुंबातल्या कुटुंबात हस्तांतरण करताना सर्व वारसदारांचे नोटराईज्ड संमतीपत्र (योग्य शुल्काच्या स्टॅम्प पेपरवर) आवश्यक राहील.

३)कुटुंबातील बाहेरच्या व्यक्तीस हस्तांतरण करताना मुळ गाळाधारक व त्याच्या कुटुंबातील वारस यांचे नोटराईज्ड संमतीपत्र आवश्यक राहील.

४)नवीन गाळाधारक म्हणजेच ज्याच्या नावे गाळा हस्तांतरीत करावयाचा आहे तो महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. त्याचा पुरावा म्हणून आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदानकार्ड दाखल करणेआवश्यक राहील.

५) ज्या व्यक्तीच्या नावे पूर्वी गाळाअसेल त्या व्यक्तीला गाळाहस्तांतरीत केला जाणार नाही.

६) गाळयाचे परस्पर हस्तांतरण करता येणार नाही.

७)गाळयाचे वीजबील व इतर सर्व कर थकबाकी हस्तांतरणापूर्वी भरणे बंधनकारक राहील.

८)गाळा व्यतिरिक्त जादा जागेचा वापर करता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास पहिल्यावेळी रू. ५०००/– दुसऱ्यावेळी रू. १०,०००/– तिसऱ्यावेळी व त्या नंतरच्या प्रत्येक वेळी रू. १५,०००/– दंड आकारून थकबाकी प्रमाणे वसुली करण्यात येईल.

९) हस्तांतरण प्रकरणी विधी विभागाच्या अभिप्रायानुसार व मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील छानणीनुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**हस्तांतरणाचीप्रस्तावितकार्यपद्धती –**

१) हस्तांतरणाचा अर्ज दाखल झाल्यानंतर गाळेधारकांकडून थकबाकी नसल्याबाबतचाअहवाल उप अधिक्षक, मालमत्ता व व्यवस्थापन यांचेकडून घेणेत येईल.

२) संपूर्ण प्रकरणी विधी विभागाचाअभिप्राय घेणे.

३) प्रस्ताव मेंटेनन्स सर्व्हेअर/कनिष्ठ अभियंता यांचेकडून तयार करणे.

४) उप अभियंता, मालमत्ता व व्यवस्थापन यांनी तपासणी करून प्रस्ताव मान्यतेसाठी उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन यांचेकडे सादर करणे.

५) उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन यांच्या मान्यते नंतर नवीन गाळेधारका सोबत करावयाचा भाडेकरार विधी विभागाकडून तपासून घेणे.

६) नवीन गाळेधारकास मेंटेनन्स सर्व्हेअर/कनिष्ठ अभियंता यांचेकडून ताबा देणे.

७) उप अधिक्षक, मालमत्ता व व्यवस्थापन यांचेकडे भाडे रजिस्टर नोंदीसाठी कळविणे.

८) नवीन गाळेधारका सोबत भाडेकरार करणे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३८४, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३०५</u>**

संदर्भ – १)श्री.विठ्ठल ज्ञानदेव जराड,मु.पो.उंडवडी ,ता.बारामती,जि.पुणे यांचा प्राथमिक विवाद निवारण अधिकारी तथा मुख्य अभियंता (जसं),जलसंपदा विभाग पुणे यांच्याकडील दि.२४/०१/२० रोजीचा पाणी तक्रार अर्ज क्र.१/२०१७

२) प्राथमिक विवाद निवारण अधिकारी तथा मुख्य अभियंता (जसं),जलसंपदा विभाग यांचा अंतिम सुनावणी अहवाल निर्णय जा.क्र.मुअ (जस)/(८४/२०१७)/प्रशा–८/४६८५,दि.२२/१२/२०२०

३)प्राथमिक विवाद निवारण अधिकारी यांचे निर्णया विरोधात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्रधिकरणाकडे (MWRRA) दि. २६/९/२०१८ रोजी पुणे महानगरपालिके मार्फतचे अपील.

४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमण प्रधिकरणाचे आदेश Order no.19/2018Dt.13/12/2018 MWRRA /2018/Legal/Case No.14(2018)/929Dt.17/12/2018.

५) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमण प्रधिकरणाचे निर्देश MWRRA /2018/Legal/Case No.14(2018)/ 668 Dt.5/08/2019.

६) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमण प्रधिकरणाचे निर्देश MWRRA /2018/Legal/Case No.14(2018) /16B Dt.8/01/2021

७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/३१ दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

८) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६६,दि.२७/४/२०२१

९) मनपा ठराव क्र.५,दि.२१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे शहराचा पाणीपुरवठा लोकसंख्येच्या प्रमाणात व मापदंडा प्रमाणे होणेबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमण प्रधिकरणाकडे (MWRRA)चालू असलेल्या सुनावणीबाबतचा अहवाल मा.मुख्य सभेस अवगत करुन देणेत येत आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४१, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.३०६</u>

संदर्भ– १) पुणे महानगरपालिका मिळकत / जागावाटप नियमावली दि.२१/०२/२००८.
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१७३,दि.०१/०६/२०२१ चे पत्र.
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४५ दि. १४/६/२०२१
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४३, दि.१५/६/२०२१

विषय– पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सदनिकांची त्यामधील प्रत्यक्ष राहणा–या पुर्नवसित नागरिकांना शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दर + मोकळया जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार विक्री करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

१विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार, पुणे मनपाच्या मालकीच्या सदनिका या रस्तारूंदीकरण वा अन्य प्रकल्प बाधितांना भाडेतत्वावर देवून त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. अशाप्रकारे पुणे मनपाच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत २१९९ सदनिका प्रकल्प बाधितांना वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

**<u>(अ) पुणे महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या सदनिका</u>**

उपरोक्त नमूद तरतुदीनुसार विकसकांकडून पुणे महानगरपालिकेस आतापर्यंत एकूण २९२३ सदनिका प्राप्त झालेल्या आहेत. यापैकी २१९९ सदनिकांचे वाटप प्रकल्प बाधितांना, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील बाधितांना ट्रान्झिट कॅम्प म्हणून करण्यात आलेले आहेत. सध्या ७२४ सदनिका रिकाम्या असून यापैकी २९ सदनिका कात्रज कोंढवा रस्ता, ७२ गणेशखिंड रस्ता, ९५ चाळ विभाग, ४४५ मेट्रो विभागाकरीता, २८ कोथरूड क्षेत्रीय कार्यालय यांचेसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. ५५ सदनिका विविध ठिकाणी रिक्त आहेत. एकूण सदनिकांचा तपशील मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये जोडलेला आहे.

**<u>(ब) कायदेशीर तरतूद</u>**

**(१) पुणे महानगरपालिकेच्या सन १९९७ च्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

| ECONOMICALLY WEAKER SECTION HOUSING ( EWS) FOR RETAINABLE LAND DECLARED UNDER UL ( C&R) ACT, 1976 | |
|---|---|
| Certain number of sites demanded by te Pune Municipal Corpration/ Pune Housing and Area Development Authority Board are to be reserved for the same purpose Remaining sites are to be deleted and lands to be included in residential zone. | Pune Municipal Corpration shall use such tenements only for project affected persons/transit camps for slum dwellers. |

**तसेच सन २०१७ रोजी मान्य विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

| | |
|---|---|
| Residential ( R) -<br>( a) Public Hosing EWS/LIG Housing | The Planning Authority/Appropriate Authority shall allot such tenement on priority to the persons dispossessed by implementation of Development Plan. |

उपरोक्त नमूद विकास नियंत्रण तरतुदीनुसार हे लक्षात येते की, यापूर्वी सन १९९७ च्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये –

Pune Municipal Corpration shall use such tenements only for project affected persons/transit camps for slum dwellers.अशी तरतूद होती. मात्र २०१७ मधील विकास नियंत्रण नियमावली मध्ये केवळ प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिलेले आहे. फक्त त्यांनाच सदनिका द्याव्यात असे बंधन घालण्यात आलेले नाही.

**(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधीलकलम ७९ – नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोगकरणे संबंधी तरतूदी :–**

(क) आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.

(ड) जो मोबदला घेवून, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

**(३) पुणे महानगरपालिका मिळकत/जागावाटप नियमावली मधील भाग ३ मधील कलम ५–**

जागावाटपा संबंधीचे अधिकार – महानगरपालिकेची कोणती ही स्थावर व जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजुरीने, किमान चालू बाजारभावाने भाडेपट्टा अथवा विक्री करून देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

**(क) सदनिका विक्री करावयाची आवश्यकता**

**अ)** पुणे मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार या सदनिकांचा वापर पुणे महानगरपालिकेच्या प्रकल्प बाधीत नागरिकांच्या पुनर्वसनाकरीता करणेत येत आहेत. यामधील पुनर्वसन करण्यात आलेले बहुतांश नागरिक झोपडपट्टीधारक आहेत. सदरनागरिकांकडे साधारण रू. ३.६३ कोटी भाड्याची इतकी रक्कम थकबाकी आहे. याबाबत मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तथापि त्यास मिळणारा प्रतिसाद अत्यंत कमीआहे. त्यामुळे सदनिकांचे भाडे वसुल करण्यामध्ये मोठ्याप्रमाणावर प्रशासकीय खर्च होतो. प्रत्यक्षात पुणे महानगरपालिकेला अत्यंत किंमती मालमत्ता विनाकारण सांभाळावी लागते व त्याची देखभाल करावी लागते. त्यावर पुणे मनपाचा खर्च होत असतो.

सदनिका विक्रीचे महानगरपालिकेला होणारे फायदे –

**अ)** मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे असणारा अपुरा सेवकवर्ग तसेच सदनिकाधारकांची भाडे भरण्याबाबत उदासिनता लक्षात घेता या सदनिका **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** त्या सदनिकेत सध्या राहणाऱ्या पुर्नवसित नागरिकास विक्री केल्यास व त्यासअपेक्षीत प्रतिसाद मिळाल्यास पुणे महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसुलीउत्पन्न प्राप्त होईल. याची अंदाजीत महसूल रक्कम रू. ८७.०० कोटी होत आहे.

**ब)**सदर सदनिकांवर पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या देखभाल दुरूस्तीच्या खर्चामध्ये बचत होणार आहे.

**क)**सदर सदनिकांची विक्री केल्यानंतर या सदनिकांना करआकारणी केल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वार्षिक वाढ होणार आहे.

**(ड) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाचा प्रस्ताव**

भविष्यातील आवश्यकता वा गरज विचारात घेवून पुनर्वसन झालेल्या सदनिका विक्रीबाबत खालीलप्रमाणे महत्वाचे टप्पे राहणार आहेत. **पुणे महानगरपालिकेस २९२३ सदनिका विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या आहेत. यामध्ये फक्त सदनिका प्राप्त झालेल्या असून सदनिकांखालील जमीन पुणे महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.**

१) पुणे महानगरपालिकेकडे प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन केलेल्या एकूण ३८ इमारती व त्यामधील १२६० सदनिका संपूर्णपणे व्याप्त असल्याने पहिल्या टप्प्यात या इमारतींमधील सदनिका **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** विक्री करण्यात येणार आहे. याची यादी मा.महापालिकाआयुक्त यांच्यापत्रासोबतच्या परिशिष्ट ब नुसार जोडलीआहे.

२) सदर योजनेला मिळणारा प्रतिसाद विचारात घेवून पुढील टप्प्यात अन्य इमारतींमधील सदनिका याच धोरणानुसार विक्री करण्यात येतील.

३) संपूर्ण इमारतीची विक्री झाल्यानंतर, सदर सदनिकांवरील पुणे महानगरपालिकेचा मालकी हक्क संपुष्टात येवून त्यांचेशी पुणे महानगरपालिकेचा कोणताही संबंध राहणार नाही.

४) विक्रीसाठी प्रस्तावित संपूर्ण इमारतीमधील काही सदनिकाधारकांनी सदनिका खरेदीस नकार दर्शविल्यासअशा सदनिकाधारकांचे अन्य इमारतीमध्ये स्थलांतर करणेत येईल व अशा मोकळ्या सदनिकांमध्ये इतर इमारतीमधील, खरेदीने सदर सदनिका घेऊ ईच्छित असणाऱ्या कुटुंबास स्थलांतरीतकरून संपूर्ण इमारत विक्री योग्य करणेचे अधिकार पुणे महानगरपालिकेस राहतील.

५) सदनिकांची विक्री करताना त्यावरील शासनाच्यादरानुसार होणारी स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. सदनिकाधारकास भरावी लागेल.

६) सदनिका विक्री करीता **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** हा आधारभूत दर म्हणून ग्राह्य धरून सदनिकांची किंमत प्रति चौ.मी. आकारण्यात येईल.

७) सदर सदनिका कुटुंबातील पतीपत्नीचे नावे करण्यात येणार आहे.

**(इ) कार्यपद्धती**

१) पुनर्वसन केलेल्या इमारतीमधील सदनिका विक्रीकरीता वर्तमान पत्रामध्ये जाहीर प्रकटन देणे.
२) सदनिकांचे प्रचलित **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** मुल्यांकन निश्चित करणे.
३) सदनिकांच्या **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** निश्चित केलेल्या मुल्यांकनावर स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. निश्चित करणे.
४) पुनर्वसन केलेल्या इमारतीमधील सदनिकाधारकांकडून अर्ज दाखल करून घेणे. अर्जासोबत पुनर्वसना बाबत दिलेले पत्र, अनामत रक्कम पावती, आधारकार्ड, लाईट बील, मतदानकार्ड, रेशनकार्ड व भाडे थकीत नसल्याचा दाखला हे पुरावे जोडून घेणे व सदनिकेच्याकिंमतीच्या १०% रक्कम भरून घेणे.
५) अर्जाची छाननी करणे.
६) पात्र अर्जदारांकडून **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** होणारी सदनिकेची संपूर्ण रक्कम भरून घेवून खरेदीखत सदनिकाधारकांकडून स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. जमा करून खरेदीखताची नोंदणी करणे.
७) विक्री केलेल्या इमारतीनुसार (एकाइमारतीनुसार) सहकारी गृहनिर्माण सोसायटी स्थापन करून घेणे आवश्यक आहे व त्याची स्टॅम्प डयुटी संबंधीतांनी भरणे.
८) सोसायटी स्थापन झाल्यानंतर भूखंडाबाबत सोसायटीशी कन्व्हेयन्स डीड करून देणे.
९) विकास नियंत्रण नियमावली सन २०१७ व युनीफाईड डी.सी. रूल मधील तरतूदीनुसार ज्या प्रकरणी प्लॉटसह पुणे महानगरपालिकेस बांधीवक्षेत्र प्राप्त झाले आहे. अशा प्रकरणी सदनिकेची किंमत निश्चित करताना प्लॉटची किंमत चालू रेडीरेकनरनुसार समाविष्ट करणेत येणार आहे.

रिक्त सदनिका पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांकरीता प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी राखून ठेवण्यात येतील. तसेच सध्या रिक्त असलेल्या सदनिकांची यादी मा.महापालिका आयुक्त यांच्यापत्रासोबतच्या परिशिष्ट क नुसार जोडली आहे.

१) पुणे महानगरपालिकेच्या दि. ०५/०६/१९९७ रोजी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये झालेल्या सुधारणेमधील अॅपेंडीक्स आर-७ च्या तरतुदीनुसार जी आरक्षणे जागामालक यांनी विकसीत केली आहेत अशा प्रकरणी पुणे महानगरपालिकेस जे बांधीवक्षेत्र हस्तांतरीत केले आहे व हे क्षेत्र म्हणजेच सदनिका या तरतुदीनुसार प्रकल्प बाधितांना प्राधान्याने वाटप केलेले असल्याने व सदर विस्थापित नागरिक त्या ठिकाणी वास्तव्यास असल्याने (परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या) त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) व (ड) आणि पुणे महानगरपालिका मिळकत/जागावाटप नियमावली मधील भाग ३ कलम ५ नुसार **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** विक्री करणेस.
२) थकबाकीदार प्रकल्पबाधितांना थकीत भाडे भरण्यासाठी ३ महिन्यांची मुदत देवून सदर मुदतीत थकीत भाडे न भरल्यास त्यांना सक्तीने निष्कासित करणेस व निष्कासित केल्यानंतर रिक्त होणाऱ्या सदनिका खुल्या बाजारात शिघ्रसिद्धगणक दराने जाहीर निविदा प्रक्रियेद्वारे विक्री करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३८६, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>**विषय क्र.३०७**</u>

संदर्भ– १) मा.महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र.मआ/माव्य/९६४,दि. १५/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहरसुधारणासमिती ठराव क्र. ३१३ दि. १३/३/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.५०८, दि.२९/६/२०२१

**विषय –** अभियांत्रिकी महाविदयालय पुणे (महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) यांचे प्लॉट नं.६५ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरिता पुणे महानगरपालिकेचा मालकीचा फा.प्लॉट क्र. ६६ मनपा जागेचे हस्तांतरण करणेबाबत.

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्यापत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

अभियांत्रिकी महाविदयालय पुणे यांचेकडून सार्वजनिक कामासाठी घेतलेले एकूण जागा ६९५५.६२७ चौ.मी. विना भरपाई दिलेली आहे. या बदल्यात पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा प्लॉट नं.६६ क्षेत्रफळ २६१२.२९ चौ.मी. तेथील असणा–या सर्व झोपडयांसह संपूर्ण जागा झोपडपट्टी पुर्नवसन योजना करणेकरिता अभियांत्रिकी महाविदयालय पुणे ( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) यांचेकडे हस्तांतरण करणेस मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४२९, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

विषय क्र.३०८

संदर्भ– १) मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी मा.स्थायी समिती बैठकांमध्ये दिलेल्य ासूचना.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/२७७ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

३) मा.बाळासाहेब ओसवाल, मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.राहूल भंडारे, मा.राजाभाऊ लायगुडे, मा.मच्छिंद्र गायकवाड, मा.श्रीमती अमृता बाबर, मा.महेश वाबळे, मा.सौ.अर्चना पाटील, मा.सौ.उज्ज्वला जंगले, मा.सौ.नंदा लोणकर, मा.बंडू गायकवाड, मा.श्रीमती लता राजगुरु यांची दि. २९/६/२०२१ चीउपसूचना.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५२०, दि.२९/६/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन–

पाणीपुरवठा विभागाकडील उत्पन्नवाढीसाठी खालील धोरणानुसार अभय योजना (Amnesty scheme) राबविणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) ही अभय योजना फक्त निवासी व व्यापारी आस्थापनांनी घेतलेल्या अनधिकृत नळजोडांसाठीच लाग ूराहील.

२) ही योजना फक्त तीन महिन्यांसाठीच लाग ूराहील.

३) ही योजना फक्त १ जून२०२१ पुर्वी अस्तित्वात असलेल्या अनधिकृत नळजोडांकरीताच लागू राहील. या नंतर घेण्यात आलेल्या सर्व अनधिकृत नळजोडांवर कारवाई करण्यात येईल.

४) योजना जाहीर झाल्यानंतर तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये नागरीकांनी अर्ज दाखल करावयाचा आहे. अर्ज दाखल करणाऱ्यांनी म.न.पा.च्या पाणीपुरवठा विभागाच्या संबंधित झोनच्या (स्वारगेट/सावरकरभवन/एसएनडीटी/चतु:श्रृंगी/बंडगार्डन/लष्कर) कार्यकारी अभियंत्यांकडे साध्या कागदावर अर्ज करावयाचा आहे. त्या अर्जामध्ये अभय योजनेसाठी अर्ज दाखल करत असल्याचे नमुद करावयाचे आहे. अर्जामध्ये नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक नमुद करायचा असुन, अर्जासोबत एम.एस.ई.बी. किंवा टेलीफोनचे बिल, आधारकार्डाची प्रत, मालकी हक्काची कागदपत्रे जोडावयाची आहे.

५) अर्ज प्राप्त झाल्यानंतर पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांकडुन जागा पाहणी करण्यात येईल. एकुण अस्तित्वातील टेनामेंट्सच्या अनुषंगाने नियमानुसार अनुज्ञेय असलेले नळजोडच नियमान्वित करण्याकरीता पात्र राहतील. इतर सर्व अनधिकृत नळजोडांवर कारवाई करण्यात येईल.

६) एक इंच व्यासापेक्षाअधिक व्यासाचे नळजोड नियमान्वित करण्यात येणार नाहीत.

७) प्रत्येक नियमित करण्यात येणाऱ्या अनधिकृत नळजोडासाठी त्याच्या व्यासाप्रमाणे खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | अनधिकृत नळजोडाचा व्यास (इंचामध्ये) | दंडासहित नळजोड शुल्क रक्कम रुपये | |
|---|---|---|---|
| | | निवासी नळजोड | व्यापारी नळजोड |
| १ | १/२ | ४,०००.०० | ८,०००.०० |
| २ | ३/४ | ७,५००.०० | १५,०००.०० |
| ३ | १ | १९,५००.०० | ३५,५००.०० |

८) सदरच्या शुल्कानुसारअर्जदाराने संपुर्ण रक्कम भरल्यानंतर पाणीपुरवठा खात्यामार्फत प्रत्येक नियमित केलेल्या नळजोडाला नि:शुल्क पध्दतीनेAMR मीटर बसविण्यात येतील.

नळजोड अधिकृत करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क (दंडासहित) पुणे मनपाकडे जमा केल्यानंतर, यापुर्वी अनधिकृतरित्या घेण्यातआलेले नळजोड नियमित असल्याचे समजण्यात येईल.

९) पाणीपुरवठा अभय योजनेमध्ये चाळ विभाग, अनधिकृत झोपडपट्टी, गावठाण, गुंठेवारीनुसार केलेली घरे यांचाही समावेश करणेस

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४०८, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३०९**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्र/३०७,दि.५/७/२०२१ चे पत्र.

२) मा.विधी समिती ठराव क्र.१८,दि.२२/७/२०२१

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.७१२,दि.३/८/२०२१

----

पुणे महानगरपालिका विविध कार्यालयाकडील कर्मचारी बेपत्ता झाल्याने त्यांचे पात्र वारसांना अनुकंपा / मा. लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देणेबाबतचे धोरण मुख्य कामगार अधिकारी यांचेकडून तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित धोरणामध्ये नमूद केलेल्या तरतुदी इंडियन एव्हिडन्स ॲक्ट १८७२ चे कलम १०८ ला अनुसरून कायद्याशी सुसंगत असलेबाबत अभिप्राय मुख्य विधी अधिकारी यांनी दिलेला आहे.

पुणे महानगरपालिका स्तरावर प्रस्तावित धोरणाची अंमलबजावणी करणेकरिता, सदर धोरणास मा. महानगरपालिका सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने बेपत्ता सेवकांचे वारसांना अनुकंपा / मा. लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्याचे धोरण तयार करण्यात आले असून, सदरचे धोरणाचा मसुदा खालीलप्रमाणे आहे.

**-: बेपत्ता सेवकांचे वारसांना अनुकंपा / मा. लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्याचे धोरण :-**

ज्याअर्थी, शासकीय सेवेत असताना कायम आस्थापनेवरील कर्मचारी दिवंगत झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीत कुटुंबियांना तातडीने मदत मिळणेच्या हेतूने अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर नियुक्ती देणेबाबत मे.राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने सुधारित शासन आदेश सन १९७६ ते २०१७ प्रसृत केले आहेत.

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेने मा.मुख्य सभा ठ.क्र.२७६, दि.२१/७/१९७८ अन्वये अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वानुसार नियुक्ती देण्याच्या कार्यवाहीबाबत मे. राज्य शासनाचे धोरण जसेच्या तसे स्विकारले आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये सदर ठरावानुसार मे.शासनाने वेळोवळी विहित केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर धोरणानुसार पुणे महानगरपालिकेतील वर्ग क व वर्ग ड मधील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर नियुक्ती देण्यात येत आहे. त्यामध्ये बेपत्ता महापालिका सेवकांच्या वारसांना यापूर्वी भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ मधील तरतुदीनुसार मे. न्यायालयाचे आदेशान्वये ७ वर्षाच्या कालावधीनंतर मृत घोषित केल्यावर अनुकंपा नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

ज्याअर्थी, शासकीय सेवेत असताना बेपत्ता झालेल्या सेवकांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती देण्याबाबत मे.शासनाने दिनांक ६/१०/१९८९ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन धोरण विहित केले आहे.

ज्याअर्थी, अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देणेसंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय / परिपत्रक यांचे एकत्रिकरण करुन मे. शासनाने शासन निर्णय दि.२१/९/२०१७ अन्वये सुधारित नियमावली तयार केली आहे. सदर नियमावलीमध्ये दि.२६/१०/१९९४ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती देण्याबाबत कोणताही उल्लेख नाही.

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका सेवा विनियमामधील क्र.१८ मध्ये 'रजेसह किंवा रजेशिवाय सतत पाच वर्षांच्या अनुपस्थितीनंतर नगरपालिका कर्मचारी हा नगरपालिका कर्मचारी म्हणून असणे बंद होईल', अशी तरतूद विहित करण्यात आली आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने सतत ५ वर्षांच्या अनुपस्थितीनंतर कर्मचाऱ्याचा महापालिका सेवेतील धारणाधिकार संपुष्टात आल्याने कर्मचारी मनपा सेवक रहात नाही. त्यामुळे त्यांचे वारसांना अनुकंपा तत्व / घाणभत्ता वारस नियुक्ती न देणेबाबत कार्यालयीन आदेश दिनांक १६/११/२०१९ रोजी प्रसृत करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ (१६) मध्ये एखाद्या प्रकरणातील अपवादात्मक परिस्थिती विचारात घेवून शासनाने अन्यथा निर्णय दिला असल्याखेरीज, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला सतत ५ वर्षांहून अधिक कालावधीकरिता कोणत्याही प्रकारची रजा मंजुर

केली जाणार नाही, अशी तरतूद विहित केली आहे.

ज्याअर्थी, राज्य शासनाच्या संकेतस्थळावर(gad.maharashtra.gov.in/sites/default/files /Final-FAQ-200215_0.pdf) नेहमीचे प्रश्नांमध्ये (FAQ) मध्ये बेपत्ता झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती लागू नाही. तथापि, बेपत्ता कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याचे सक्षम न्यायालयाकडून ज्या आदेशान्वये घोषित केले असेल त्या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांनी अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर केल्यास त्यांना अनुकंपा नियुक्ती लागू होईल, असे नमूद आहे.

ज्याअर्थी, मे.केंद्र शासनाचे नेहमीचे प्रश्नांमध्ये (FAQ) मध्ये प्रश्न " क्या एक गुमशुदा सरकारी कर्मचारी के आश्रित की अनुकंपा आधार पर नियुक्ती हेतू विचार किया जा सकता है ? उत्तर - जी हां । इस विभाग के दि.९/१०/१९९८ के कार्यालय ज्ञापन में निर्धारित शर्तों के अध्यधीन, गुमशुदा सरकारी कर्मचारी के आश्रित परिवार की अनुकंपा आधार पर नियुक्ती हेतू विचार किया जा सकता हैं । ", असे नमूद आहे. मे.केंद्र शासनाच्या दि.९/१०/१९९८ रोजीच्या शासन निर्णयान्वये बेपत्ता सेवकांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती देणेकामी काही अटी व शर्ती विहित केल्या आहेत.

ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे बेपत्ता झालेल्या महापालिका कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अनुकंपा धोरणांतर्गत काही अटी व शर्तीनुसार अनुकंपा नियुक्ती देण्यात येत आहे.

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेने सेवानिवृत्ती वेतन / कुटुंब वेतन प्रदान करणेबाबत राज्य शासनाचे धोरण जसेच्या तसे स्विकारले आहे. बेपत्ता झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना उपदान, कुटुंब निवृत्ती वेतन मंजुरी प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम १९८२ आणि वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एफआयआर नोंदविल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीनंतर पोलिस अहवाल घेवून कुटुंब निवृत्ती वेतन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ ( Indian Evidence Act, 1872 ) कलम १०८ नुसार " जेव्हा एखादा बेपत्ता इसम जिवंत आहे का मृत्यू पावला आहे असा प्रश्न निर्माण होतो व तो जर जिवंत असता तर त्याच्या बद्दलची माहिती सहजगत्या ज्या व्यक्तीला अवगत झाली असती अशा व्यक्तीला सात वर्षापर्यंत त्याच्याबद्दल काहीच ऐकिवात आले नाही तर तो जिवंत आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी जी व्यक्ती, तो जिवंत आहे असे शपथपूर्वक प्रतिपादन करते तिची राहते ' अशी तरतूद आहे.

ज्याअर्थी, बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या वारसांनी अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज दाखल केले असून सदर प्रकरणी कार्यवाही करणेकामी शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात येवून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शासनाने श्री.रवि प्रकाश येनपूरे यांचे प्रकरणी दि.९/१/२०२० रोजी 'सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१/९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद स्पष्ट आहे. त्यानुसार त्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देता येईल', असे कळविले आहे.

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेमध्ये कायम सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येते. तसेच, सफाई सेवक सेवानिवृत्त / ऐच्छिक सेवानिवृत्त / शारिरिक अपात्र / दिवंगत झाल्यास त्याच्या पात्र वारसास मा. लाड / पागे समितीच्या शिफारशीनुसार घाणभत्ता धोरणानुसार वारस नियुक्ती देण्यात येते.

त्याअर्थी, पुणे महानगरपालिकेद्वारे बेपत्ता महापालिका कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसास कार्यालयीन आदेश जा.क्र.अतिमआ(ज)/साप्र/आस्था/प्र-४/६१४३, दि.१६/११/२०१९ निर्गमित करण्यापूर्वी करण्यात येत असलेली नियुक्तीची कार्यवाही, केंद्र व राज्य शासनाकडील उपरोक्त नमूद कार्यपध्दती, मुंबई महानगरपालिकेकडील धोरण, बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या वारसास देण्यात येणारे

सेवानिवृत्ती विषयक लाभ, इत्यादी बाबी विचारात घेता पुणे महानगरपालिका बेपत्ता कर्मचारी यांचे पात्र वारसास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत पुढीलप्रमाणे धोरण विहित करण्यात येत आहे :

**१. <u>धोरणाचे नाव</u>** : पुणे महानगरपालिकेतील बेपत्ता कर्मचारी यांच्या वारसांना अनुकंपा / घाणभत्ता तत्वावर नियुक्ती देणेबाबतचे धोरण.

**२. <u>पात्रता</u> :**

अ) सदरचे धोरण पुणे महानगरपालिकेत बेपत्ता सेवकांच्या वारसांना अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर द्यावयाच्या नेमणुकांना लागू राहील.

ब) सदरचे धोरण केवळ कायम आस्थापनेवरील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसांपुरतेच सीमित राहील.

क) महापालिका सेवेत असताना बेपत्ता झालेल्या गट क व ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील.

ड) दिनांक ३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियास अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर नियुक्तीसाठी अपात्र समजले जाईल.

इ) बेपत्ता कर्मचाऱ्यांची एफआयआर दाखल दिनांकापासून सेवानिवृत्तीसाठी किमान २ वर्षे सेवा शिल्लक असणे अनिवार्य असेल. दोन वर्षांपेक्षा कमी सेवा शिल्लक असल्यास सेवकाचे वारस अनुकंपा / घाणभत्ता वारस नियुक्तीसाठी अपात्र ठरतील.

फ) महापालिकेंतर्गत शासन मान्य धोरणानुसार सरळसेवेच्या पदांवर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमावलीतील विहित शैक्षणिक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता येईल.

**३. <u>पात्र वारस</u> :**

मा. लाड/पागे समितीच्या शिफारशीनुसार घाणभत्ता व अनुकंपा नियुक्त्यांसाठी मे. शासनाचे धोरणानुसार पात्र ठरविलेला वारस म्हणजे पात्र वारस.

**४. <u>वयोमर्यादा</u> :** किमान १८ वर्षे व कमाल ४५ वर्षे.

**५. <u>एफआयआर व अर्ज मुदत</u> :**

अ. महापालिका कर्मचारी बेपत्ता झाल्यानंतर त्याच्या कुटुंबियांनी एक महिन्याच्या आत संबंधित पोलिस प्राधिकाऱ्याकडे प्रथम खबरी अहवाल (एफआयआर) नोंदविणे आवश्यक आहे.

ब. सदर एक महिन्याचा कालावधी संबंधित कर्मचारी कार्यरत असलेल्या महापालिका कार्यालयात ज्या दिनांकापासून अनुपस्थित असेल त्या दिनांकापासून परिगणीत करण्यात येईल.

क. बेपत्ता कर्मचाऱ्याच्या वारसांनी रक्तनातेसंबंधातील व परिचित व्यक्ती यांचेद्वारे बेपत्ता व्यक्तीचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच, वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रकटन देवून कायद्याने अभिप्रेत मार्गाने बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्याची कार्यवाही करावी.

ड. बेपत्ता दिनांकापासून सात वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यास बेपत्ता कर्मचाऱ्यास मृत घोषित करणेकामी भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ मधील तरतुदीनुसार कर्मचाऱ्यास मृत घोषित करणेकामी सक्षम न्यायालयाकडे संबंधित वारसांनी अर्ज दाखल करावा.

इ. सक्षम न्यायालयाने बेपत्ता कर्मचाऱ्यास मृत घोषित केल्यास बेपत्ता कर्मचाऱ्याच्या वारसांनी संबंधित क्षेत्रातील शासकीय जन्म मृत्यू नोंदणी कार्यालयातून मृत्यू दाखला प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

फ. बेपत्ता कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याचे सक्षम न्यायालयाच्या आदेश दिनांकापासून एक वर्षाच्या आत पात्र वारसांनी

अनुकंपा / घाणभत्ता वारस नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज करणे आवश्यक आहे

ग. बेपत्ता महापालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील अज्ञान वारसाच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर एक वर्ष मुदतीच्या आत अनुकंपा / घाणभत्ता वारस नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**६. <u>इतर:</u>**

अ. मनपा सेवाविनियम क्र. १८ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा होईल,

**मनपा सेवाविनियम क्र. १८**

'रजेसह किंवा रजेशिवाय सतत पाच वर्षांच्या अनुपस्थितीनंतर नगरपालिका कर्मचारी हा नगरपालिका कर्मचारी म्हणून असणे बंद होईल',

तथापि, बेपत्ता सेवकांचे बाबतीत सेवकाच्या कुटुंबियांनी जर विहित कालावधीत एफआयआर दाखल करून त्याची लेखी स्वरुपात माहिती बेपत्ता कर्मचाऱ्याच्या वेतनाचे विभागास कळविली असेल, तर सेवाविनियम क्र. १८ ची तरतूद लागू होणार नाही.

ब. महापालिका कर्मचारी बेपत्ता होवून ५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असेल व त्याच्या कुटुंबियांनी एफआयआर दाखल केला नसेल, तर महापालिका सेवा विनियम नियम क्र. १८ मधील तरतुदीनुसार संबंधित सेवकाचा महापालिका सेवेतील हक्क संपुष्टात आणण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क. महापालिका कर्मचारी बेपत्ता झाल्यास व कुटुंबियांनी एफआयआर नोंदविल्यास महापालिका सेवा विनियमातील तरतुदीनुसार त्याचा मनपा सेवेतील हक्क संपुष्टात आणू नये. तथापि, सक्षम न्यायालयाने बेपत्ता कर्मचाऱ्यास मृत घोषित केल्यानंतर वारस नियुक्ती अनुज्ञेय राहील.

ड. उपरोक्त नमूद अटी व शर्तीव्यतिरिक्त अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. अकंपा१२१७/प्र.क्र.१०२/८, दिनांक २१/९/२०१७ अन्वये विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वे / अटी व शर्ती बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या वारसास महापालिकेत अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर नियुक्ती देणेबाबत जशाच्या तशा लागू राहतील. तसेच, राज्य शासनाने यामध्ये वेळोवेळी केलेले बदल जसेच्या तसे लागू राहतील.

इ. बेपत्ता कर्मचारी मृत घोषित केल्यानंतर कर्मचारी पुन्हा हजर झाल्यास अनुकंपा / घाणभत्ता वारस तत्वावर नियुक्ती केलेल्या कुटुंबियांस सेवेतून तत्काळ कमी करण्यात येईल.

फ. सदर धोरण प्रलंबित प्रकरणांसह सर्व प्रकरणांना लागू होईल.

**७. घाणभत्ता अनुज्ञेय वारस नियुक्ती :**

महापालिकेतील ज्या सफाई कर्मचाऱ्यांना घाणभत्ता वारस नियुक्ती अनुज्ञेय आहे, अशा सफाई कर्मचाऱ्याच्या बेपत्ता प्रकरणी या धोरणातील तरतुदींसह मा.लाड / पागे समितीच्या शिफारशी व शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील."

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित धोरणास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४४, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३१०**

संदर्भ – १) मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि.३/८/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७१५,दि.३/८/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभु श्रीराम हे हिंदूधर्माचे स्वरूप आहेत. श्रीराम जन्मभूमीवर श्रीरामाचे भव्य मंदिर ही भारतीय मनाची शाश्वत प्रेरणा आहे. यासाठी श्रीराम भक्तांनी ४९२ वर्षे अविरत संघर्ष केला आहे.भूतकाळात झालेल्या ७६ संघर्षात ४ लाखाहून अधिक रामभक्तांनी बलिदान दिलेआहे. जवळजवळ ३६ वर्षाच्या सुसूत्र आणि शृंखलाबध्द अभियानामुळे संपूर्ण समाजाने लिंग, जाती, वर्ण, भाषा, पंथ , प्रदेश या सर्व भेदांच्या पलिकडे जाऊन एकात्मभावाने श्रीरामाच्या मंदिरासाठी असीम त्याग आणि बलिदान दिले आहे. तसेच राम मंदिराचे पुनर्निमाण होण्याचे स्वप्न भारताचे मा.पंतप्रधान अटलजी वाजपेयी, पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहनजी भागवत, देशभरातील पूज्य आचार्य, संत आणि प्रमोदजी महाजन, मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सारख्या तमाम कारसेवकांनी पाहिले आहे.

श्रीराम जन्मभूमीत भव्य मंदिर बनवण्याबरोबर लोकांच्या हृदय श्रीराम आणि त्यांच्या जीवनमुल्यांची प्रतिष्ठापना व्हावी. रामराज्यात परस्पर प्रेम, श्रध्दा, मैत्री, करूणा, दया, ममता, समता, बंधुत्व, आरोग्य, पीडाविरहीत, सर्व समृध्दीपूर्ण जीवन सर्वत्र होते. आपल्या सगळ्यांना पुन: आपल्या दृढसंकल्प आणि सामुहिक पुरूषार्थाने असाच भारत

बनवायचा आहे.

याच अनुषंगाने समस्त धनकवडीकरांनी हा संकल्प केला आहे, की धनकवडी आंबेगाव पठार प्रभाग क्र.३९ येथे उभारत असलेल्या दिडएकर क्रिडांगणामध्ये हिंदुधर्माचे आराध्य दैवत प्रभु श्रीरामचंद्राचे भव्य शिल्प उभारण्यात यावे. या कामी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सर्व हिंदुत्ववादी संघटना, सर्व धनकवडी मधील सार्वजनिक मंडळे ही आग्रही आहेत.

तरी धनकवडी आंबेगावपठार प्रभाग क्र.३९ येथे उभारत असलेल्या दिडएकर क्रिडांगणामध्ये हिंदुधर्माचे आराध्य दैवत प्रभुश्रीरामचंद्राचे भव्य शिल्प उभारण्याकरिता र.रू.२ कोटीचा निधी मंजूर करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४५, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३११</u>**

संदर्भ – १) निविदा क्र.PMC/DRAINAGE/2020/210.
२) सन २०२१-२२चे अंदाजपत्रक बजेटकोड क्रमांक ZE16B102/D2-369.
३)मा. तांत्रिक छाननी समिती ठराव क्र. ८७अ, दि. २०२०२१/०१/अन्वये पूर्वगणनपत्रकास मिळालेली मान्यता
४) दि.०४/०८/२०२१ रोजी मा.निविदा मूल्यमापन समितीच्या बैठकीमध्ये देण्यात आलेली सूचना.
५) मा.स्थायी समितीच्या दि.२७/०७/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये करण्यात आलेले वर्गीकरण
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि:सारण/४१६ दि.१०/८/२०२१ चे पत्र
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३४,दि.१०/८/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिके मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मैलापाणी वहन व्यवस्था करणे, मैलापाणी शुद्धीकरण केंद्र बांधणे व देखभाल दुरुस्ती करणे या कामाचे प्रकल्पीय तरतुदीच्या अनुषंगाने भविष्यात आवश्यक असलेल्या तरतुदीबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा. मा.मुख्य सभेची मान्यता घेणे व भविष्यातील आवश्यक अंदाजित आर्थिक तरतूद करण्यास तसेच कामाची तातडी व निकड लक्षात घेऊन सदर कामास महाराष्ट्र महापालिका अधिनियमा मधील कलम ७२अन्वये खालील बाबीस मान्यताद्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे महानगरपालिके मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११गावांसाठी मैलापाणी वहन व्यवस्था करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र बांधणे व ५ वर्ष देखभाल दुरुस्ती करणे या कामाचे फेज१ अंतर्गत करावयाच्या कामाकरीता महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम७२अन्वये पूर्वगणित रकमेनुसार प्रकल्पीय रक्कम रु. ३९२कोटीनुसार९४. सदर प्रकल्पाच्या प्राप्त होणाऱ्या निविदा रकमा अधिक भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम यांचा विचार करून प्रकल्पाच्या प्रगतीनुसार आगामी ३ वर्षाचे अर्थसंकल्पांमध्ये ( म्हणजेच सन २०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात ) आवश्यक आर्थिक तरतूद करणेस.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४७३, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३१२</u>**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घन.व्यव./४२४ दि.१०/८/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३५,दि.१०/८/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी "स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित "या अशासकिय संस्थेबरोबर दि.१३/८/२०२१पासून पुढील कालावधीसाठी करार करणेस व मा.महानगरपालिका सभेची मान्यता मिळेल या भरवश्यावर स्वच्छ संस्थेस दिनांक १३/०८/२०२१ पासून पुढील कालावधीची देयके अदा करणेस व करारनामा करून घेणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाच्या क्र .१ ते ४० बाबींस मान्यता मिळणेस.

२) पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी "स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित "या अशासकिय संस्थेबरोबर दि.१३/८/२०२१ पासून पुढील कालावधीमध्ये कामे करून घेणेस व मा.महानगरपालिका सभेची मान्यता मिळेल या भरवश्यावर स्वच्छ संस्थेस दिनांक १३/०८/२०२१ पासून पुढील किती कालावधीची मुदतवाढ करणे, देयके अदा करणे व करारनामा करणे याबाबत मा.मुख्यसभेने निर्णय घेणेस

३) स्वच्छ सहकारी संस्थेला देखरेख व व्यवस्थापन, प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च,आवश्यक सेवकवर्गाचे मानधन, महानगरपालिकेशी समन्वय साधणे, क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे, प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे, जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ .साठीचा खर्च RE19A 164या अर्थशिर्षकावर, ढकलगाडी दुरुस्तीसाठीचा खर्च RE19A 125या अर्थशिर्षकावर, सुरक्षा प्रावरणे देणेकरीताचा खर्च RE19A 144या अर्थशिर्षकावर व प्रोत्साहन भत्ता (Slum Subsidy )साठीचा खर्च RE19A 116या अर्थशिर्षकावर करणेस.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४७४, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३१३</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ माव्य/३४७,दि. १५/०७/२०२१ चे पत्र.
२) मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.वृषाली कामठे यांचे दि.२३/०७/२०२१ ची उपसूचना
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ७३ दि. २३/७/२०२१
४) मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.मनिषा कदम व मा.सौ.अर्चना पाटील यांची दि. १८/८/२०२१ ची उपसूचना
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.७६७,दि.१८/८/२०२१

विषय– पुणे मनपाच्या मालकीच्या असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या मिळकती रेडीरेकनर दराच्या १००% (आधारभूत रक्कम) दरानुसार मिळकतवाटप नियमावली मधील तरतूदीनुसार मुल्यांकन रकमेनुसार होणा–या भाडे रकमेप्रमाणे निविदा प्रक्रिया राबवून दिर्घ मुदतीच्या तत्वावर भाडे कराराने देवून पुणे म.न.पा.स महसूल मिळवून खाजगीसह भागातून सार्वजनिक सुविधा क्षेत्र निर्माण करणे बाबतच्या प्रस्तावाबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र अवलोकन केले व त्यांच्यापत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून व मा.शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेवून तसेच मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपाच्या मालकीच्या असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या मिळकती रेडीरेकनर दराच्या १००% (आधारभूत रक्कम) दरानुसार मिळकत वाटप नियमावली मधील तरतूदीनुसार मुल्यांकन रकमेनुसार होणा–या भाडे रकमेप्रमाणे निविदा प्रक्रिया राबवून दिर्घ मुदतीच्या तत्वावर भाडे कराराने देवून पुणे म.न.पा.स महसूल मिळवून खाजगीसह भागातून सार्वजनिक सुविधाक्षेत्र निर्माण करणे बाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या ॲमेनिटी स्पेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) व (ड) नुसार दिर्घमुदतीने ३० वर्षे व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर ९० वर्षापर्यंत भाडेपट्टयाने देणेस.

२) ॲमेनिटी स्पेस भाडेपट्टयाने देणेकरीता जाहीर निविदेद्वारे प्राप्त यशस्वी निविदाधारकास यु.डी.सी.पी.आर. मधील अ.क्र. १.३ (७) मध्ये नमूद ॲमेनिटी स्पेसच्या व्याख्येमध्ये नमूद त्यांचे इच्छेनुसार वापर अनुज्ञेय करणेस.

३) यशस्वी निविदाधारकासोबत मा. महापालिका आयुक्त यांचे मान्यतेने करारनामा करणेस मा.उपआयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन यांना प्राधिकृत करणेस.

**तसेच संदर्भ क्र.२ च्याउपसूचनेप्रमाणे**

विकास नियंत्रण नियमावलीत जे १९ वापर अनुज्ञेय आहेत तेच १९ वापर अनुज्ञेय राहतील. जेणेकरून शहरात ॲमेनिटी स्पेस विकसित करण्याकरीता मदत होईल. सदर ॲमिनिटी स्पेसच्या स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवून मा.स्थायी समितीच्या मान्यतेने अंतिम करण्यात यावी.

**तसेच संदर्भ क्र.४ च्याउपसूचनेप्रमाणे**

पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षण ॲमिनिटी स्पेस त्याच आरक्षणाच्या विकसनाकरीता भाडेपट्ट्याने देण्यास.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४५०, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३१४**

संदर्भ – १) मा.उमेश गायकवाड, मा सौ.मनिषा लडकत यांचे दि.१२.०८.२०२१ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८९ दि. १२/८/२०२१

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.७७२,दि.१८/८/२०२१

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे पेठ वानवडी स.नं.२,हिस्सा नं.३+४ येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथील सावित्रीबाई शिवरकर बहुउद्देशीय हॉल या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील हॉल क्र.१)१०९.६५ चौ.मी.आणि हॉल क्र.२)१२५.१३ चौ.मी. या दोन खोल्या ''नई उडान'' (नोंदणी क्र.एफ-२६६५९) या सामाजिक संस्थेस नाममात्र भाडे कराराने पाच वर्षेकरीता देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४५१, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३१५**

संदर्भः- १) महाराष्ट्र शासनाकडील वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र./संकिर्ण/२०२०/प्र.क्र.५९/२०/२० /कोषी.प्रशा.५ अन्वये कोरोना आजारात साहित्य व सेवा या वरील खर्चास निर्बंधातुन सुट देणे बाबतचे आदेश.

२) शासन निर्णय महसुल व वन विभाग सी.एल.एस.२०२०/प्र.क्र.१२३/म३ दि.१६/०३/२०२०.

३) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे क्र./कक्ष/कोरोना विषाणु/१४६/२०२० दि.२०/०३/२०२०.

४) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

५) महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२०.

६) केंद्रीय आपत्तीव्यवस्थापनअधिनियम २००५.

७) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

८) मा.महापालिकाआयुक्त, पुणे महानगरपालिका ठ.क्र. ६/६७४ दि.१७/०२/२०२१.

९) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/परि.क्र.३/५३१ दि.६/९/२०२१ चे पत्र.

१०) मा.स्थायी समिती ठराव क्र.१००८,दि.२०/९/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

परिमंडळ क्र.३ सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी स्व.पु.ल.देशपांडे उद्यान येथे स्वॅब सेंटर तयार करणेसाठी १) ठेकेदार मे.जगन्नाथ मंडप डेकोरेटर (प्रो.प्रा.श्रीमती पुजा मच्छिंद्र लांडगे) यांचेकडुन पत्रा मांडव करणे, आवाराच्या आतील भागात पत्रा पार्टिशन करणे, कपडा पार्टिशन करणे, टेबल व खुर्च्या पुरविणे. २) ठेकेदार मे.कॅफे साईलीला (प्रो.प्रा.श्री.भावेशअरुण पिंपळकर) यांचेकडुन चहा, नाष्टा, जेवण, पिण्याचे बिस्लेरी पाणी बॉटल इ. पुरविणे आणि ३) ठेकेदार मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा.श्री.संतोष काशिनाथ लांडगे) यांचेकडुन स्थापत्य विषयक कामे करणे, डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरविणे, मजुर पुरविणे इ. स्वरुपाची कामे वरील ठेकेदाराकडुन सन २०१९-२० चे शेड्युल मान्य दराने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये केलेल्या कामाच्या खालीलप्रमाणे एकुण र.रु.८८,४३,७७६.७८ खर्चाची माहिती मा.मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांचेकडे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचेस्वरुप | पुरवठादार/ठेकदारचेनाव | खर्च(जी.एस.टी. सह) र.रु. | कामाचाकालावधी |
|---|---|---|---|---|
| १) | पत्रा मांडव करणे, आवाराच्या आतील भागात पार्टिशन करणे, कपडा पार्टिशन करणे, टेबल व खुर्च्या पुरविणे, | मे.जगन्नाथ मंडप डेकोरेटर (प्रो.प्रा. श्रीमती पुजा मच्छिंद्र लांडगे) | ६५,५१,०९६.९१ | दि.०१/१२/२०२० ते दि.३१/०५/२०२१ (०६ महिने) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वुडन स्टेज तयार करणे. अ.क्र.१ ते ८ (मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, ई, उ, ऊ) | | | |
| २) | बिस्लेरी पाणी बॉटल, सकाळी व संध्याकाळी चहा, नाष्टा व जेवण पुरविणे. अ.क्र.९,१०,११ (मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ट ए-१,ए-२, ऐ) | मे.कॅफे साईलीला (प्रो.प्रो.भावेश अरुण पिंपळकर) | ९,९९,४५५.२८ | दि.०१/१२/२०२० ते दि.३१/०५/२०२१ (०६ महिने) |
| ३) | स्थापत्य विषयक अंतर्गत स्वॅब सेंटर येथे असलेल्या शौचालयांची दैनंदिन स्वच्छता करणे, अभियंता व डॉक्टर्स यांना मदतीसाठी डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरविणे (मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ट ओ, औ) | मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा.संतोष काशिनाथ लांडगे) | १२,९३,२२४.५९ | दि.०१/१२/२०२० ते दि.३१/०५/२०२१ (०६ महिने) |
| **एकुण** | **र.रु.अठ्ठयाऐंशी लक्ष त्रेचाळीस हजार सातशे शहात्तर व अठ्ठ्याहत्तर पैसे फक्त** | | **८८,४३,७७६.७८** | |

वरील अ.क्र.१ ते १३ प्रमाणे होणारा खर्च खालील अर्थशीर्षकावर करणे.

अर्थशीर्षकः- सन २०२१ - २२ चे अंदाजपत्रक
**COVID 19**अंतर्गत महसुलकामांसाठी (खर्च)
**RE17F280**

**विषय क्र.३१६**

संदर्भः- १) महापालिका सभा ठ.क्र.५९४,दि.१९/११/२०२१
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/२०० दि.८/६/२०२१ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. ४१४ दि. ८/६/२०२१
४) मा.सौ.वर्षा तापकीर. मा.सौ.मानसी देशपांडे व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. २०/९/२०२१ चे फेरविचाराचे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०११,दि.२०/९/२०२१

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४१४ दि. ८/६/२०२१चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

सिंहगड रस्त्यावर राजारामपूल ते फनटाईम थिएटर पर्यंत उड्डाणपूल बांधणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७२(ब) प्रमाणे र.रू.१३५ कोटी इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करणेकामी खालील बाबीस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सिंहगड रस्त्यावर राजारामपूल ते फनटाईम थिएटर पर्यंत उड्डाणपूल बांधणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७२(ब) प्रमाणे र.रू.१३५ कोटी इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करणेस.

२) सदर कामासाठी सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने तरतूद करणेस.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनीसदर ठरावाची कार्यवाही करावी.

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ४१४ दि. ८/६/२०२१चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**विषय क्र.३१७**

संदर्भः- १) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/आरोग्य/६१७ दि.२०/९/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०३१,दि.२०/९/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेलीकारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

बालेवाडी स.नं.२०,२१ बाणेर स.नं.१०९ येथे उभारण्यात आलेल्या डेडीकेटेड कोव्हिड हॉस्पीटल (डि.सी.एच) महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम ६७(३)(क) अन्वये डॉ.भिसे मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल यांना ३ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेची बाब मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**विषय क्र.३१८**

संदर्भः- १) मा.श्रीमतीलताराजगुरु यांचे दि. १७/९/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०३३,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,पान क्र. २५४, प्रभागक्र.२० क मध्ये ताडीवाला रोड परिसरातील नदीकिनारी रिटेनिंगवॉल बांधणे व इतर तद्नुषंगिक कामेकरणे, (बजेटकोड CE22A646/SJ22-363) | ३० लाख | -- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभागक्र.२० क मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक येथे विविध स्थापत्य विषयक कामे करणे. | -- | २० लाख |
| २) प्रभागक्र.२० क मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक येथे फर्निचर व स्थापत्य विषयक कामे करणे. | -- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.३१९**

संदर्भः- १) मा.श्रीमतीलताराजगुरु यांचे दि. १७/९/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०३४,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१०० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणी पुरवठा, पान क्र. ४५, प्रभाग क्र. २० क मध्ये ताडीवाला रोड परिसरात दाट लोकवस्ती परिसरामध्ये ओव्हरहेडवॉटर टँक २५ दशलक्ष कॅपॅसेटीचे बांधणे (बजेटकोड ZE16A104/SP2-2376) | १०० लाख | -- |
| **नविन सुचविलेली कामे -** | | |
| १)प्रभाग क्र. २० क मध्ये विविध ठिकाणी देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | ५० लाख |
| २)प्रभाग क्र. २० क मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन विषयक कामे करणे. | --- | १५ लाख |
| ३) प्रभाग क्र. २० क मध्ये विविध ठिकाणी खड्डा झोपडपट्टी येथे ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १५ लाख |
| ४)प्रभाग क्र. २० क मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन साफसफाई करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| ५)प्रभाग क्र. २० क मध्ये भीम संघटना येथे ड्रेनेजलाईन टाकणे विषयक कामे करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिकाआयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.३२०**

संदर्भः- १) मा.सौ.सोनाली लांडगे यांचे दि. २०/९/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०३५,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ७ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २२३, बजेटकोड CE20D170/SL1-21, प्रभाग क्र.७अ,मध्ये शासकीय दुध योजना मुंबई पुणे रोड येथे नागरीकींना रस्ता क्रॉस करणेसाठी वॉकींग फुट ओवर ब्रिज बांधणे. | १कोटी | -- |
| **नविनसुचविलेलीकामे** | | |
| १) प्रभाग क्र. ७ अ मध्ये विविध ठिकाणी वाचनालय बांधणे | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र. ७ अ मध्ये विविध ओपन जिम बांधणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. ७ अ मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीट करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र. ७ अ मध्ये पीएमसी कॉलनी वाकडेवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र. ७ अ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र. ७ अ मध्ये भोसलेवाडी ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र. ७ अ मध्ये मुळारोड येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ८) प्रभाग क्र. ७ अ मध्ये महात्मा गांधी वसाहत येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ९) प्रभाग क्र. ७ अ मध्ये पाटकर प्लॉट येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनीसदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.३२१**

संदर्भः- १) मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २०/९/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०३६,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ९ ब बाणेर येथील तुकाई माता मंदिराकडे जाणाऱ्या रामराज्य बिल्डींग शेजारील पायऱ्या करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. १७६, प्रभाग क्र. ९ ब मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे (बजेटकोड सीई२०अे१०३/एसअे१३-८७५) | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे - प्रभाग क्र. ९ ब बाणेर येथील तुकाई माता मंदिराकडे जाणाऱ्या रामराज्य बिल्डींग शेजारील पायऱ्या करणे | --- | १० लाख |

**विषय क्र.३२२**

संदर्भः- १) मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २०/९/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०३७,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ९ ब बाणेर नागरी सहकारी पतसंस्था समोरील तुकाई टेकडीकडे जाणाऱ्या रस्त्याला पायऱ्या करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. १७६, (बजेटकोड सीई२०अे१०३/एसअे१३-८७४),प्रभाग क्र. ९ ब पंचवटी येथील फुटपाथ दुरुस्ती विषयक कामे करणे व फुटपाथ विकसित करणे | १० लाख | --- |
| नविनसुचविलेलीकामे<br>प्रभाग क्र. ९ ब बाणेर नागरी सहकारी पतसंस्था समोरील तुकाई टेकडीकडे जाणाऱ्या रस्त्याला पायऱ्या करणे | --- | १० लाख |

**विषय क्र.३२३**

संदर्भः- १) मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि. २०/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४७,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.३८ अ बिबवेवाडी स.नं.६५९ पार्ट राजीव गांधीनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहाची सिमाभिंत बांधणे व उर्वरित कामे करणेकरीता र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक<br>१.पान क्र.२६७, बजेटकोड नं. CE26A336/SU1-1505, प्रभाग क्र.३८ अ बालाजीनगर-राजीव गांधीनगर मध्ये पुण्याईनगर येथील नाल्याच्या कडेने अस्तित्वात असलेले नालागार्डनचे दुरूस्ती व सुशोभिकरण करणे. | १० लाख | - |
| २.पान क्र.२६७, बजेटकोड नं. CE26A336/SU1-1506, प्रभाग क्र.३८ अ बालाजीनगर-राजीवगांधीनगर मध्ये काशिनाथ पाटीलनगर येथील नाल्याच्या कडेने अस्तित्वात असलेले नालागार्डनचे दुरूस्ती व सुशोभिकरण करणे. | १० लाख | - |
| **नविन सुचविलेली कामे-** | | |
| प्रभाग क्र.३८ अ बिबवेवाडी स.नं.६५९ पार्ट राजीव गांधीनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहाची सिमाभिंत बांधणे व उर्वरित कामे करणे. | - | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

**विषय क्र.३२४**

संदर्भः- १) मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. २५/६/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६०,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १९ मध्ये खालील विविध विकासकामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २६५, बजेटकोड क्र. CE26A336/SU1-1407 प्रभाग क्र.१९क, सेव्हनलव्हज पुला खाली राजमाता जिजाऊ उद्यान येथे दुरूस्ती विषयक कामे करणे. | १० लक्ष | - |
| नवीन सुचविलेली कामे – | | | |
| १. | प्रभाग क्र.१९ भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणा-या आरोग्य कोठी मध्ये दुरूस्ती विषयक कामे करणे व साहित्य खरेदी करणे. | - | ०५ लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रभाग क्र.१९ मनपा शाळेमध्ये संगणक पुरविणे. | – | ०५ लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.३२५**

संदर्भः- १) मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २२/४/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६१,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.९ ब बाणेर हॉटेल सदानंद ते ननावरे अंडरपास, हायवेची पूर्व बाजू, सर्व्हिस रोड सुशोभिकरण करणे, झाडे लावणे, माती टाकणे, पाण्याची व्यवस्था करणे इत्यादीसाठी र.रु.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. १५७, प्रभाग क्र.९ ब, आयव्हरी इस्टेट बाणेर येथील रस्ता डांबरीकरण करणे, (बजेटकोड-सीई२०ए१०२/एसए२-१०३०) | ५० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम - | | |
| प्रभाग क्र.९ ब बाणेर हॉटेल सदानंद ते ननावरे अंडरपास, हायवेची पूर्व बाजू, सर्व्हिस रोड सुशोभिकरण करणे, झाडे लावणे, माती टाकणे, पाण्याची व्यवस्था करणे इत्यादी. | -- | ५० लाख |

**विषय क्र.३२६**

संदर्भः- १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २८/४/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६२,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन देखभाल दुरुस्तीची कामे करणे, गाडलेले चेंबरवर घेणे, झाकण बदलणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. ३३, बजेटकोड एक्सई२३अे११७/ एसएक्स२-९२, वॉर्ड १ सी प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी नाले साफसफाई करणे | १० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन देखभाल दुरुस्तीची कामे करणे, गाडलेले चेंबर वर घेणे, झाकण बदलणे | -- | १० लाख |

(टिप :- मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर सदर कामाचे टेंडर लावण्यात यावे.)

**विषय क्र.३२७**

संदर्भः- १) मा.सौ.अर्चना मुसळे यांचे दि.२३/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६३,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.८ब,मध्ये सुशोभिकरण विषयक कामे करणेसाठी र.रु.१२ लाख ५० हजाराचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | पुणे मनपा सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक पान क्र.२३८,प्रभाग क्र.८ब, मध्ये दुरूस्ती व देखभाल विषयक कामे करणे.(आय.टी.आय.भिंतीलगतचे स्वच्छतागृह व औंध भागातील स्वच्छतागृह दुरूस्ती करणे बजेट कोड- CE22A/548SJ2732-10 | १२ लाख ५० हजार | --- |
| नविन सुचविलेले काम - | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८ब,मध्ये सुशोभिकरण विषयक कामे करणे | --- | १२ लाख ५० हजार |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.३२८**

संदर्भः- १) मा.अमोल बालवडकर यांचे दि.२६/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६४,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.०९ क नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २५६, प्रभाग क्र.०९ क बालेवाडी स.नं.१५ कम्फर्ट झोन सोसायटी नजीक नव्याने विकसित करण्यात आलेल्या क्रीडांगणामध्ये उर्वरित विविध विकास कामे करणे-भाग १ (बजेटकोड नं. सीई२७अे२४१/एसजे२४-९६४) | २० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम-<br>प्रभाग क्र.०९ क नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणी पुरवठा करणे | --- | २० लाख |

**विषय क्र.३२९**

संदर्भः- १) मा.अमोल बालवडकर यांचे दि.२६/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६५,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.०९ क नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी र.रु. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २५७, प्रभाग क्र.०९ क बालेवाडी स.नं.१५ कम्फर्ट झोन सोसायटी नजीक नव्याने विकसित करण्यात आलेल्या क्रीडांगणमध्ये उर्वरित विविध विकास कामे करणे-भाग २ (बजेट कोड नं. सीई२७अे२४१/एसजे२४-९६६) | ३० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम-<br>प्रभाग क्र.०९ क नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणी पुरवठा करणे | --- | ३० लाख |

**विषय क्र.३३०**

संदर्भः- १) मा.अमोल बालवडकर यांचे दि.२६/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६६,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.०९ क, नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २५७, बजेट कोड नं. सीई२७अे२४१/एसजे२४-९६५, प्रभाग क्र.०९ क बालेवाडी स.नं.३३ ओरवी सोसायटी नजीक नव्याने विकसित करण्यात आलेल्या क्रीडांगणमध्ये उर्वरित विविध विकास कामे करणे-भाग १ | २० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम-<br>प्रभाग क्र.०९ क नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणी पुरवठा करणे | --- | २० लाख |

**विषय क्र.३३१**

संदर्भः- १) मा.अमोल बालवडकर यांचे दि.२६/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६७,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.०९ क नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २५७, बजेट कोड नं. सीई२७अे२४१/एसजे२४-९६७, प्रभाग क्र.०९ क बालेवाडी स.नं.३३ ओरवी सोसायटी नजीक नव्याने विकसित करण्यात आलेल्या झालेल्या क्रीडांगणमध्ये उर्वरित विविध विकास कामे करणे | २० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम-<br>प्रभाग क्र.०९ क नव्याने समाविष्ठ सुस व महाळुंगे गावांना टँकरने पाणी पुरवठा करणे | --- | २० लाख |

**विषय क्र.३३२**

संदर्भः- १) मा.दिलीप बराटे यांचे दि.२७/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६८,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

हिंगणे होम कॉलनी येथे नाल्यावर कलवड करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २३४, सीई१७अे२२७/एसजे१२-३८१, प्रभाग क्र. ३२ अ मधील वारजे स्मशानभूमी येथे विकास कामे करणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम-<br>हिंगणे होम कॉलनी येथे नाल्यावर कलवड करणे | --- | १० लाख |

**विषय क्र.३३३**

संदर्भः- १) मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि.२७/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०७०,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.२३अ,मधील स.नं.२८ ससाणेनगर येथील प्लेसमेकींग गार्डन मधील तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रु.२० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं.FE14A105/SG2-326, पान क्र. २७७,प्रभाग क्र.३२क, मध्ये महिला व पुरूषांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह बांधणे. | २० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम -** | | |
| प्रभाग क्र.२३अ,मधील स.नं.२८ ससाणेनगर येथील प्लेसमेकींग गार्डन मधील तद्नुषंगिक कामे करणे. | --- | २० लक्ष |

( मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी . )

**विषय क्र.३३४**

संदर्भः- १) मा.सौ.स्मिता कोंढरे यांचे दि. २८/७/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०७१,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.४०क, मध्ये वित्तिय समितीमध्ये मान्य झालेल्या खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२०

लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, १) पान क्र.१६१,प्रभाग क्र.४०क, मधील दत्तनगर परिसरात व विविध ठिकाणी रस्ता डांबरीकरण करणे व तद् नुषंगिक कामे करणे. ( बजेट कोड- CE20A102/SA2-1277) | १० लाख | --- |
| २) पान क्र.१९४,प्रभाग क्र.४०क,मधील जांभुळवाडी रोड परिसरात व विविध ठिकाणी रस्ता कॉक्रीटीकरण करणे व तद् नुषंगिक कामे करणे.(बजेट कोड- CE20A1262/SA15-1156) | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे - | | |
| १) प्रभाग क्र.४०क, मध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल उभारणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.४०क,मध्ये जांभुळवाडी रोड परिसरात विद्युत विषयक कामे करणे व विद्युत पोल उभारणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

**विषय क्र.३३५**

संदर्भः- १) मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि. ६/९/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०७२,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. १० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.५० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. २४७, बजेट कोड सीई२२अे७०४/एसजे२०-११३४, प्रभाग क्र. १० क मधील वात्सल्यपूरम येथील हॉलचे उर्वरित काम करणे. | ५० लक्ष | -- |
| नवीन सुचविलेली कामे- | | |
| प्रभाग क्र. १० क मधील गादिया इस्टेट येथे मुख्य मलवाहिनी टाकणे | -- | २० लक्ष |
| प्रभाग क्र. १० क मधील गादिया इस्टेट येथे नाल्याला सीमाभिंत करणे | -- | १० लक्ष |
| प्रभाग क्र. १० क मधील मोकाटेनगर येथे नवीन ड्रेनेजलाईन टाकणे. | -- | २० लक्ष |

**विषय क्र.३३६**

संदर्भः- १) मा.सौ.श्रध्दा प्रभुणे पाठक यांचे दि. ६/९/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०७३,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१०ब,मध्ये खालीलप्रमाणे र.रू.३० लाख रूपयांचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | पुणे मनपा सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक पान क्र.२२८ बजेट कोड CE12A/422SJ1259-2 प्रभाग क्र.१०ब, मधील बावधन येथील एल.एम.डी.चौक परिसरातील पुणे मनपाच्या शाळेचे काम पूर्ण करणे. | ३० लक्ष | --- |
| नविन सुचविलेली कामे - | | | |
| १ | प्रभाग क्र.१०ब, मध्ये पावनखिंड व प्रभागात इतर ठिकाणी विविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.१०ब,मधील परमहंसनगर, उजवी भुसारी व प्रभागात इतर ठिकाणी विविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |
| ३ | प्रभाग क्र.१०ब,मधील महात्मा सोसायटी ते वंडर फ्युचुरा रोड व प्रभागात इतर ठिकाणी विविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

**विषय क्र.३३७**

संदर्भः- १) मा.सौ.श्रध्दा प्रभुणे पाठक यांचे दि. ६/९/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०७४,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१०ब,मध्ये खालीलप्रमाणे र.रू.५० लाख रूपयांचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | पुणे मनपा सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक पान क्र.२२८ बजेट कोड CE12A/422SJ1260-2 प्रभाग क्र.१०ब, मधील बावधन येथील एल.एम.डी.चौक परिसरातील पुणे मनपाच्या शाळेचे काम पूर्ण करणे. | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | | |
| १ | प्रभाग क्र.१०ब, मधील कैलास वसाहत, श्रीकृष्ण कॉलनी व विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक व स्वच्छतागृह विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.१०ब,मधील मराठा महासंघ, सिध्दीविनायक कॉलनी व प्रभागात इतरत्र ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ३ | प्रभाग क्र.१०ब,मधील विविध ठिकाणी वाचनालय व ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्यासाठी शेड उभारणे | --- | १० लाख |
| ४ | प्रभाग क्र.१०ब,मधील विविध मनपा इमारती मध्ये फर्निचर विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| ५ | प्रभाग क्र.१०ब,मधील प्रशिक्षणासाठी,शाळांमध्ये व विरंगुळा केंद्रामध्ये संगणक व टॅब खरेदी करणे. | --- | १० लाख |

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

**विषय क्र.३३८**

संदर्भः- १) मा.सौ.श्रध्दा प्रभुणे पाठक यांचे दि. ६/९/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०७५,दि.३०/९/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१०ब,मध्ये खालीलप्रमाणे र.रू.३० लाख रूपयांचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | पुणे मनपा सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक पान क्र.२५७ बजेट कोड CE27A/241SJ972-24 प्रभाग क्र.१०ब, मधील चांदणी चौक येथील फायर स्टेशनचे काम पूर्ण करणे. | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | | |
| १ | प्रभाग क्र.१०ब,मध्ये दिशादर्शक फलक व वाहतूक विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.१०ब,मध्ये पावनखिंड,वेदभवन व प्रभागात इतर ठिकाणी नवीन लाईटचे पोल बसवून प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १० लाख |
कल्याणीनगर मेट्रो स्टेशनचे एन्ट्री-एक्झिट साठी आवश्यक सुमारे ३९७.९७ चौमी जागेची सन २०२०-२१ च्या रेडी-रेकनर नुसार किंमत र.रू.२,०३,००,४५०/- इतकी निश्चित करणेत आलेली आहे.

तरी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)कल्याणीनगर येरवडा टी.पी.स्कीम फायनल प्लॉट ७०/१८ येथील जागा मेट्रो स्टेशनच्या एन्ट्री-एक्झिट च्या कामासाठी महामेट्रोस र.रू.१/- या नाममात्र दराने ३० वर्षे कालावधीकरीता हस्तांतरीत करणेस.

२)सन २०२०-२१ च्या रेडी रेडीरेकनरनुसार होणारी जागेची किंमत रक्कम रूपये २,०३,००,४५०/- इतकी मेट्रो रेल प्रकल्पामध्ये असणारे पुणे मनपाच्या आर्थिक दायित्वामधून वळती करून घेणेस.

३)मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदींना अधीन राहून सदर करारनामा पुढील कालावधीकरीता नुतनीकरण करणेस.

**विषय क्र.३८०**

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/४४०, दि. १७/०८/२०२१ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १२१ दि. २३/९/२०२१
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.११६२,दि.३०/९/२०२१

विषय- पुणे पेठ पाषाण स.न.२० येथील बॅडमिंटन हॉल, टेबल टेनिस हॉल, लॉन टेनिस मैदान लिव्ह ॲण्ड लायसेन्स

तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ पाषाण स.न.२० येथील बॅडमिंटन हॉल, टेबल टेनिस हॉल, लॉन टेनिस मैदान लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या दोन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक मे.सोमेश्वर फाउंडेशन, पत्ता–अभिमानश्री सोसा. बाणेर रोड, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली मासिक भाडे रक्कम रूपये३३,२१५/- (अक्षरी रक्कम रूपये तेहतीस हजार दोनशे पंधरा फक्त) ही मनपा निर्धारित मासिक भाडे रक्कम रूपये २५,५५०/-(अक्षरी रक्कम रूपये पंचवीस हजार पाचशे पन्नास फक्त)पेक्षा रक्कम रूपये ७,६६५/-(अक्षरी रक्कम रूपये सात हजार सहाशे पासष्ट फक्त) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्ती नुसार, निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.३८१**

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/४४२, दि. १७/०८/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १२४ दि. २३/९/२०२१

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.११६३,दि.३०/९/२०२१

विषय- पुणे पेठ पाषाण लिंक रोड स.न. १२१ पार्ट येथील बॅडमिटन हॉल, योगा हॉल, ॲरोबिक्स हॉलचे लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३वर्षा करीता चालविणेस देणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ पाषाण लिंक रोड स.न. १२१ पार्ट येथील बॅडमिटन हॉल, योगा हॉल, ॲरोबिक्स हॉलचे लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक मे.सोमेश्वर फाउंडेशन, पत्ता–अभिमानश्री सोसा.बाणेर रोड, सोमेश्वरवाडी,पाषाण,पुणे यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली मासिक भाडे रक्कम रूपये ५८,७९९.३५/- (अक्षरी रक्कम रूपये अठ्ठावन्न हजार सातशे नव्यांनो रूपये पस्तीस पैसे फक्त) ही मनपा निर्धारित मासिक भाडे रक्कम रूपये ४४,८८५/-(अक्षरी रक्कम रूपये चव्वेचाळीस हजार आठशे पंच्याऐंशी फक्त) पेक्षा रक्कम रूपये १३,९१४.३५/- (अक्षरी रक्कम रूपये तेरा हजार नऊशे चौदा रूपये पस्तीस पैसे फक्त) ने जास्त असल्याने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्ती नुसार, निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.३८२**

संदर्भः- १) मा.विधी समिती,पुणे मनपा ठ.क्र.८(अ),दि.२४/०६/२०२१.

२) आस्थापना विभागाकडील पत्र जा.क्र.साप्र/आस्था/प्र-७/३१०२,दि.०८/०७/२१

३) मोटार वाहन विभागाकडील पत्र जा.क्र.१४०२,दि.१३/०७/२०२१.

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्र/४८६,दि.३१/०८/२०२१ चे पत्र

५) मा.विधी समिती ठराव क्र.२९ दि. २३/९/२०२१

६) मा.महेश वाबळे, मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांची दि. ३०/९/२०२१ ची उपसूचना

७) मा.स्थायी समिती ठराव क्र.११६४,दि.३०/९/२०२१

विषय:- पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मधील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या हुद्याच्या सेवानियमामध्ये बदल करणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ सेवानियम बदल ७५% नामनिर्देशन व २५% पदोन्नतीने

पुणे महानगरपालिकेकडील आस्थापनेवर नामनिर्देशनासाठी विहित केलेल्या अर्हता धारण केलेले उमेदवार कायमपात्र सेवकामधून पदोन्नतीने संधी मिळण्याकरिता बदल होणेस मोटार वाहन विभागाने शिफारस केली आहे.

वरील संदर्भ क्र.२ व३ चा विचार करता खालीलप्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | प्रचलित तरतूद | प्रस्तावित तरतूद |
|---|---|---|---|---|
| २०८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | नामनिर्देशन -१००%<br>अ)मान्यता प्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी /ऑटोमोबाईल अभियांत्रिकी शाखेची पदविका उत्तीर्ण.<br>ब)किमान ०५ वर्षाचा संबंधित कामाचा अनुभवास प्राधान्य.<br>क)किंवायांत्रिकी //ऑटोमोबाईल अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण. | **नामनिर्देशन-७५% अहर्ता-**<br>अ)मान्यता प्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/ऑटोमोबाईल अभियांत्रिकी शाखेची पदविका/पदवी उत्तीर्ण.<br>ब)किमान ०३ वर्षाचा संबंधित कामाचा अनुभवास प्राधान्य.<br>**पदोन्नती -२५% अहर्ता-**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अहर्ता<br>धारण करणा-या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवा ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पुणे महानगरपालिकेतील कार्यरत वर्ग३ व ४ मधील कार्यरत कर्मचा-यामधून किमान ५ वर्षाचा अनुभव असणारे कर्मचारी यांचेमधून निवड. |

तसेच मोटार वाहन विभागाकडील पर्यवेक्षक (वाहतुक) (डेपो सुपरवायझर) हे पद पदोन्नतीने भरावयाचे असून यास वाहनचालक प्रमुख पदावरील ३ वर्षाचा अनुभव ही अट शिथिल करुन वाहन चालक प्रमुख पदावर काम केल्याचा अनुभव असा बदल करण्यात यावा.

**मा.विधी समितीचा ठराव**

**विषय क्र.३८३**

संदर्भ:-१) मा.कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन यांचे जा.क्र.पीएमसी-२०२१/प्र.क्र.२४/
नवि-२२,दि.०१/०२/२०२१ चे पत्र.
२)मा.सरपंच ग्रामपंचायत ता.हवेली,जि.पुणे यांचेपत्र जा.क्र.८०,दि.१२/११/२०२०
३)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/२९६,दि.०१/०७/२०२१ चे पत्र.
४) मा.विधी समिती ठराव क्र.२०,दि.२२/७/२०२१

विषय:- मौजे निरगुडी,ता.हवेली या गावाचा पुणे महानगरपालिके मध्ये समावेश होणेबाबत पुणे महानगरपालिकेचे अभिप्राय शासनास कळविणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे-

पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील''मौजे निरगुडी या गावाच्या व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील च-होली बुद्रुक या गावा सोबत असलेल्या सुमारे ४ कि.मी. लांबीच्या सामायिक हद्दीमुळे भौगोलिक दृष्ट्या मौजे निरगुडी पुणे महानगरपालिका हद्दीपेक्षा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाक्षेत्राशी अधिक संलग्न आहे. पुणे महानगरपालिका हद्दीतील लोहगाव या गावासोबत मौजे निरगुडीची केवळ ७०० मी.हद्द सामायिक असून या हद्दीपासून निरगुडी गावठाण यामध्ये प्रामुख्याने फॉरेस्टचे क्षेत्र आहे. तसेच मौजे निरगुडी या गावांमध्ये नागरीसेवा सुविधांसाठी लागणारी आरक्षणे व सक्षम अशा रस्त्यांचे जाळे यांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे मौजे निरगुडी हे गाव पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करावयाचे झाल्यास अस्तित्वातील नागरी सोयीसुविधांवर मोठ्या प्रमाणात ताण पडणार आहे. तसेच नागरी सुविधांचे सक्षमीकरण करणे, आवश्यक तेथे नव्याने सुविधा निर्माण करणे यासाठी अतिरिक्त सेवकवर्ग व निधी यांचीआवश्यकता लागणार आहे.वरील सर्व बाबींचा विचार करता मौजे निरगुडी हे गावपुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट करणे योग्य होणार नाही.''अशा आशयाचा मा.महापालिका आयुक्त यांचा अभिप्राय मे. शासनास पाठविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४२, दि. /९/२०२१ चा झाला आहे.)**

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.३८४**

संदर्भ – १) मा.अमोल बालवडकर,अध्यक्ष , शहर सुधारणा समिती यांचे दि.२/१२/२०१९ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२४,दि.२३/१२/२०१९
३) मनपा ठराव क्र.८६४,दि.२०/१/२०२०

----

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.०९ मौजे बालेवाडी स.नं.५१ येथील १८ मी.डी.पी.रस्ता ते उत्तर दक्षिण असा बालेवाडी गावठाण पर्यंतचा रस्ता हा गेली ५० वर्षापेक्षा जास्त जुना वहिवाटीचा रस्ता आहे. तरी भविष्यातील डेव्हलपमेंटचा विचार करून स्थानिक ग्रामस्थांचा विचार करून सदर रस्ता कलम २०५ अंतर्गत आखण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३४, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३८५**

संदर्भ – १) मा.सुशिल मेंगडे, अध्यक्ष–शहर सुधारणा समिती यांचे दि. १/३/२०१९ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४२६,दि.१/३/२०१९
३) मनपा ठराव क्र.८८२, दि.२१/१/२०२०

----

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे पेठ धायरी स.नं.१३०/८ या ठिकाणी जाण्या येण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने ३० मी.डी.पी. रस्ता लागून स.नं.१३०/४ या मिळकतीमधून १२ मी.रूंदीचा पूर्व–पश्चिम कलम २०५ अन्वये रस्ता आखण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३६, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३८६**

संदर्भ – १.मे. शासन निर्णय क्र.टिपीएस–१८१५/२०९/प्र.क्र.६९/१५/नवि–१३, दि.९/७/२०१८
२.मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र जा.क्र.शअजा/ज/९७९७ दि.२५/९/२०१८
३. मा.सह संचालक, नगररचना पुणे विभाग पुणे यांचेकडील जा.क्र. पुणे विभाग/कलम ३७(१कक)/वि.यो.पुणे मुळ हद्द/मौ.कोथरूड व मौ.मुंढवा/सहसंपुवि/२०३३दि.१३/१२/२०१८ चे पत्र.
४.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१५७८,दि.०१/०३/२०१९ चे पत्र.
५. मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४३५,दि.६/३/२०१९
६. मनपा ठराव क्र.८७५, दि.२१/१/२०२०

विषय– महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१ क क) अन्वये मंजूर विकास योजनेतील मौजे कोथरूड स.नं. १५९,१६० (भाग)१६७ (भाग) यावर आरक्षण क्र.६ अग्निशमन दल तसेच प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान दवाखाना प्रसुतीगृह ही प्रस्तावित आरक्षणे वगळणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

विषयांकीत बाबत मा.सह संचालक नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचेकडे दि.२/१/२०१९ रोजी हरकतदार यांची सुनावणीवेळी पुणे मनपा कार्यकारी अभियंता, बांधकाम विकास विभाग झोन ६ उपस्थित होते . सदर सुनावणीमध्ये लेखी हरकतीनुसार पुणे मनपाचे म्हणणे कायम असून आरक्षणे उठविणेस हरकत आहे असे म्हणणे मांडणेत आले.

प्रत्येक हरकती व सुचनांवर पुणे महानगरपालिकेतर्फे बांधकाम विकास विभागाचे स्पष्ट मत संक्षिप्त स्वरूपात मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मे. शासनाच्या निर्णयानुसार मान्य विकास आराखडयामध्ये हरकती/सुचनांच्या अनुषंगाने फेरबदल करून सदर आरक्षणे रद्द करू नये असे पुणे मनपाचे अभिप्राय नोंदवावा असे खात्याचे मत आहे.

तरी मंजूर विकास आराखडयामध्ये मे. शासनाने प्रसिध्द केलेल्या दि.९/७/२०१८ चे अधिसुचनेनुसार फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१अे अे)ब नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून पुणे महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेचे मत व प्राप्त हरकती अर्जावरील पुणे महानगरपालिकेचे मत व अभिप्राय मा. नियुक्त अधिकारी तथा उप संचालक नगर रचना पुणे विभाग यांजकडे सादर करण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३७, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३८७**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/शहर अभि/१४०,दि.९/७/२०१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३९, दि.३१/७/२०१९

---

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे पेठ लोहगाव स.नं.२०६/३ सि.स.नं.९७ मधून जाणाऱ्या कलम २०५ अन्वये आखलेल्या ९.१४ मी. रूंदीच्या रस्त्याचा कलम २०५ चा दर्जा काढून टाकून त्यास पूर्वीप्रमाणे अंतर्गत रस्ता म्हणून दर्जा देणेबाबत एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ३७ ची कार्यवाही करणेसाठी मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२९६, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३८८**

संदर्भ – १)मे.केंद्रशासन नगर विकास विभाग मंत्रालय यांचे पत्र क्र.के.–१४०११/४५/२०११–UT-IV दि.२०/२/२०१४
२)मा.मुख्य सभा ठराव क्र.६९३ दि.१४/१२/२०१७
३)शासन निर्णय क्र.टी.पी.एस १८१८/२१४५/प्र.क्र./३३६/१८/नवि–१३ दि.१/२/२०१९
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ./१९०, दि.३१/७/२०१९ चे पत्र
५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४७, दि.३१/७/२०१९

---

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिकेने तयार केलेला एकात्मिक सायकल आराखडा मंजूर झाला असल्याने सायकल ट्रॅक संदर्भात मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये खालीलप्रमाणे फेरबदल करणे आवश्यक आहे.

१) पुणे शहर मूळ हद्द व समाविष्ट २३ गावांच्या मान्य विकास योजनेमध्ये पुणे महानगरपालिका सभा ठराव क्र.६९३ दि.१४/१२/२०१७ अन्वये मंजूर केलेल्या एकात्मिक सायकल आराखडयाचा ( Comprehensive Bicycle Master Plan) समावेश करणे.

२) मान्य विकास योजनेमध्ये खालील एकात्मिक सायकल आराखडा नकाशांचा समावेश करणे

अ.सायकल मार्गाचे जाळे (Cycle Network)दर्शविणारा नकाशा

ब. सायकल पार्कींगची ठिकाणे (Cycle Parking Locations)दर्शविणारा नकाशा

तरी वरीलप्रमाणे फेरबदल करण्यासाठी शासकीय राजपत्रात व दैनंदिन वर्तमानपत्रामध्ये जाहिर प्रकटन प्रसिध्द करून त्यावर उपरोक्त अधिनियमावलीमधील तरतूदीनुसार नागरिकांकडून हरकती व सूचना मागविणेस मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३१०, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३८९**

संदर्भ – १) मा.मुख्य सभा ठ.क्र.६७०, दि.१९/१०/२०१८
२) दै.पुढारी व इंडियन एक्सप्रेस मधील जाहिर प्रकटन दि.२५/०५/२०१९ ( महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना

अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये )
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शहर अभि/६२३,दि.३०/९/२०१९
४) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.२१०,दि.८/११/२०१९

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ येरवडा स.नं.२५५ प्लॉट नं.३०अे ( जुना स.नं.१९ अे +२+१९बी+३५/२, प्लॉ नं.३०अे ) सि.स.नं.३१४६ + ३८०२ ही मिळकत डिफेन्स झोनमधून निवासी झोनमध्ये समाविष्ट करणेसाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) नुसार विहीत कार्यवाही पूर्ण झाली असल्याने मे.राज्य शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३४८, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३९०</u>**

संदर्भ – १) मे.औदयोगिक अधिकारी (ULC) औदयोगिक आयुक्त यांचे पत्र जा.क्र. ULC/४०१८, दि.१७/९/१९७७
२) मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करणेत आलेले पत्र जा.क्र. शआजा/ज/१२६०९ दि.१५/११/२०१८
३) मे.महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ शासन निर्णय क्रमांक-टीपीएस-१८१९/१६०७/प्र.क्र.१६६/१९/नवि-१३, दि. १८/९/२०१९
४) कमिन्स इंडिया लि. यांचे दि.१४/१०/२०१९ रोजीचे पत्र
५) या विभागाचे मा.सह संचालक नगर रचना विभाग पुणे यांना जा.क्र. शअजा/ज/१२०२२ दि.६/११/२०१९ अन्वये आक्षेप पत्र
६) मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, पुणे विभाग यांचे क्र. २०६६ दि.१६/११/२०१९ व जा.क्र. ५२ दि.८/१/२०२०अन्वयेचे पत्र.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/११६१ दि.२/३/२०२० चे पत्र.
८) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.७,दि.१२/६/२०२०
९) मनपा ठराव क्र.१३१ दि.२१/१२/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे मौजे कोथरुड स.नं. ४२ ते ४५ कमिन्स इंडिया लि. येथील EWS-९ आरक्षण मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१क क)(क) अन्वये फेर बदलास पुणे महानगरपालिकेचे खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

१) सदर मिळकतीबाबत नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमानुसार सदर EWS-9 आरक्षणाची जागा पुणे मनपास विना मोबदला ताब्यात मिळणे आवश्यक आहे.
२) सदर मिळकतीचे मंजूर लेआऊट नुसार EWS-9 आरक्षणाची जागा रस्ताभिमुख असून सर्व पायाभुत सोईसुविधा सदर मिळकतीस उपलब्ध असल्याने सदर आरक्षण त्याच ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी विकसित होणे आवश्यक आहे.
३) मे.कमिन्स इंडिया लि. यांनी संदर्भ क्र. ५ चे पत्रासोबत उंड्री येथील मिळकतीचे मुल्यांकन जोडले आहे त्यानुसार स.नं. २७ मधील जागेचे मुल्यांकन र.रु. १४.१६ कोटी व स.नं. २३ मधील जागेचे मुल्यांकन र.रु.१३.९६ कोटी होत आहे. तथापि कोथरुड येथील मुळ आरक्षित मिळक़तीचे मुल्यांकन र.रु.१४६.१४ कोटी होत आहे. म्हणजेचे उंड्री येथील क्षेत्र पुणे मनपास दिल्यास पुणे मनपाचे खुप मोठे नुकसान होणार आहे. तरी सदर आरक्षणासाठी पुणे मनपास कोथरुड येथील जागा मिळणेस विनंती आहे.

त्याप्रमाणे शासनास कळविणे गरजेचे आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून पुणे महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेचे मत व प्राप्त हरकती अर्जावरील पुणे महानगरपालिकेचे मत व अभिप्राय मा.नियुक्त अधिकारी तथा उप संचालक, नगर रचना, पुणे विभाग यांजकडे सादर करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८४, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३९१</u>**

संदर्भ – १) मा.उमेश गायकवाड व मा.युवराज बेलदरे यांचे दि.१४/२/२०२० चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८४, दि.१४/२/२०२०

३) मनपा ठराव क्र.१८४ दि.२१/१२/२०२०

----

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

पुणे पेठ मुंढवा स.नं.३८ त्याच प्लॉटमधील डी पी प्रमाणे ६ मी वापरातील रस्ता असून सदर रस्ता अपुरा असल्यामुळे त्याच प्लॉटमधील १२ मी. रस्ता अधिक ६ मी. लागुन असलेला रस्ता असा मिळून त्या रस्त्याची रूंदी १८ मी होणार असल्यामुळे रस्ता मोठा होणार आहे.तरी त्याच पश्चिम भागातील रस्ता शिफ्ट करण्यात यावा.सदरचा प्लॉट हा एकच मालकाचा असल्यामुळे कोणतेही आरक्षण कमी होणार नाही. तरी सदरचा रस्ता हा लवकरात लवकर शिफ्ट करण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१७९, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३९२</u>**

संदर्भ – १) मा. उमेश गायकवाड व मा. अजय खेडेकर यांचे दि.५/११/२०१८ चे पत्र

२) मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.२९१ दि.५/११/२०१८

३) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/७६, दि.११/६/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय

४)मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.११७ दि.११/०७/२०१९

५)मा.उमेश गायकवाड यांचे दि.१४/२/२०२० यांचे फेरविचाराचे पत्र

६) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८५, दि.१४/२/२०२०

७) मनपा ठराव क्र.१८५ दि.२१/१२/२०२०

विषय– पुणे कोरेगाव पार्क कल्याणीनगर येथील स.नं.१९ या ठिकाणी मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानासाठी जागा आरक्षित आहे परंतु सदरचे आरक्षण हे लोकसंख्येच्या तुलनेने कमी आहे तरी स.नं. ३४ या ठिकाणी मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानासाठी जागा आरक्षित करणेबाबत.

----

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

शहर सुधारणा समिती ठराव क्र.११७ दि.११.०७.२०१९ चा फेरविचार करण्यात आला.

कल्याणीनगर–मुंढवा–कोरेगाव पार्क येथे मोठा चौक आहे. याठिकाणी जाण्यासाठी फक्त ६ मीटर रूंदीचा रस्ता असल्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते. व पार्किंगला जागा शिल्लक राहत नाही. या भागात २ लाखांपेक्षा जास्त मुस्लिम समाजाची लोकवस्ती आहे. या भागातील अनेक मुस्लिम समाजाचे लोक याठिकणी असलेल्या मस्जिदीमध्ये नमाज पठणासाठी येत असतात. तसेच याठिकाणी मुस्लिम समाजाची दफनभूमी आहे. तरी सदर ठिकाणी वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी सदर ठिकाणी सदरचा रस्ता ९ मीटर रूंदीचा आखण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप–शहर सुधारणा समिती ठराव क्र.११७ दि.११.०७.२०१९ चा निरस्त करण्यात आला आहे.)

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८०, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३९३</u>**

संदर्भ – १) मा.प्रकाश ढोरे व मा.विजय शेवाळे यांचे दि.१४/२/२०२० चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८६, दि.१४/२/२०२०

३) मनपा ठराव क्र.१८६ दि.२१/१२/२०२०

---

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

औंध प्रभाग क्र.८ भाऊ पाटील रोड ते महादेव मंदिर ते गणपती विसर्जन घाटावर जाण्यासाठी सर्व्हे नं.२ अ येथून कलम २०५ अन्वये ६.०० मी.रस्ता आखण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८१, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३९४</u>**

संदर्भ – १) मा.मुख्य सभा ठराव क्र.३३०,दि.३०/०९/२०१८
२) कार्यालयीन आदेश,जा.क्र.मआ/कलम/२०५/३०९,दि.२७/०३/२०१७
३) विषयांकित बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कारवाई करणेस दिलेले जाहीर प्रकटन१/७०७ दि.६/१/२०१८
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१२, दि.१३/४/२०१८ चे पत्र
५) शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१ दि.२०.०४.२०१८
६) मा.अमोल बालवडकर अध्यक्ष, शहर सुधारणा समिती व मा.सौ.हर्षाली माथवड यांचे दि.२७/२/२०२० चे फेरविचाराचे पत्र
७) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३०४, दि.२८/२/२०२०
८) मनपा ठराव क्र.१९३ दि.२१/१२/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१ दि.२०.०४.२०१८चा फेरविचार करण्यात आला.

पुणे महानगरपालिकेच्या मान्य विकास आराखडयातील बालेवाडी, स.नं.४२,४३,४४,४५ व ४७ दरम्यानचा २४.० मी.डी.पी.रस्ता व त्यापुढे मुळा नदीवर पिंपरी–चिंचवड महानगरपालिका हद्द व पुणे महानगरपालिका हद्द या दरम्यान बांधण्यात आलेल्या पुलाच्या आखणीशी २४.० मी.डी.पी.रस्ता सुसंगत नसल्याने आणि नविन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखण्यात आलेल्या रस्त्याच्या आखणीच्या अनुषंगाने, २४ मी.रस्त्याच्या आखणीअंतर्गत येत असलेले क्षेत्र मुळा नदीकाठच्या ३० मी.रस्त्यापर्यंत निवासी भागात व ३० मी रस्त्यानंतर रिव्हर प्रोटेक्शन बेल्ट या आरक्षण क्षेत्रात बदल करण्यास त्याचप्रमाणे बालेवाडी येथील एचडीएच–१ हे आरक्षणाच्या क्षेत्रात नवीन ३० मी रस्त्याच्या आखणीमुळे घट होवून सदर क्षेत्र २४५००.०० चौ.मी.ऐवजी २४२००.०० चौ.मी.अशाप्रमाणे बदल करण्यास गौण फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) मे. शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप–शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१ दि.२०.०४.२०१८ चा निरस्त करण्यात आला आहे.)

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८२, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३९५</u>**

संदर्भ – १) मा. मारूती (नाना)सांगडे, मा.ऐश्वर्या आशुतोष जाधव व मा.अनिल(बॉबी)टिंगरे यांचे दि.२४/२/२०२० चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३०५,दि.१३/३/२०२०
३) मनपा ठराव क्र.२१० दि.२१/१२/२०२०

----

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

प्रभाग क्र.१ (कळस–धानोरी) मधील कळस स्मशानभूमीला जोडला जाणारा रस्ता स.नं. १२६ या ठिकाणी काही स्थानिक कुटुंबियांनी मालकी हक्क सांगत तार कंपाउंडने बंद केला आहे. येथील स्मशानभूमी सुमारे १०० वर्ष जुनी असून येथील परिसरातील सर्व अत्यंविधी याच स्मशानभूमीमध्ये करण्यात येतात. कळस परिसर पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतरही सदर रस्त्यावर पालिकेच्या माध्यमातून अनेक विकास कामे आजतागायत करण्यात आलेली असून सार्वजनिक वहिवाटीचा गाव रस्ता म्हणून ओळखला जातो. मात्र सध्या येथील रस्ता बंद केल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये अत्यंविधी करण्याबाबत सभ्रंम व असंतोष आहे. कळस गावठाणासह आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांचेही अंत्यविधी याठिकाणीच करण्यात येत असल्यामुळे महापालिका अधिनियम कलम २०५ अन्वये येथील रस्ता त्वरीत आखून देण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८३, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.</u>३९६**

संदर्भ – १) मा.अवर सचिव,नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे आ.क्र.९९३३ दि.२४/२/२०२०
२) मा.अध्यक्ष स्थायी समिती व मा.सभासद श्री.विशाल तांबे आ.क्र.९९२८दि.२४/०२/२०२० रोजीचे पत्र

३) मा.मुख्य सभा ठराव क्र.४७६ दि.१०/०८/२०१६
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ/१२१८ दि.१३/३/२०२० चे पत्र.
५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१४,दि.१३/३/२०२०
६) पुणे मनपा ठराव क्र.२११,दि.२१/१२/२०२०
७) मनपा ठराव क्र.१०७, दि.२०/७/२०२१

विषय– पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील धनकवडी स.नं.३२/२/१२ ते १६/३ येथील महाराष्ट्र शासनाच्या मालकीची ३०००.०० चौ.मी.जागा बालनाटयगृह व बालभवन या प्रयोजनाकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

धनकवडी स.नं.३२/२/१२ ते १६/३ येथील महाराष्ट्र शासनाच्या ३०००.०० चौ.मी मालकीच्या जागेवर, बालनाटयगृह व बालभवन आरक्षण टाकणेकरीता एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यास, त्या अनुषंगाने नागरीकांच्या हरकती व सूचना मागविणेसाठी दैनंदिन वर्तमानपत्रात जाहिर प्रकटन देणेस, शासकीय राजपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबतची कार्यवाही करणेस , प्राप्त हरकती व सूचनांवर मा. शहर अभियंता यांचेकडे सुनावणी घेण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४३७, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३९७**

संदर्भ– १) मा.ॲड् अविनाश राज साळवे, मा.उमेश ज्ञानेश्वर गायकवाड, मा.गणेश ढोरे,मा.सौ.शितल अजय सावंत मा. अजय खेडेकर, मा.सौ.अश्विनी किशोर पोकळे, मा.सौ.हेमलता निलेश मगर, मा.सौ.चाँदबी हाजी नदाफ , सौ.कालिंदा मुरलीधर पुंडे यांचे दि. १२/२/२०२१ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४५,दि.१२/२/२०२१
३) पुणे मनपा ठराव क्र.४४१,दि.१८/३/२०२१
४) मनपा ठराव क्र.२८, दि.२१/६/२०२१

----

मा. शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरामधील ब–याच ठिकाणी अनाधिकृत जाहिरात होर्डिंग्ज उभारण्याचे व पुणे शहर विद्रुपीकरण करण्याचे काम राजरोसपणे चालू आहे. सदरचे अनाधिकृत जाहिरात होर्डिंग्ज उभारणारे कायदेशीर यंत्रणेचा दुरूपयोग करून महानगरपालिकेची व मे.न्यायालयाची दिशाभूल करीत असतात. बेकायदेशीर होर्डिंग्जवर जाहिरात देणा–या जाहिरातदारामुळे सदर बेकायदेशीर होर्डिंग्ज उभारणा–या व्यक्ती व जाहिरात संस्थांना प्रोत्साहन मिळत आहे. तसेच त्यामुळे पुणे महानगरपालिकेचा जाहिरात होर्डिंग्जच्या महसूलीमध्ये आर्थिक तूट निर्माण होऊन पुणे मनपाच्या उत्पन्नामध्ये प्रचंड नुकसान होत आहे.

तरी पुणे महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसान रोखण्याकरिता सदरच्या बेकायदेशीर होर्डिंग्ज उभारणारे जाहिरातदार, जाहिरात संस्था व जागा मालक यांना कायदेशीर जरब बसण्यासाठी तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४३, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३९८**

संदर्भ – १)शासन निर्णय क्र.टिपीएस–१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) कलम २०(३)/नवि–१३ दिनांक ०२/१२/२०२०
२)शासन निर्णय क्र.टिपीएस–१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) कलम २०(३)/पूरक पत्र/ नवि–१३ तसेच सदर सूचनेस दिनांक ०९/१२/२०२०
३)मा.सह संचालक नगररचना पुणे विभाग,पुणे यांचेजा.क्र.मं.ए.वि.वप्रो.नि./कलम ३७(१कक) व २०(३) सूचना/सहसंपुवि/२७८ दि.१६/०२/२०२१.
४)मा.विभागीय सहसंचालक नगररचना पुणे यांच्याकडे शहर अभियंता कार्यालय पुणे महानगरपालिका यांच्यामार्फत जावक क्र.शअजा/१२६१५ दि.३१/१२/२०२० अन्वये नोंदविलेली हरकत.

५)मा.विभागीय सहसंचालक नगररचनापुणे यांच्याकडे आयुक्त कार्यालय पुणे महानगरपालिका यांच्यामार्फत जावक क्र. शअजा/ज/१४०४८ दि. २१/१/२०२१ अन्वये नोंदविलेली हरकत.

६)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१५८ दि.३१.०५.२०२१ चे पत्र.

७) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.८८,दि.१२/८/२०२१

विषय– महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील काही तरतुदीमध्ये सुधारणा करणे संदर्भात कलम ३७ (१ कक) (क) व कलम २०(३) अन्वये सूचना दिनांक ०२/१२/२०२० तसेच सदर सूचनेस दिनांक ९/१२/२०२० रोजीचे पूरक पत्र

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१७ मधीलकलम १५.४ नुसार असलेली ॲमीनिटी स्पेस बाबतची तरतूद कायम ठेवणे व भाग १० मध्ये सिटी स्पेसिफिक मध्ये समावेश करणे उचित होईल.'' असा अभिप्राय तसेच उर्वरित हरकती बाबतचे अभिप्राय परिशिष्ट अ मध्ये नोंदविले आहेत. त्यास मा.विभागीय सहसंचालक नगररचना पुणे यांचेकडे हरकत नोंदविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४९, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.३९९**

संदर्भ – १) लोकशाही दिनातील श्री.ताहेर शेख व इतर यांची तक्रार व टोकन क्र **१)**२०२/१५.दि.५/१०/१५, **२)**६९ दि.१/६/१५, **३)**३०२/१५ दि.०८/१२/१५

२) मा.मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/१२०८ दि.०२/०१/२०१७ चे पत्र.

३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १२,दि.१७/०४/२०१७

४) मा.संजय घुले यांचे दि. १२/०८/२०२१ चे फेरविचाराचे पत्र.

५) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.९१,दि.१२/८/२०२१

विषय– पुणे पेठ हडपसर स.नं.४२ ब या मिळकती मधून दक्षिणउत्तर ६.० मी.रूंदीचा रस्ता आखणे बाबत.

----

मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. १२ दि.१७/०४/२०१७ चा फेरविचार करण्यात आला. तसेच मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ हडपसर स.नं.४२ ब या मिळकती मधून दक्षिणउत्तर ६.० मी.रूंदीचा रस्ता आखण्याबाबत मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे नकाशात **''अ ब''** या अद्याक्षराने स.नं.४२ ब हि.नं.२अ व ३ या जागेतून ६५.० मी लांबीचा व ६.० मी.रूंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये आखण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप:यापूर्वी शहर सुधारणा समितीत झालेला ठ.क्र.१२,दि.१७/०४/२०१७ चा निरस्त करण्यात आला आहे.)

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४७, दि.२२/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४००**

संदर्भ – १) मा. धनराज घोगरे यांचे दि. ११/०९/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४४, दि.११/९/२०२०

३) मनपा ठराव क्र.९ दि.२१/१२/२०२०

विषय– संगमवाडी, पुणे शहर, नगर भुमापन क्र. ३७५ व ३७६ येथील नाईक बेट ही जागा रिझर्वेशनसाठी ताब्यात घेणेबाबत.

----

मा. शहर सुधारणा समिती मध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून –

नगर भुमापन क्र. ३७५ व ३७६, संगमवाडी, पुणे शहर येथील १३.१७ हेक्टर ही जमीन पुणे महानगरपालिकेच्या मान्य विकास आराखडयामध्ये PK २३ व PK २६ या रिझर्वेशनखाली पार्कसाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. ही जागा नदीपात्रामधोमध असुन, जैवविविधता कायम ठेवणेसाठी अत्यंत

महत्वाचे आहे. या जमीनीवर संपुर्णपणे हरित आच्छादन आहे. ही आरक्षित जमीन पुणे महानगरपालिकेने ताब्यात घेवुन त्याचा योग्य पध्दतीने जैवविविधता संर्वधनासाठी विकास करणे महत्वाचे आहे. यासाठी ही जमीन सत्वर पुणे महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी व विकास करावा.

मान्य विकास आराखडयातील जागा ताब्यात घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०१७ मधील कलम २३.०० नुसार **'रिझर्वेशन क्रेडिट बॉड'** तत्वावर ताब्यात घेण्यात यावी, जेणेकरून सदर जमीनीवरील आरक्षण त्वरित विकसित करण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्यसभेकडे शिफारस आहे

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८५, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४०१**

संदर्भ – १) मा. अमोल बालवडकर यांचे दि. ११/०९/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४८, दि.११/९/२०२०
३) मनपा ठराव क्र.१३ दि.२१/१२/२०२०

विषय– बाणेर पुणे शहर सर्व्हे नं. १०९/२ येथील पुणे महानगरपालिकेच्या जागेत अत्याधुनिक हॉस्पिटल व महावितरण मंडळाचे सब स्टेशन करणेबाबत.

----

मा. शहर सुधारणा समिती मध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून

सर्व्हे नं. १०९/२ बाणेर, पुणे शहर येथील १३७०० चौ.मी. ही जमीन पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. आराखडयामध्ये यामधील २९९० चौ.मी जागा S & H R C 2 या रिझर्वेशनखाली वैद्यकीय पुर्नवसन केंद्रासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित जमीनीपैकी २५०० चौ.मी. जमीनीवर C 2 आरक्षणाच्या बदल्यात सुमारे ४५६०० चौ.मी. बांधीव क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. या ठिकाणी सुसज्ज कोविड हॉस्पिटल पुणे महानगरपालिकेडून तयार करण्यात आलेले आहे व त्याचा वापर चालु आहे. S & H R C 2 सह उर्वरित क्षेत्र सुमारे ११२०० चौ.मी. क्षेत्र मोकळे आहे.

औंध–बाणेर–बालेवाडी भागाच्या सार्वांगिण विकासासाठी या जागेचा योग्य विनिमय करणेसाठी खालीलप्रमाणे मान्यता द्यावी,अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

१) औंध–बाणेर–बालेवाडी सह पश्चिम पुण्यासाठी सुसज्ज हॉस्पिटलची गरज आहे. त्यामुळे यातील S & H R C 2 सह ७००० चौ.मी. जमीनीवर हॉस्पिटल प्रस्तावित करण्यात यावे.

२) औंध–बाणेर–बालेवाडी भागातील अपु–या वीजपुरवठयावर कायमचा तोडगा काढणेसाठी ३००० चौ.मी. जागेवर १०० MVA क्षमतेचे वीज पारेषण केंद्र प्रस्तावित करण्यात यावे व ही जागा महावितरण मंडळास हस्तांतरित करण्यास.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२०४, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४०२**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५३९ दि.०७/०९/२०२१ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०९, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे आबेगांव खुर्द येथील स.नं.५/४ व ५/५/४(जुना) स.नं.५/४अ/५/४/४ (नवा) | १२ मी. (एकूणदोन) डी.पी.रस्ता | १)अनिल मच्छिंद्र जाधव २)सुनिल मच्छिंद्र | विरळ वस्ती | १३१६.०९ चौ.मी | ९३०.९८चौ.मी. X २.०० = १८६१.९६ चौ.मी. | ००५८६० | सप्टेंबर २०२१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जाधव | | | | | |

**विषय क्र.४०३**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५४० दि.०७/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११०, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑगस्ट २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणेहडपसर, स.नं.३०० ब/१(पै) | १२ मी. डी.पी. रस्त्याने | मधुकर निवृत्ती न्हावले | विरळ वस्ती | १८००.०० चौ.मी | १२८३.७९ चौ.मी. X २.१५ = २७६०.१४ चौ.मी. | ००५८७६ | ऑगस्ट २०२१ |

**विषय क्र.४०४**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५४२ दि.०७/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१११, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.४९/१अ, शाहू नगर मुंढवा, पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.डी.पी. असोसिएटस | सुधारीत नियमावली दि.१५(१)-५ नुसार झोन नाहीत | ३७०५.१९ चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसनविंग बी योजनेअंतर्गतइमारतीचेजोते बांधकाम पुर्णत्वापोटीचा २५% टिडीआर) | ००४६२७ | सप्टेंबर २०२१ |

**विषय क्र.४०५**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५४३ दि.०७/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११२, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.२९६/अ/१/४/२, हडपसर, शेवकरवस्ती,पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.यशप्रॉपर्टीज | सुधारीत नियमावली दि.१५(१)-५ नुसारझोननाहीत | १३४१.५८ चौ.मी. (इमारतीचे जोते पुर्णत्वापोटीचा २५% टी.डी.आर.) | ००४६२६ | सप्टेंबर २०२१ |

**विषय क्र.४०६**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५४४ दि.०७/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११३, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **मिळकतीचा तपशील** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचेनाव** | **टिडीआर झोन** | **क्षेत्रचौ.मी** | **डीआरसी क्र.** | **डीआरसी दिल्याचामहिना** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,हडपसर स.नं.११०अ/१, हिस्सा नं.४+९ब+१२ रामटेकडी | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. | सुधारीत नियमावली दि.१५(१)-५ नुसारझोननाहीत | २९४४.७७ चौ.मी.(इमारत 'जी' चे संपूर्ण बांधकामापैकी आरसीसी व वीट बांधकाम पूर्णत्वापोटी निर्माण होणा-या ३५%) | ००४६२४ | सप्टेंबर २०२१ |

**विषय क्र.४०७**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५४५ दि.०७/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११४, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **मिळकतीचा तपशील** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचेनाव** | **टिडीआर झोन** | **क्षेत्रचौ.मी** | **डीआरसी क्र.** | **डीआरसी दिल्याचा महिना** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भांबुर्डा,टि.पी.स्किम नं.१ फा.प्लॉट क्र.५६०,सि.स.नं. ११९७, रामनारायण बंगला,शिवजीनगर, पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.पलाश रियालटर्स एल.एल.पी. | सुधारीत नियमावली दि.१५(१)-५ नुसारझोननाहीत | १२७६.७४ चौ.मी.(इमारतीचे जोते पुर्णत्वापोटीचा २५% टी.डी.आर.) | ००४६२५ | सप्टेंबर २०२१ |

**विषय क्र.४०८**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५६२ दि.१३/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११५, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **आरक्षणाचा स.नं.** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचेनाव** | **टिडीआर झोन** | **७/१२ नुसार क्षेत्र** | **टिडीआर देय क्षेत्रचौ.मी** | **डीआरसी क्र.** | **डीआरसी दिल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बालेवाडी, स.नं.३५ पैकी | गार्डन (जी-१) | मे.आसमान रियल्टर्स तर्फे भागीदार अनिक रमेशशाह | विरळ वस्ती | ११४१.०० चौ.मी | ११४१.००चौ.मी. (७/१२ उता-यानुसारक्षेत्र) X२.००=२२८२.०० चौ.मी. पैकी १)१९७८.४६ चौ.मी. २)३०३.५४ चौ.मी. | ००५७६३ ००५७६४ | सप्टेंबर २०२१ |

<u>**विषय क्र.४०९**</u>

संदर्भ - १) मा.महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र.मआ/टीडीआर/५६३ दि.१३/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११६, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणेकसबापेठ सि.स.नं.१२०२अ (पै), | २४ मी. डि.पी. रस्ता | १)अमित चंद्रकांत मंचरकर २)अतुलचंद्रकांत मंचरकर ३)अभिजित चंद्रकांत मंचरकर तर्फे कुलमखत्यारधारक आदित्य लक्ष्मीकांतजोशी | दाटवस्ती | २३.१२ चौ.मी | १७.७२ चौ.मी. X३.१०=५४.९३ चौ.मी. | ००५८७५ | सप्टेंबर २०२१ |
| | पुणेकसबापेठ सि.स.नं.१२०३ (पै) | | १)विजय गोविंदवांकर २)अमित चंद्रकांत मंचरकर ३)अतुलचंद्रकांत मंचरकर ४)अभिजित चंद्रकांत मंचरकर तर्फे कुलमुखत्यारधारक आदित्य लक्ष्मीकांतजोशी | | ३२.४० चौ.मी. | २१.१६ चौ.मी.X३.१०= ६५.५९ चौ.मी. | ००५८७७ | सप्टेंबर २०२१ |
| | | | | एकूण | ५५.५२ चौ.मी. | १२०.५२ चौ.मी. | | |

<u>**विषय क्र.४१०**</u>

संदर्भ - १) मा.महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र.मआ/टीडीआर/५६४ दि.१३/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११७, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बालेवाडी, स.नं.३५ (पैकी) | गार्डन (जी-१) | I)मे.सुखवानी चावला इरेक्टर्स प्रा.लि.तर्फे डायरेक्टर गुरूमुखजे.सुखवानी II)पराग जयंत महाडिक III)संदिप रसिकलाल शहा व IV)आधार सुनिशकुमार चड्ढा | विरळ वस्ती | २०९५.०० चौ.मी | २०९५.०० चौ.मी. X २.०० = ४१९०.०० चौ.मी.(पैकी) १)१९०३.२० चौ.मी. २)९५१.६० चौ.मी. ३)४७५.८० चौ.मी. ४)४७५.६० चौ.मी. | ००५८६८ ००५८६९ ००५८७० ००५८७१ ००५८७२ | सप्टेंबर २०२१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ५)३८३.८० चौ.मी. | | |

**विषय क्र.४११**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५६५ दि.१३/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११८, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे येवलेवाडी येथील स.नं.१०/२/५, १०/४/२(पै),१०/४/४ (पै) व १०/४/५अ (पै) | प्लेग्राउंड (पी.जी.-१) सहअॅमेनिटी स्पेस | १)शब्बीर जे.गोध्रावाला, २)सुमन जे.गोध्रावाला, ३)ईस्माईल हसनअली शाईवाला ४)सज्जाऊद्दीन हसनअली शाईवाला तर्फे कुलमुखत्यारधारक मे.मंत्रा इन्फ्रा डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार मे.मंत्राप्रॉपर्टीज अॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे संचालक श्री.रोहितघनश्याम गुप्ता | विरळवस्ती | ७७००.०० चौ.मी | ७७००.०० चौ.मी. X २.०५ = १५७८५.०० चौ.मी.(पैकी)<br>२०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>२०००.००<br>३०००.००<br>२७८५.०० | ००५८६१<br>००५८६२<br>००५८६३<br>००५८६४<br>००५८६५<br>००५८६६<br>००५८८७ | सप्टेंबर २०२१ |

**विषय क्र.४१२**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५६६ दि.१३/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११९, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणेकात्रज येथीलजुना स.नं.१७ (पैकी) नवा स.नं.२०/३/१ | १८ मी.डि.पी. रस्ता, १२ मी. सर्व्हिस रस्ता आणि ६०मी. डि.पी.रस्ता, प्लेग्राऊंड (पीजी-३७) | जैन रिअलईस्टेट प्रमोटर्स प्रा.लि.तर्फे संचालक श्री.भंवरलाल पूनमचंद जैन | विरळ वस्ती | ९१००.०० चौ.मी(स.नं. २०/३/१ या मिळकतीचेए कूणक्षेत्र) | ५९८२.३४ चौ.मी. X २.०५ = १२२६४.८२ चौ.मी.पैकी<br>२५००.००<br>२५००.००<br>३५००.००<br>३७६४.८२ | ००५८७८<br>००५८७९<br>००५८८०<br>००५८८१ | सप्टेंबर २०२१ |

**विषय क्र.४१३**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/५७० दि.१३/०९/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२०, दि.२३/९/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचेनाव | टिडीआर झोन | क्षेत्रचौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फायनलप्लॉट क्र.१६०,स.नं.५३९अ/ १६अ,सि.स.नं.३६२,३६३ (पै.),घोरपडे पेठ, लोहियानगर,पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.टारगेट इन्फ्रा डेव्हलपर्स एल.एल.पी. | सुधारीत नियमावली दि.१५(१)-५ नुसारझोननाहीत. | ८९३०.९२ चौ.मी. (इमारत 'एच','जे' व 'के' चे आर.सी.सी. वीट बांधकामापोटी देय ३५% टी.डी.आर.) | ००४६२३ | सप्टेंबर २०२१ |

**विषय क्र.४१४**

संदर्भ:- १) मा.महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र.मआ/साप्र/४८४,दि.३१/०८/२०२१ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२२, दि.२३/९/२०२१

विषय:- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील उप अभियंता (यांत्रिकी) वर्ग-२ या पदावरून कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) वर्ग-१ या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत

----

मा.महापालिकाआयुक्त यांनीत्यांच्यापत्रात दिलेलीकारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) वर्ग-१ (वेतनश्रेणी १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६०० (शासनाप्रमाणे)+मान्य भत्ते) या पदाची रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने भरणेसाठी पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या सेवकाची तसेच शासनाकडील वेळोवेळीचे प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील सेवक यांची तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | नाव | प्रत्यक्ष जातीचा गट | पदोन्नतीचा गट | शैक्षणिक पात्रता | उप अभियंता नेमणूक दिनांक | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.उगले गणेश शंकर | अज | सेवाज्येष्ठतेनुसार | बी.ई.(मेकॅ) | ०९/१२/२०१६ | ३१/०३/२०३१ |

**विषय क्र.४१५**

संदर्भ:-१) मा.राहूलभंडारे व मा.संदिपनामदेव ज-हाड यांचे दि. २७/०८/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२६, दि.२३/९/२०२१

----

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून-

वडगावशेरी भागातील वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून रस्त्याचे रूंदीकरण करणे गरजेचे आहे. सदरचा रस्ता खूपच अरूंद असल्याने सकाळसंध्याकाळ वाहतूक कोंडी होत आहे. वडगावशेरी मध्ये सध्या खूप मोठ्याप्रमाणात विकासकामे होत असून अस्तित्वातील रस्ते अपुरे पडत आहे. तरी खालील पर्यायी रस्ता २०५ कलमान्वये विकसित झाल्यास नागरिकांना रस्ते उपलब्ध होऊन रहदारी सुरळीत होणार आहे.

स.नं.१० मध्ये खूप मोठे प्रकल्प विकसित झाले असून नागरिक तेथे वास्तव्यास आहे. परंतु नागरिकांना येणे-जाणेसाठी ४ मीटर रूंदीचा रस्ता उपलब्ध आहे. सदर अस्तित्वातील रस्ता १८.०० मीटर रूंदीचा केल्यास नागरिकांना एक चांगला रस्ता उपलब्ध होणार आहे. सदर उत्तर दक्षिण रस्ता-३०० मीटर पर्यंत व नंतर पूर्वपश्चिम रस्ता १०० मीटर पर्यंत विकसित करून तेथील अस्तित्वातील रस्त्यास मिळविण्यास मान्यता देण्यात यावीअशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.महिला व बाल कल्याण समितीचा ठराव**

**विषय क्र.४१६**

संदर्भ – १) मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.शितल सावंत यांचे दि.११/१२/२०१९ चे पत्र.
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.९५, दि.६/१/२०२०

----

मा.महिला व बाल कल्याण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुण्यात अनेक ठिकाणी भाजी विक्रेते आहेत,त्यामुळे मंडई गाळे व हॉकर्स झोन याठिकाणी भाजी विक्री व्यवसाय काही प्रमाणात मंदावला आहे. रोजगाराची समस्या वाढत आहे त्यात अनेक गरजू गरीब महिला रोजगार शोधात आहेत. म्हणूनच आस्तित्वातील व नविन गाळे, मंडई गाळे व हॉकर्स झोन या प्रत्येक ठिकाणी काही गाळे हे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील स्थानिक महिला किंवा म.न.पा.बचत गटातील स्थानिक महिला यांना स्वयंरोजगार मिळावा त्याचे सक्षमीकरण व सबलीकरण व्हावे या हेतूने काही गाळे (१-२) राखीव ठेवण्यात यावे. त्याचबरोबर महिलांना आर्थिक उन्नतीसाठी वाव मिळावा म्हणून गाळ्यांवर तयार खाद्य पदार्थ विकण्याकरिता परवानगी देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३८, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

## मा.नांव समितीचे ठराव

**विषय क्र.४१७**

संदर्भ :- मुख्य सभा ठराव क्र.४, दि.२०/४/२०१७

विषय :- पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

------

वरील विषयांकित बार्बीवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा सोमवार **दि.६/९/२०२१** रोजी **सकाळी ११.३० ( अकरा वाजून तीस मिनिटे )वाजता** विशेष समिती सभागृहात भरली होती.त्यामध्ये खालील विषय मान्य करण्यात आलेले असून त्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| वि.क्र | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नांव | निर्णय |
|---|---|---|---|
| ६७ | प्रभाग क्र.२९ मधील एस.एम.जोशी पूलाकडून वैकुंठ स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता व पत्रकार भवन पासून यशवंत महाराज गणेश विसर्जन घाटाकडे जाणारा रस्ता या दोन्ही रस्त्यास जोडणाऱ्या चौकास. | स्वर्गीय नगरसेवक महेश लडकत चौक | मान्य |
| ६९ | प्लॉट नं.१०३ न्यु टिंबर मार्केट येथील चौकाला | कै.त्रिभुवनशेठ विठ्ठलजी किराड | मान्य |
| ७० | प्रभाग क्र.९ब,बाणेर येथील स्मशानभूमीस | मुक्तिधाम स्मशानभूमी बाणेर | मान्य |
| ७१ | प्रभाग क्र.३९क, मधील स.नं.३५ श्रेयस गार्डन शेजारील हॉलला | राजमाता जिजाऊ बहुउद्देशिय हॉल | मान्य |
| ७२ | प्रभाग क्र.१९ मधील एकबोटे कॉलनी, शंकरशेठ रोड, नंदिनी हॉटेल जवळील चौकास | कै.दत्ताभाऊ लक्ष्मण ढावरे | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| ७३ | प्रभाग क्र.१८क, मधील ५४९ शुक्रवार पेठ शिवाजी रोड येथील चौकास | पुण्यातील पहिले मोठे मूर्तिकार कै.नामदेवराव नारायणराव वाघ उर्फ एन.एन.वाघ चौक | मान्य |
| ७४ | प्रभाग क्र.१८क, मधील घोरपडे पेठ परिसरातील १७ घोरपडे पेठ या ठिकाणी असणाऱ्या चौकास. | कै.ॲड.भगवंतराव शिंदे | मान्य |
| ७५ | प्रभाग क्र.३२ मध्ये शिवणे स.नं.७६/८७ न्यू अहिरेगाव येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीला | स्व.सोनेरी आमदार रमेशभाऊ वांजळे जलकुंभ | मान्य |
| ७६ | प्रभाग क्र.३९ चैतन्य हॉटेल ते वाडकर गिरणी पर्यंतच्या मुख्य रस्त्यास. | स्व.यशवंतराव ढमाले मार्ग | मान्य |
| ७७ | प्रभाग क्र.३९ जयनाथ नगर चौक ते चैतन्य हॉटेल पर्यंतच्या मुख्य रस्त्यास. | स्व.दगडु खैरे मार्ग | मान्य |
| ७८ | प्रभाग क्र.३९ तीन बत्ती म्हसोबा चौक ते | स्व.ह.भ.प.पांडुरंग खेडेकर मार्ग | नांव देणे अडचणीचे |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.राम मंदिर पर्यंतच्या मुख्य रस्त्यास. | | आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| ७९ | प्रभाग क्र.२८क,मध्ये स.नं.७०७ मुकुंदनगर येथील योग हॉल व अभ्यासिका यास | हिंदवी स्वराज्याचे संघटक हैबतराव शिळीमकर | मान्य |
| ८० | प्रभाग क्र.३४ मधील आनंदनगर सनसिटी येथील अग्निशामक केंद्र ते सुंदर संस्कृती पर्यंतच्या रस्त्यास. | श्री.मुरलीधर गणपत खाडे रस्ता | मान्य |
| ८२ | प्रभाग क्र.१४ मधील प्रभात रोड गल्ली क्र.३ येथील निसर्ग इमारत येथील चौकास | कै.ॲड.विनायक नरहर अभ्यंकर चौक | मान्य |
| ८३ | प्रभाग क्र.६ कामराजनगर येथील आर.के. चौकापासून ते तांबोळी पान शॉप पर्यंतच्या रस्त्यास.(आर.के.चौकापासून ते नुरानी मस्जिद पर्यंत ) | बज्मे रहमत रस्ता | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| ८४ | प्रभाग क्र.२२ मुंढवा-मगरपट्टा सोलापूर रोड वरील १५ नंबर मांजरी चौकास | धर्मवीर संभाजी महाराज चौक | मान्य |
| ८५ | प्रभाग क्र.१(कळस-धानोरी ) मधील धानोरी ते लोहगाव ( जकातनाका) मुख्य रस्त्यावरील कलवडकडे जाणाऱ्या चौकास. | राजमाता जिजाऊ चौक | मान्य |
| ८६ | प्रभाग क्र.१४ मधील महर्षी शिंदे रस्ता ते गोखले बिल्डींग येथील चौकास | स्व.नेनसुख पुंगलिया चौक | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| ८८ | प्रभाग क्र.४१ टिळेकरनगर लेन नं.२ मधील मोबाईल टॉवर जवळील चौकास | महात्मा बसवेश्वर चौक | मान्य |
| ८९ | प्रभाग क्र.४१ येथील काकडेनगर, हगवणेनगर,हाय फाय जिम जवळील चौकास | महावीर भगवान चौक | मान्य |
| ९० | प्रभाग क्र.४१ कोंढवा बु.स.नं.४५ हब टाऊन समोरील चौकास. | ह.भ.प.अनंता शंकर टिळेकर चौक | मान्य |
| ९१ | प्रभाग क्र.१२ मधील गुजराथ कॉलनी येथील संगिता हॉटेल जवळील ढोबळे चौक ते संत नरहरी चौक येथील रस्त्यास. | सामाजिक कार्यकर्ते स्व.सुर्यकांत रामभाऊ विचारे पथ | मान्य |
| ९२ | प्रभाग क्र.३३ वडगाव-धायरी येथील वडगाव बुद्रुक महामार्गाखालील,कात्रज कडून येणारा रस्ता ज्या ठिकाणी मिळतो त्या चौकास. | नवले चौक | मान्य |
| ९३ | प्रभाग क्र.१३ब,मधील एरंडवणे भागातील भारती निवास सोसायटी चौक ते सहकार सदन पथ या रस्त्याला. | मॅनेजमेंट गुरू डॉ.प्र.चिं. शेजवलकर पथ | मान्य |
| ९४ | प्रभाग क्र.३५ड,मध्ये प्लॉट नं.७०ते८२, अभ्यापक कॉलनी सहकारनगर नं.१ पुणे ९ या रस्त्यास. | समाजसेवक देवभक्त आदर्श शिक्षक आणि व्यावसायिक कै.वसंतराव बंडोपंत गोळे रस्ता | मान्य |
| ९७ | प्रभाग क्र.३३अ, मधील वडगांव बु.स.नं. ५५ हायवे परिसरातील व्यंकटेश वृंदावन सांस्कृतिक हॉल बांधणेचे काम सुरू आहे. | कै.कृष्णा गेणुभाऊ दांगट सांस्कृतिक भवन | मान्य |
| ९८ | प्रभाग क्र.१७ मधील महात्मा फुले रस्ता ते सणस रस्ता यांना जोडणाऱ्या दक्षिण-उत्तर रस्ता ( डावरे रस्ता ) पर्यंतच्या रस्त्यास. | माजी लोकप्रिय नगरसेवक कै.उदयकांत आंदेकर मार्ग | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९९ | बाणेर ते पिंपळे-निलख जोडणाऱ्या पुलाला | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूल | मान्य |
| १०० | प्रभाग क्र.११ मधील स.नं.१११ व ११२ शिवकल्याण नगर,सुतारदरा,कोथरूड पुणे ३८ येथील चौकास. | छत्रपती शंभुराजे चौक | मान्य |
| १०१ | प्रभाग क्र.३० मधील पानमळा,वृंदावन नर्सरीकडून दत्तवाडीकडे जाणाऱ्या चौकाला | श्री.बापूजी बुवा चौक | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| १०२ | प्रभाग क्र.१७ मधील डोके मारूती पथावरील डोके मारूती चौक शेजारील भारत मित्र मंडळ समोरील चौकास. | माजी लोकप्रिय नगरसेवक कै.उदयकांत आंदेकर चौक | मान्य |
| १०३ | प्रभाग क्र.३३अ,मधील स.नं.५४ हायवे परिसरातील दावत हॉटेल ते लोहकरे यांच्या घरापर्यंत नविन विकसित झालेल्या परिसरास. | आदितीनगर | मान्य |
| १०४ | प्रभाग क्र.४० आंबेगाव खुर्द स.नं.८ पुणे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत कै.रखमाबाई तुकाराम थोरवे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावर नव्याने होणाऱ्या डायलेसिस सेंटरला. | कै.रंगोजी धोंडीबा कोंढरे पाटील डायलेसिस व डायग्नोस्टिक केंद्र | मान्य |
| १०५ | येरवडा स.नं.१०३ म.गांधीनगर येथील कै.बाबू जगजीवनराम शाळेतील इंग्लिश मिडीयम माध्यमिक शाळेला. | कै.बाबू जगजीवनराम इंग्लिश मिडीयम माध्यमिक शाळा स.नं.१०३ म.गांधीनगर, येरवडा,पुणे.६ | नावात बदलकरणेकामी मे.राज्य शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतरच या शाळेच्या नावात बदल करणे शक्य होईल अशा आशयाचा मा.शिक्षणाधिकारी,माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग यांचा अभिप्राय मान्य. |
| १०६ | प्रभाग क्र.४२ अ, फुरसुंगी गावातील स्मशानभूमीस | अमरधाम स्मशानभूमी फुरसुंगी | मान्य |
| १०७ | प्रभाग क्र.४ मधील खराडी येथील पुणे मनपा ओ.पी.डी.यास. | स्व.विठ्ठल यशवंत पठारे पाटील | मान्य |
| १०८ | प्रभाग क्र.४२ मध्ये आंबेगाव खु.येथील प्राथमिक शाळेला. | कै.शंकरराव विठोबा चिंधे पाटील प्राथमिक शाळा | शाळा इमारतीस दुसरे नाव देणेबाबत शिफारस करता येणार नाही अशा आशयाचा मा.प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग ( प्राथमिक ) यांचा अभिप्राय मान्य |
| ११० | प्रभाग क्र.२३ मधील ससाणेनगरच्या मुख्य रस्त्यापासून ( श्री.फरांदे यांच्या घरापासून ) ते सर्वे नं.८०/१ डांगमाळी मळापर्यंत अंतर्गत म.न.पा.डिपी रस्त्याला. | स्व.पै.पिराजी कोयाजी डांगमाळी पथ | मान्य |
| १११ | प्रभाग क्र.९ब,स.नं.१५ धनकुडेवस्ती, बाणेर येथील प्राईड प्लॅटिनम सोसायटीकडे जाणाऱ्या चौकास. | कै.शंकरराव तुकाराम जाधव पाटील चौक | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| ११२ | प्रभाग क्र.३९ मध्ये सर्व्हे नं.२८ अक्षयनगर धनकवडी पुणे ४३ शिरोळकर दवाखाना ते नक्षत्र बंगला मार्गाला. | कै.ह.भ.प.भागवत निवृत्ती धावणे पथ | मान्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ११३ | प्रभाग क्र.१(कळस धानोरी) मधील धानोरी मुख्य रस्त्यावरील धानोरी गावठाणातील विठ्ठल मंदिरासमोरील चौकास. | कै.दशरथ मानाजी टिंगरे पोलिस पाटील चौक | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| ११४ | प्रभाग क्र.३९ मध्ये सर्व्हे नं.३० नित्यानंद सोसायटी,धनकवडी पुणे ४३ धनकवडी पोस्ट ऑफिस ते पुणे सातारा रोड मार्गाला | कै.रामचंद्र संभाजी म्हस्के पथ | मान्य |
| ११५ | प्रभाग क्र.१४ मधील मॉडेल कॉलनी येथील हरेकृष्णामंदिर रस्त्याच्या पश्चिम बाजूस जाणाऱ्या रस्त्यास. | कै.जयवंतराव दिनकरराव मोहिते पथ | मान्य |
| ११६ | प्रभाग क्र.२९ मधील मित्र मंडळ चौक येथील चौकास | वनराईचे संस्थापक मोहन धारीया | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |
| ११७ | प्रभाग क्र.२९ मधील पर्वती येथील भागवत हॉल मागील स.नं.१४६, मातृवंदन कांचन अपार्टमेंट,नलिनी अपार्टमेंट,रेणूका निवास,नामदेव भवन, स्टायलवेल टेलर्स,राजश्री टेलर्स या ठिकाणी असलेल्या चौकास. | श्रीराम चौक | मान्य |
| ११८ | प्रभाग क्र.४२अ फुरसुंगी प्रमुख रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकास | छत्रपती शिवाजी महाराज चौक | मान्य |
| १२१ | प्रभाग क्र.३५ड मधील संभाजीनगर येथे नव्याने विकसित होणाऱ्या उद्यानाला | डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी उद्यान | मान्य |
| १२२ | प्रभाग क्र.२२ड,मुंढवा केशवनगर येथील ओढ्यावरील पुलापासून ते रेणुकामाता मंदिरा पर्यंत रस्त्यास. | कै.जवाहर गिरीधरवाल परदेशी | नांव देणे योग्य होणार नाही अशा आशयाचा मा.कार्यकारी अभियंता, वाहतूक नियोजन यांचा अभिप्राय मान्य. |

**विषय क्र.४१८**

संदर्भ :- मुख्य सभा ठराव क्र.४, दि.२०/४/२०१७

विषय :- पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

------

वरील विषयांकिंत बार्बीवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा गुरूवार **दि.१६/९/२०२१** रोजी **दुपारी ०३.३० ( तीन वाजून तीस मिनिटे )वाजता** विशेष समिती सभागृहात भरली होती.त्यामध्ये खालील विषय मान्य करण्यात आलेले असून त्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| वि.क्र | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नांव | निर्णय |
|---|---|---|---|
| १२३ | वडगाव बुद्रुक प्रभाग क्रमांक ३३ मधील मुंबई-बेंगलोर हायवे सर्व्हिस रोड दावत हॉटेल पासून लोहकरे यांच्या घरापर्यंत पुणे मनपाने विकसित केलेल्या रस्त्यास. | कै.मारूती नथु हगवणे पाटील पथ | **मान्य** |
| १२४ | प्रभाग क्रमांक ३ मधील सर्व्हे नं.२११ येथील ऑप्टीमस चौकास. | कै.वत्सला अशोक बालघरे चौक | **मान्य** |
| १२५ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी गाव ते पवार आळी,आकाश लॉन्स ,सोलापूर महामार्गाला जोडणाऱ्या मार्गावरील भवानी माता मंदिरा समोरील चौकास. | जय भवानी चौक | **मान्य** |

| | | | |
|---|---|---|---|
| १२६ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी भेकराईनगर ते गंगानगर मार्गे सोलापूर महामार्गाला जोडल्या जाणाऱ्या मार्गावरील गंगानगर रिक्षा स्टॅण्ड या चौकास. | अखिल गंगानगर, त्रिमुर्तीनगर,अवधुतनगर चौक | मान्य |
| १२७ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी भेकराईनगर ते फुरसुंगी प्रमुख रस्त्यावरील गंगानगरला जोडल्या जाणाऱ्या चौकास. | शिवशक्ती चौक | मान्य |
| १२८ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी गाव कॅनॉल रोड ते फडतरे मळा,कोळपेवस्ती, गांधनखिळा या मार्गास. | कै.गणपत चिमाजी हरपळे मार्ग | मान्य |
| १२९ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी गाव सरोदेआळी (कॅनॉल लगत ) सोलापूर महामार्गास जोडणाऱ्या मार्गाला. | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग | मान्य |
| १३० | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी हडपसर-सासवड महामार्गावरील भेकराईनगर पोलीस चौकापासून फुरसुंगी गावाकडे जाणाऱ्या ( जुना फुरसुंगी रोड ) प्रमुख मार्गास. | शहिद भगतसिंग मार्ग | मान्य |
| १३१ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी हडपसर-सासवड महामार्गावरील भेकराईनगर पोलीस चौकी समोरील चौकास. | संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली चौक | मान्य |
| १३२ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी गंगानगर स्मशानभूमी ते सोलापूर महामार्गास जोडल्या जाणाऱ्या शहीद सौरभ फराटे चौकास. | शहीदवीर सौरभ फराटे चौक | मान्य |
| १३४ | प्रभाग क्रमांक१४ मधील मंजाळकर चौकापासून ते उत्तरादेव जिमकडे जाणाऱ्या रस्त्यास. | कै.गोपीनाथ(नाना) दाजी पवार पथ | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.मुख्य अभियंता, वाहतूक नियोजन विभाग यांचा अभिप्राय मान्य |
| १३५ | प्रभाग क्रमांक१४ मधील शिवाजीनगर पोलीस लाईन येथील ज्ञानेश्वर पादुका चौक १०४ पोलीस लाईन, ई ब्लॉक पोलीस लाईन,मॉर्डन शाळेकडे जाणाऱ्या या ४ रस्त्याच्या मधील चौकास. | कै.विशाल गजानन तोत्रे चौक | मान्य |
| १३६ | प्रभाग क्रमांक२० मधील हॉटेल शांताई समोरील रस्त्यास. | गुरू तेगबहाद्दूर | नांव देणे अडचणीचे आहे अशाआशयाचा मा.मुख्य अभियंता, वाहतूक नियोजन विभाग यांचाअभिप्राय मान्य |
| १३७ | प्रभाग क्रमांक४२अ, फुरसुंगी ते सोनारपूल,तरवडी मार्गे सोलापूर महामार्गाला जोडणाऱ्या मार्गावरील फुरसुंगी गावठाणातील श्री.भैरौबा मंदिरा समोरील चौकास. | श्री.भैरोबा चौक | मान्य |
| १३८ | वडगाव बुद्रुक प्रभाग क्रमांक३३ मधील सिंहगड रोड पासून सर्वे नं.६५/६६ ( स्वीट मॉल पासून ) ते नऱ्हे पर्यंत जाणाऱ्या रस्त्यास. | कै.पै.लक्ष्मणराव केशवराव कोंढाळकर ( मामा ) पथ | मान्य |
| १३९ | प्रभाग क्रमांक४२ अ, फुरसुंगी शहीद सौरभ फराटे चौक ते महात्मा फुले वसाहतीला जोडणाऱ्या प्रमुख मार्गास. | महात्मा ज्योतिबा फुले मार्ग | मान्य |
| १४० | प्रभाग क्रमांक४२ब, उंडरी स.नं.१६ व १७ | होले वस्ती चौक | मान्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | येथील बिशप शाळेसमोरील चौकास. | | |
| **१४१** | प्रभाग क्रमांक४२ब, उंड्री पुना हार्डवेअर शेजारील चौकास. | कै.लक्ष्मण टकले चौक | **मान्य** |
| **१४२** | प्रभाग क्रमांक४२ब, उंडरी सिटी सेंटर पासून आंबेकर हॉटेल पर्यंत जाणाऱ्या मार्गाला. | उंडरी पिसोळी लिंक रोड | **मान्य** |
| **१४३** | होळकर चौक, मारूती शोरूम,नगररोड येथून सोमनाथनगरकडे जाणाऱ्या रस्त्याला. | स्व.किरण भालेराव | नांव देणे अडचणीचे आहे अशा आशयाचा मा.मुख्य अभियंता, वाहतूक नियोजन विभाग यांचा अभिप्राय मान्य |
| **१४५** | प्रभाग क्रमांक३४ब, मधील मौजे हिंगणे खुर्द स.नं.७ अ, पार्ट या ठिकाणी नव्याने विकसित होत असलेल्या महिला सक्षमीकरण केंद्र व लाईट हाऊस येथील इमारतीस. | स्व.किशोरदादा गोसावी | **मान्य** |
| **१४६** | प्रभाग क्र.१ कळस-धानोरी येथील धानोरी स.नं.३८/१ सुरभी टाऊनशिप या ॲमेनिटी स्पेस क्षेत्रावर विकसित करण्यात येणाऱ्या निवासी शिक्षण केंद्रास. | कै.पाल्हूजी सोमा सांगडे आदिवासी विद्यार्थी निवासी शिक्षण केंद्र | **मान्य** |
| **१४७** | प्रभाग क्र.४० मध्ये आंबेगाव बु.स.नं.५० व ५१ येथे बांधण्यात आलेल्या स्मशानभुमी मधील हॉलला. | कै.भिका कोंडीबा चव्हाण हॉल | **मान्य** |
| **१४८** | प्रभाग क्र.४० मध्ये आंबेगाव बु.स.नं.५० व ५१ येथे बांधण्यात आलेल्या स्मशानभुमी मधील हॉलला. | कै.भिका कोंडीबा चव्हाण हॉल | **मान्य** |
| **१४९** | प्रभाग क्र.३०ब, मधील जनता वसाहत रस्ता गल्ली नं.१ पाण्याची टाकी जवळ असलेल्या जनता दवाखान्याला | मा.नगरसेविका स्व.छायाताई शिवाजीभाऊ गदादे ( पाटील ) (जनता दवाखाना ) | **मान्य** |
| **१५४ त्वर्य** | वडगाव बुद्रुक मधील मुख्य चौकातील सर्वे नं.५१ ते सर्वे नं.४९ पर्यंत सिंहगड कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याला. | कै.हरिभाऊ नारायणराव जाधव रस्ता | **मान्य** |
| **१५५ त्वर्य** | प्रभाग क्र.३२ मधील वारजे-माळवाडी येथील पुणे मनपाचे कै.अरविंद बारटक्के रूग्णालयामधील तळ मजल्यावर विकसित केलेल्या डायलिसिस सेंटरला | क्रांतीज्योती सावित्राबाई फुले डायलेसिस सेंटर | **मान्य** |
| **१५६ त्वर्य** | प्रभाग क्र.३४ हिंगणे खुर्द नवचैतन्य मंडळ ते रोहित प्लाझा येथील रस्त्याला | आसाराम नारायण सैंदाणे ( आदर्श शिक्षक ) | **मान्य** |

**<u>मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र</u>**

<u>विषय क्र. ४१९</u>

मौजे धानोरी, ता. हवेली. जि. पुणे येथील स. नं. ४८पै, ९०पै, ५२पै, ५१पै, ५५पै, ६७अपै, ८२पै, २२पै, २०पै, गावठाण पै, १पै, १८पै, १६पै, १७पै, यामधील जागा पुणे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील २४ मी. विकास योजना रस्त्यासाठी संपादन (विश्रांतवाडी ते धानोरी लोहगाव हद्दीपर्यंत) करणेबाबत झालेला मनपा ठराव क्र.९९७,दि.२२/३/२०१७ ला अनुसरुन मा. अति. महा. आयुक्त विशेष यांचे जावक क्र. मआ/भूसंपादन/३०, दिनांक १९/४/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३११, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.४२०</u>

शहरातील फेरीवाला संघटनांच्या प्रतिनिधींच्या मागण्यानुसार नोंदणीकृत पथ विक्रेता व्यावसायिकांचे दैनंदिन परवाना शुल्क कमी करून नव्याने निश्चित केलेल्या दरांबाबतचे बैठक इतिवृत्त मा.मुख्यसभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अतिक्रमण/३६,दि.१३/५/२०१९ चे पत्र.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३९, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र. ४२१**

पुणे म.न.पा.चे ८ अपूर्ण प्रकल्प आणि बाणेर –बालेवाडी या भागातील सुमारे ३२ ॲमेनिटी स्पेस पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन यांना मा.मुख्य सभा ठराव क्र.९२७,दि.१७.१२.२०१८ मधील स्मार्ट सिटीच्या कार्यकक्षेबाहेरील असणाऱ्या उपसूचना क्र.२ ते ११ वगळून विकसन कामांसाठी उपलब्ध करून देणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/५१,दि.१/६/२०१९ चे फेरविचाराचे पत्र.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३४०, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४२२**

पुणे,पेठ बाणेर स.नं.१०४/१, १०५/३ येथील पी.एम.टी.–१ व पार्किंग (पी–७) या आरक्षित जागेकरिता जागामालक सौ.इंदिरा शेट्टी यांनी पुणे म.न.पा.स. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम १२६ भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेसाठी मा.मुख्य सभेची मान्यता घेणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.अ. /२१८,दि.९/८/२०१९ चे पत्र.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३४१, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४२३**

पुणे महानगरपालिका सेवा विनियम मधील नियम २९ बाबत मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रात नमूद केलेली वस्तुस्थिती निदर्शनास आणून खालील बाबींस मा. महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता घेणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ साप्र/ ८५९,दि.१६/१२/२०१९ चे पत्र.

१) मा. स्थायी समितीचे ठ. क्र. ४४०, दि.४/६/१९७९ या ठरावासोबत "अ" तक्त्यातील पृष्ठ–३ वरील अ.क्र.१३, १४, १५ समोरील सूचनेचे अंमलबजावणीस,

२) पुणे महानगरपालिका सेवा विनियम नियम २९ मधील मजकुराचे पुढे "दिनांक ४/६/१९७९ नंतर लिपिक/कनिष्ठ लिपिक/लिपिक टंकलेखक या वर्गातील पदास किमान शैक्षणिक पात्रते पेक्षा अधिक शैक्षणिक पात्रता असलेले सेवक उपलब्ध झाले तरीही त्यांना अगाऊ/ज्यादा वेतनवाढी अनुज्ञेय राहणार नाहीत." अशी सुधारणा दिनांक ४/६/१९७९ पासून समाविष्ठ करणेस,

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३४२, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४२४**

पुणे शहरामध्ये ऑप्टीकल फायबर केबल्स (OFC) कंपन्यांना केबल टाकणेस देण्यात येणाऱ्या परवानगीबाबत मुख्य सभा ठ.क्र.८६६,दिनांक २०/०१/२०२० चे ठरावावर मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/पथ/१२२२,दिनांक १६/०३/२०२० ने पाठविलेला अभिप्राय.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८६, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४२५**

लोकलेखा समितीचे निर्देशानुसार सन २०१०–११ या आर्थिक वर्षापासून मिळकत कराची आकारणी करताना १५% ऐवजी १०% वजावट देणेबाबत मे.शासनाचे आदेशानुसार महालेखापालांनी आक्षेप नोंदविल्यापासून म्हणजेच सन २०१०–११ या आर्थिक वर्षापासून करून वसूल करणेकामी सन २०१०–११ या आर्थिक वर्षापासून ज्या नवीन आकारणी झालेल्या मिळकतींना १५% सवलत देण्यात आलेली आहे,अशा मिळकतींचे करपात्र मूल्यामध्ये ५% फरकाची रक्कमेची आकारणी करणेत येऊन त्यानुसार वसुली करण्याची कार्यवाही करणे अनिवार्य असून त्याप्रमाणे

कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब मा.मुख्यसभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिजीओ/१२२,दि.२९/६/२०१९ चे पत्र.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२९८, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.४२६</u>

संदर्भ – १) मा. मुख्य सभा ठराव क्र. ३२० दि. २८/०८/२०१९
२) मे.शासनाचे समक्रमांकाचे दि.०६/०७/२०१८ चे पत्र ( एकूण २ पत्रे )
३) मे.शासनाचे समक्रमांकाचे दि.२८/०५/२०१९
४) महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/टिजीओ/४१५०,दि.०९/०३/२०२१ चे पत्र.
५) शासन निर्णय क्र.पीएमसी–३०१८/प्र.क्र.५९३/नवि–२२,दि.१७/०९/२०२१
६) महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/ कर.आ.कर.सं./६५६ दि. ३०/०९/२०२१ चे पत्र

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

महानगरपालिकेने मुख्य सभा ठराव क्र. ५ दि. ०३/०४/१९७० नुसार करपात्र रक्कम ठरविताना १०% ऐवजी १५% वजावट द्यावी, तसेच घरमालक स्वतः रहात असल्यास त्या जागेचे भाडे वाजवी भाड्याच्या ६०% इतके धरण्यास मान्यता दिली व त्यानुसार कार्यवाही करण्यात येत होती. तथापि, सदर वजावटींबाबत कायद्यात तरतूद नसल्याने मा. महालेखाकार यांचे लेखापरिक्षण आक्षेपावर झालेल्या लोकलेखा समितीच्या शिफारसींनुसार ठराव क्र. ५ दि. ०३/०४/१९७० यापूर्वीच दि. ०१/०८/२०१९ चे शासन निर्णयानुसार मे. शासनाने विखंडीत केलेला आहे. तद्नंतर सद्यस्थितीत मिळकत कर विभागाकडून कायद्यातील तरतूदीनुसार १५% ऐवजी १०% वजावट देण्यात येत असून ४०% सवलत बंद करण्यात आलेली आहे.

लोकलेखा समितीचे शिफारसीनुसार मे. शासनाच्या यापूर्वीचे प्राप्त आदेशानुसार १५% ऐवजी १०% वजावट सन २०१० पासून रद्द करून फरकाच्या रकमांची वसूली करावी व कायद्यात तरतूद नसताना जास्त वजावट दिल्याबद्दल तात्कालिन महापालिका आयुक्तांसमवेत महापालिका आस्थापनेवरील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश प्राप्त झाले होते.

मा. मुख्य सभेने संदर्भांकीत १ चे ठराव क्र. ३२० अन्वये खालील बाबींस मान्यता दिलेली आहे –

१) पुणे महानगरपालिकेतर्फे मा. मुख्य सभा ठराव क्र. ५ दि. ०३/०४/१९७० नुसार करपात्र रक्कम ठरविताना १०% ऐवजी १५% सूट व ६०% वाजवी भाडे धरण्यात येत असून त्यासाठी विहीत कार्यवाही पूर्ण केलेली आहे. केवळ कायद्यामध्ये सुधारणा झालेली नाही. यामुळे मा. मुख्य सभा ठराव क्र. ११६६ दि. ०१/०३/२०१९ अन्वये १५% ऐवजी १०% ची सवलत दि. ०१/०४/२०१९ पासून नवीन मिळकतींना देण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१०–११ पासून ५% वार्षिक करपात्र रकमेतील फरक पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचा दि. २८/०५/२०१९ चा शासननिर्णय रद्द करणेत यावा.

२) मा. मुख्य सभा ठराव क्र. ५ दि. ०३/०४/१९७० हा ठराव निलंबन / विखंडीत करण्यात येऊ नये, कारण सदर ठराव निलंबीत / विखंडीत झाल्यास या ठरावानुसार देण्यात येणारी ४०% सवलत (इमारतीचे वाजवी भाडे ६०% धरून) हे देखिल पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्यासाठी बंद करावी लागणार आहे.

३) सदरच्या दोन्ही सवलती ह्या मा. मुख्य सभेच्या मान्यतेने व शासनाचे नोटीफिकेशननुसार सन १९७० पासून करण्यात येत असल्याने तत्कालिन मा. महापालिका आयुक्त तसेच मनपा अस्थापनेवारील अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये.

४) मा. मुख्य सभा ठराव क्र. ५ दि. ०३/०४/१९७० प्रमाणे दि. ०१/०४/२०१९ पासून नव्याने आकारणी होणाऱ्या मिळकतींसाठी वैधानिक वजावट १५% ऐवजी १०% ने सुरू करण्यात आलेली असून तत्पूर्वीची थकबाकी वसुली न करण्यास तसेच जागा मालक स्वतः रहात असल्यास वार्षिक भाडे ६०% धरण्यास (४०% सवलत देण्यास) ही कार्यवाही चालू ठेवण्यास.

यात्रकरणी यापूर्वी लोकलेखा समितीने दिलेले आदेश, पुणे महानगरपालिकेने कायद्याच्या विसंगत असे घेतलेले निर्णय व त्यामुळे आयुक्तांनी दि. ०९/०३/२०२१ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मुख्य सभा पुणे महानगरपालिका यांच्या ठराव क्र. ३२० दि. २८/८/२०१९ मधील व उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद केलेले अनुक्रमांक १,२,४ चे निर्णय अमान्य करण्यात आलेले असून अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेला तत्कालिन महापालिका आयुक्त तसेच महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी यांचेवर कोणतिही कारवाई करण्यात येऊ नये, या मुख्य सभेच्या निर्णयास मान्यता दिलेली आहे. तसेच आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दि. ०९/०३/२०२१ च्या पत्रात प्रस्ताव दिल्यानुसार इमारतीचे वाजवी भाडे ६० टक्के धरून करपात्र मुल्याच्या ४० टक्के दिलेल्या सवलतीच्या अनुषंगाने

वसूल करावयाची फरकाची रक्कम दि. ०१/०८/२०१९ पासून पुढे वसूल करण्यास मान्यता देण्यात आलेली असून सदर महापालिका मुख्य सभा ठराव अंशतः विखंडीत करण्याच्या दृष्टीकोनातून अंशतः निलंबीत केलेला आहे.

याबाबत संबंधितांना याबाबत अभिवेदन करावयाचे असल्यास शासन निर्णयाचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत करणेबाबत सदर शासन निर्णयामध्ये कळविले आहे. सबब सदरील शासन निर्णय मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ४२७**

संदर्भ – मा.सौ.फरजाना शेख व मा.सौ.सोनाली लांडगे यांची सूचना दिनांक ३१/१/२०१८.

१) मा.दिलिप बराटे, मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि. १६/१/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८३१,दि.१६/१/२०१८

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ पर्वती स.नं. १२०अ+१२०ब, १२४/२ टि.पी.स्किम नं.३ फा.प्लॉट नं. ५४५ क्षेत्र २७ एकर १३ गुंठे ही जागा नगररचना योजनेनुसार विटभट्टीसाठी सन १९६३ साली पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली आहे.

सदर जागेमध्ये पुणे महानगरपालिकेने विटभट्टीधारकांचे कायम स्वरुपी पुनर्वसन करणेसाठी लेआऊट तयार करण्यात आला. त्यामध्ये एकूण ४० प्लॉट दर्शविण्यात आले. सदरचे प्लॉट विटभट्टीधारकांना साठेखताने व नंतर खरेदीने देण्यात आले आहेत.

मूळ जागा मालक श्री.मधुकर नामदेव राऊत यांनी सदर जागेबाबत मे.उच्च न्यायालयात रिटपिटीशन नं. ६२४६/९९ ने दाखल केले. त्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या आदेशाविरुध्द पुणे मनपाने रिटपिटीशन नं.५९४/२००७ ने दाखल केले होते. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि. १४/७/२०१७ दिलेल्या निर्णयान्वये शासनाचे आदेश रद्द केले आहेत.

मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द जागा मालक श्री.मधुकर नामदेव राऊत यांनी मे.उच्च न्यायालयात पुर्नविलोकन (रिव्हीजन) अर्ज दाखल केला आहे. दरम्यान मुळ जागा मालक यांनी फा.प्लॉट नं. ५४५ या जागेच्या मोबदल्यापोटी सध्या पुणे मनपाच्या ताब्यात असलेले प्लॉट नं. १. १३. २४. ३७ व ४० हे मालकी हक्काने परत मिळावेत असा विनंती अर्ज केला आहे. त्यास अनुसरुन नगररचना योजना क्र. ३ अंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या फा.प्लॉट नं. ५४५ च्या मोबदल्यापोटी वरीलप्रमाणे महानगरपालिकेकडे शिल्लक असलेले ५ प्लॉटपैकी प्लॉट नं. २४ वगळून उर्वरित चार प्लॉट मालकी हक्काने मूळ जमीन मालकांना नगररचना योजना अंतर्गत मोबदला म्हणून देणेबाबत विशेष बाब म्हणून राज्य शासनाच्या स्तरावर निर्णय व्हावा अशी विनंती करण्यास व या प्रकरणी राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र. ९८८, दिनांक २९/१/२०१८ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा.दिलिप बराटे, मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि. १६/१/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८३१,दि.१६/१/२०१८

३) मनपा ठराव क्र.१६९, दि.१९/७/२०१८

४) मनपा ठराव क्र.९१६,दि.१४/१२/२०१८

५) मनपा ठराव क्र.१२०,दि.१८/६/२०१९

६) मनपा ठराव क .८७२, दि.२०/१/२०२०

----

मनपा ठराव क्र. ९८८, दिनांक २९/१/२०१८ चा दप्तरी दाखल करण्यात यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३४३, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४२८**

संदर्भ– मा.दिलीप वेडेपाटील यांची दि.८.३.२०१९ ची सूचना.

१) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९९८,दि. ०९/०२/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/माव्य/७९० दि.०७.१२.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३२१, दि.१४/१२/२०१८

विषय– कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत असणा–या पौड कचरा रॅम्पची जागा मेट्रोसाठी दिल्यामुळे रॅम्प करीता पर्यायी जागा उपलब्ध होणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून

कोथरूड कचरा डेपो येथे सुमारे २५ वर्ष पासून कचरा हस्तांतरन केंद्र (Ramp) द्वारे कच–याचे दळणवळण सुरू आहे. या भागात कोथरूड व वारजे क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणा–या कार्यक्षेत्रात निर्माण होणा–या सुमारे २५०–३०० मे. टन कचरा १०० वाहन मार्फत संकलीत केला जात असून या कच–याची वाहतूक कचरा हस्तांतरन केंद्रा मार्फत पुणे महानगरपालिकेच्या विविध कचरा प्रकल्पावर तसेच landfill site वर केली जाते. सदरची वाहनांची पार्किंग व्यवस्था ही या ठिकाणी आहे.

सध्यस्थितीत संदर्भ क्र. २ अन्वये सदर जागा मेट्रो प्रकल्पासाठी देण्यात आली असून याठिकाणी कचरा डेपोच्या जागेवर मेट्रो स्टेशन उभारण्याचे नियोजन आहे. हे स्टेशन कार्यान्वित झाल्यानंतर या ठिकाणी कचरा हस्तांतराचे काम करणे शक्य होणार नाही यामुळे कच–याच्या वाहतूकीस मोठी अडचण निर्माण होणार आहेत. निर्माण होणा–या कच–याची कात्रज हस्तांतरण केंद्रा पर्यंत वाहतूक करावी लागणार आहे. सदर वाहतुकी करीता अतिरिक्त खर्च होणार असून, कोथरूड ते कात्रज अशा खेपा करायच्या झाल्यास त्याकरीता आवशक वेळ वाढणार आहे व सदर वाहनांचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर होणार नाही तसेच दैनंदिन कचरा उठावावर परिणाम होउन कोथरुड व वारजे क्षेत्रिय कार्यालयाचा कार्यक्षेत्रात आरोग्य विघातक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून सबब भागाकरीता रॅम्पची आवश्यकता आहे.

या संदर्भात कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत असणा–या पौड कचरा रॅम्प स्थलांतरीत करण्याकरीता पर्यायी जागा मिळणेकरीता प्रस्ताव मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(विशेष) यांचेकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये बावधन खुर्द स.नं. ६४ येथील जकात नाक्याची जागा सुचविण्यात आली आहे. याबाबत मालमत्ता व्यवस्थापन विभागाचा अभिप्राय घेतला असता संदर्भ क्र. १ मा. मुख्य सभा ठराव क्र. ९८४दि. २९/०१/२०१८ नुसार सदर जागा ३० वर्षे मुदतीसाठी परिवहन महामंडळास देण्यात आली असून दि. १६/०४/२०१८ रोजी ताबापावतीने परिवहन महामंडळास देण्यात आली आहे. याबाबतीत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे ७८०० चौ.मी. जागेपैकी ४००० चौ.मी(सुमारे १ एकर) जागा देणेबाबत विनंती करण्यात आली होती. याबाबत सदर जागा कचरा हस्तांतरण केंद्रासाठी देणे शक्य होणार नाही असे त्यांनी कळविले आहे.

परंतु सदर सुचविलेली जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी योग्य असून या जागेवर रॅम्प उभारल्यास कोथरूड व वारजे क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणा–या कार्यक्षेत्रात निर्माण होणा–या कच–याच्या वाहतुकीच्या समस्यावर कायमस्वरूपी तोडगा निघणे शक्य होणार आहे.

सद्यस्थितीत सदर जागेपैकी अंशत: जागेचा वापर परिवहन महामंडळामार्फत करण्यात येत असून उर्वरित वापरात नसल्याचे दिसून येते. सदर बाबतीस मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८ मुद्दा क्र. १ नुसार महानगरपालिकेस आवश्यकता असेल त्या वेळेस सदर जागा पुणे महानगर परिवहन महामंडळ प्रशासनास सदर जागा पुणे महानगरपालिकेस परत करावी लागेल असे नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्य सभेची मान्यता घेऊन सदर जागी कचरा हस्तांतरण केंद्र उभारणे शक्य होणार आहे.

तरी वरील गोष्टींचे अवलोकन होवून बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील ७८०० चौ.मी. जागा महानगर परिवहन महामंडळाकडून परत घेऊन सदर जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी आरक्षित करून मिळावी याकरीता खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

१.बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील पुणे महानगर परिवहन महामंडळ यांना मनपाकडून देण्यात आलेली ७८०० चौ.मी. जागा परत घेऊन कचरा हस्तांतरण केंद्रा करीता देणेस.

२.बाबधन खुर्द स.नं. ६४ याठिकाणी कचरा हस्तांतरण केंद्राची उभारणी करणेस.

असा मनपा ठराव क्र.१०६९, दिनांक २१/१/२०१९ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ– १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९९८,दि. ०९/०२/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/माव्य/७९० दि.०७.१२.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३२१, दि.१४/१२/२०१८

५) मनपा ठराव क्र.८८५, दि.२१/१/२०२०

-----

बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील ७८०० चौ.मी. जागा महानगर परिवहन महामंडळाकडून परत घेऊन सदर

जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी आरक्षित करून मिळावी. या विषयाला स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध असल्यामुळे मनपा मुख्य सभा ठराव क्र.१०६९ ,दि.२१.१.२०१९ दफ्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात यावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३४४, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४२९**

संदर्भ :- मा. धनराज घोगरे व मा.राजेश येनपुरे यांची सूचना दि.२८/२/२०२०

१) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ-नअ-वियो-२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

----

१) वानवडी स.नं.६२, हि.नं.७,८ मधून २० फुटांचा रस्ता आखण्याचा ठराव आहे. जागेवर हिश्श्यांचे मध्य भागातील ३० फुट रस्त्याचे पूर्वेस श्री.बिलाल मिस्त्री यांची जागा आहे. मिस्त्री यांचे जागेत पूर्वेकडे गुंठेवारी पध्दतीची बांधकामे झालेली आहे. तेथील रहिवासियांनी वर नमूद केल्याप्रमाणे १० ते १२ फुटाची जागा सामाईक रस्त्यासाठी मोकळी जोडलेली आहे. या रिहवासियांना रस्ता मिळणे आवश्यक आहे. मूळ ठरावात नमूद केल्याप्रमाणे हिश्याचे मध्यभागातून रस्ता आखावयाचा झाल्यास श्री.मिस्त्री यांनी प्रथमच पासूनच अशा रस्त्याच्या आखणीस विरोध केल्यास्तव मिस्त्री यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांचे जागेच्या दक्षिणेकडील १० फुट जागा रस्त्यासाठी त्यांनी मोकळी सोडली आहे. त्यांचे जागेतून दक्षिण उत्तर असा ( चॅम्पर) हा आखावा लागणार आहे. श्री.मिस्त्री यांचे पूर्वेकडील जागेतील गुंठेवारी पध्दतीची बांधकामातील सुटलेल्या जागेचाही सामाईक रस्त्याची रूंदी ही.डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार मिळत नसल्याने त्या भागात रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही. यास्तव सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे अ, ब.ब-१ आद्याक्षराप्रमाणे दर्शविल्यानुसार २० फुट रूंदीचा रस्ता आखणे योग्य होईल.

२) वानवडी स.नं.६२,हि.नं.६ मध्येही गुंठेवारी पध्दतीची बांधकाम असून तेथेही सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागाही १० ते १२ फुट इतकीच आहे. डी.सी.रूल क्र.नियम क्र.१२ नुसार सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागा ही रूंदीपात्र ठरत नसल्याने याही हिश्यात पुरेशी रूंदी अभावी रस्त्याची आखणी करणे संयुक्त होणार नाही.

३) वानवडी स.नं.६२, हि.नं.१ ते १२ मध्येही दक्षिण-उत्तर अशीच गुंठेवारी पध्दतीची बांधकामे असून तिथेही १० ते १२ फुट सामाईक रस्त्यासाठी जागा सुटलेली आहे. डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार रस्त्याच्या रूंदी मिळत नसल्याने रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही.

तरी वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.२२०, दिनांक२४/८/२००० चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :- १) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ-नअ-वियो-२४८,दि.२५.५.२०००ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

७) मनपा ठराव क्र.२०७ दि.२१/१२/२०२०

----

वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखावा असे दर्शविलेले आहे. परंतु ‘अ‘ आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता हा रद्द करण्यात यावा.कारण सदर ठिकाणी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. त्यामुळे मा.महा.आयुक्त यांच्या

पत्रासोबतच्या नकाशात 'ब-ब१' या आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता २० फुट रूंदीचा आखण्यात यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१८७, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४३०**

संदर्भ – मा. संजय भोसले, गटनेते, शिवसेना, मा. विशाल धनवडे, मा. बाळा ओसवाल, मा. पृथ्वीराज सुतार यांची सूचना दि.१७/१२/२०१८

---

पुणे महानगरपलिकेच्या मुख्य इमारतीमध्ये व सर्व क्षेत्रिय कार्यालयाच्या इमारतीमध्ये हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळुन देण्यासाठी ज्या क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या सर्व थोर क्रांतिकारकांच्या प्रतिकृती शासनाच्या धोरणाप्रमाणे कार्यवाही करून इमारतीमध्ये लावण्यात याव्यात.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०२, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४३१**

संदर्भः– १) मा.पृथ्वीराज सुतार यांची सूचना दि.१९/३/२०१८
२) मनपा ठराव क्र.९०९,दि.१४/१२/२०१८
३) मनपा ठराव क्र.१३७, दि.११/७/२०१९

---

महाराष्ट्र राज्य सरकारने मुंबई मनपाच्या हद्दीत असणाऱ्या सातशे स्क्वे.फूटापर्यंतच्या निवासी मिळकतींचा मिळकत कर कायमस्वरूपी रद्द करून, सातशे स्क्वे.फूटापर्यंतच्या निवासी मिळकतींना यापुढे मिळकत कर लागू होणार नाही असा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय पुणे मनपाच्या हद्दीत असणाऱ्या सातशे स्क्वे.फूटापर्यंतच्या निवासी मिळकतींच्या बाबतीत सुध्दा घ्यावा,अशी विनंती मुख्य सभा मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांना करीत आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३१२, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र. ४३२**

संदर्भः– १) मा.आबा उर्फ उल्हास बागुल यांची सूचना दि.७/३/२०१८
२) मनपा ठराव क्र.६६१,दि.२८/९/२०१८
३) मनपा ठराव क्र.९२३,दि.१४/१२/२०१८
४) मनपा ठराव क्र.१४२, दि.११/७/२०१९

----

सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहराला अनेक महान व दिग्गज व्यक्तिमत्वे लाभली आहेत. गेल्या ७० वर्षात त्यांच्या कार्याप्रती आदर आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळावी यासाठी त्या–त्या महान व्यक्तींच्या नावाने विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्यांचा सन्मान महापालिकेतर्फे करण्यात येतो, तोही तरतुदीनुसार.

मात्र राज्यशासनाच्या एका परिपत्रकामुळे या परंपरेत खंड पडण्याची स्थिती ओढवली आहे. काही महापालिका आणि तेथील पदाधिकारी यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी केलेल्या खर्चावरून न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यशासनाने पुरस्कार वितरणाला हरकत घेऊन त्यावर निर्बंध घातले आहेत. तसे परिपत्रक राज्यातील सर्व महापालिकांना पाठवले आहे. मात्र एक बाब निश्चित लक्षात घ्यावी कि, ज्या महनीय व्यक्तींचा सन्मान केला जातो. त्यांच्याकडून कधीही पुरस्काराच्या रकमेची मागणी होत नाही. महानगरपालिका ती रक्कम देत असते.

आता न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यशासनाने सरसकट पुरस्कार कार्यक्रमावर घातलेली बंदी चुकीची आहे. केवळ पुणे नाही तर अन्य महापालिकाही त्यांच्या त्यांच्या शहरातील महनीय व्यक्तींचा सन्मान करीत असते. मात्र जे पुरस्कार सुरू केलेले आहेत, ते कदापि बंद करू न करता महान व्यक्तिंचा मानपत्र देऊन सत्कार करावा. महान व्यक्तींच्या नावाने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण आणि त्यासाठी येणारा खर्च पाहता कोणतीही उधळपट्टी पुणे महानगरपालिकेकडून होत नसल्याचे निदर्शनास आणून देऊन या पुरस्कारांवर बंदीचे निर्बधांबाबत राज्यशासनाने पुनर्विचार करावा आणि सरसकट निर्बंधातून पुणे महानगरपालिकेस दिलासा देण्यासाठी प्रस्ताव / ठराव मुख्य सभेच्या मान्यतेने राज्यशासनाला पाठविण्यात यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२९९, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र. ४३३**

संदर्भः– १) मा.आबा उर्फ उल्हास बागुल यांची सूचना दि.१७/१२/२०१८
२) मनपा ठराव क्र.१४४, दि.११/७/२०१९

----

पुणे शहर व अन्य शहरांमध्ये महानगरपालिका, नगरपालिका हद्दीत असणाऱ्या विविध कंपन्यांना पायाभूत सुविधांसाठी सवलत दिली जाते. मात्र त्या कंपन्यांचा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात सीएसआर फंड हा त्या त्या शहरात वापरला जात नाही. वास्तविक कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात सीएसआर हे एखाद्या निसर्गचक्राप्रमाणे असते. जे काही समाज, पर्यावरणाकडून मिळाले तेच पुन्हा त्यांना अर्पण करणे हे त्याचे उदात्त तत्व असते. त्यामुळे ज्या भागात कंपन्या आहेत. तिथेच या कंपन्यांचा सीएसआर फंड वापरला जाणे अत्यावश्यक आहे. किंबहुना जिथे कंपनी तिथेच कंपन्यांचा सीएसआर फंडचा विनियोग होणे अनिवार्य आहे. परंतु ते तसे न होता त्याचा फायदा महानगरपालिका व नगरपालिकांना मिळत नाही. केंद्र सरकारच्या सीएसआरच्या बदलाचा उपयोग महानगरपालिका, नगरपालिकेला कमी होत असताना डेव्हलपमेंट फंड कमी प्रमाणात उपलब्ध होतो. हे आमचे निदर्शनास आले आहे. यासाठी सूट देत असताना महानगरपालिका व नगरपालिका यांना प्राधान्य देण्यात यावे व इन्कमटॅक्स असो किंवा अन्य बाबींसाठी सवलत मिळविण्यासाठी ज्या भागात, शहरात कंपनी तिथेच सीएसआर फंड वापरणे बंधनकारक करावे. यासाठी कायदयामध्ये कायद्यान्वये बदल करून कायदयात तरतूद करण्यासाठी मुख्यसभेने ठराव संमत करून तो पुणे इनकम टॅक्स तसेच राज्य सरकारमार्फत केंद्र सरकारकडे पाठवावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३००, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४३४**

संदर्भ – १) मा.आबा बागुल यांची सूचना दि.९/१/२०१९
२) मनपा ठराव क्र.१४५,दि.११/७/२०१९

–––

सद्यस्थितीत सार्वजनिक वाहतूक सेवा असलेल्या पीएमपी बससेवेची अवस्था नियोजनाचा अभाव, लोकप्रतिनिधींचा अंकुश नाही आणि प्रशासनाचा ढासळत असलेला कारभार यामुळे बिकट झाली आहे. आता तर पीएमपीची तूट दिवसेंदिवस वाढत आहे. पुणे आणि पिंपरी–चिंचवड या दोन्ही महानगरपालिकांना सुमारे अडीचशे ते तीनशे कोटी रूपये तुटीपोटी भुर्दंड पडत आहे. परिणामी विकासकामांवर परिणाम होत आहे. विकासकामे कमी करून पीएमपीला तुटीपोटी मोठी रक्कम यापुढे देता येणार नाही. कारण ही सेवा आता स्वतंत्र प्राधिकरणामार्फत चालविण्याची वेळ आली आहे. जेणेकरून या यंत्रणेवर मुख्यसभेचा अंकुश राहील यादृष्टीने आता दोन्ही महानगरपालिकेसाठी स्वतंत्र प्राधिकरण केल्यास ते उपयुक्त ठरेल. तत्कालीन पीएमटीवेळी पुणे महानगरपालिकेला एक रूपयाही द्यावा लागत नव्हता. त्यावेळी जी प्रवाशांची संख्या होती, तीच संख्या आजमितीस आहे. त्यामुळे स्वतंत्र कंपनी करून काही प्रगती झालेली नाही उलट प्रवाशांना आता मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पूर्वी पीएमटीची सेवा सक्षम होती त्यामुळे सध्या महापालिकेचे उत्पन्नाचे साधन पाहता यापुढे पीएमपीला तुटीपोटी रक्कम देणे शक्य होणार नाही. तसेच या सार्वजनिक वाहतूक असलेल्या बससेवेवर मुख्यसभेमार्फत अंकुश राहण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची शिफारस मुख्यसभा करीत असून राज्यशासनाने त्वरित त्यादृष्टीने निर्णय घ्यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३०१, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४३५**

संदर्भ :– मा.उमेश गायकवाड व मा.दिलीप वेडेपाटील यांची सूचना दि.११/६/२०१९
१) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ–वि–१९१५,दिनांक १८–१२–८५ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.२४६०,दि.१४–१–८६

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारांत घेऊन –

हडपसर औद्योगिक वसाहतीमधील उपलब्ध प्लॉटचे वाटप मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यातील विकसित प्लॉटसचे ११ अर्ज आणि अविकसित प्लॉटसचे १७ अर्ज या दोन्ही ठिकाणच्या व्यक्तींना अगर संस्थांना प्रत्येकी एक प्लॉट मा.महा.आयुक्त यांच्या पत्रात नमूद केलेल्या १ ते ४ अटींवर ९९ वर्षाच्या कराराने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.१०४१, दिनांक २५/३/१९८६ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन

खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ–वि–१९१५,दिनांक १८–१२–८५ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.२४६०,दि.१४–१–८६

३) मनपा ठराव क्र.१२९, दि.११/७/२०१९

––––

हडपसर औद्योगिक वसाहतीमधील उपलब्ध प्लॉटचे वाटप मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यातील विकसित प्लॉटसचे ११ अर्ज आणि अविकसित प्लॉटसचे १७ अर्ज या दोन्ही ठिकाणच्या व्यक्तींना अगर संस्थांना प्रत्येकी एक प्लॉट मा.महा.आयुक्त यांच्या पत्रात नमूद केलेल्या १ ते ४ अटींवर ९९ वर्षाच्या कराराने देण्यात आले होते. परंतु क्र.४ चे कॉन्टीनेन्टल इंजिनिअर्स तर्फे श्री.एस.ई.काशीकर यांच्या नावे लीज गिरीराज मेटॅलॅक्स प्रा.लि.तर्फे श्री.भुपेंद्र रसिकलाल भालाला यांच्या नावे ९९ वर्षाचे लीज करण्यास त्यांनी लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

तरी श्री.एस.ई.काशीकर यांच्या नावे असलेले लीज श्री.गिरीराज मेटॅलॅक्स प्रा.लि.यांच्या नावावर करणेस मान्यता देण्यात यावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३१७, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र. ४३६**

संदर्भ – मा.सुशिल मेंगडे व मा.राजू बराटे यांची सूचना दि.१२/४/२०१८

१) मनपा ठराव क्र.२२, दि. ३०/४/२०१२.

२) नाव समिती (नैमित्तीक समितीची)दि.२९/१०/२०१५ रोजी दुपारी १२=०० ( बारा ) वाजताचे नाव समितीचे निवेदन.

३) मनपा ठराव क्र.६४५, दि. ३०/११/२०१५

४) मा.अशोक येनपुरे व मा.गणेश बिडकर यांची दि. १८/१२/२०१५ ची उपसूचना.

----

मनपा ठराव क्र.२२, दि. ३०/४/२०१२ अन्वये पुणे मनपा हद्दीतील उद्याने, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना नावे देण्यासाठी नेमलेल्या नाव समिती ( नैमित्तीक समितीचे ) दि. २९/१०/२०१५ रोजी दुपारी १२=०० ( बारा ) वाजताचे नाव समितीचे अ.क्र.८३ वगळून निवेदन अवलोकन करून स्विकृत करण्यात येत आहे.

या मान्यतेप्रमाणे नावे देण्यासाठी व जरूर तेथे नाम फलक लावण्याची योग्य ती कार्यवाही मा. महा. आयुक्त यांनी करावी, अशी विनंती आहे.

असा मनपा विषय क्र.७८४, दिनांक २१/१२/२०१७ अनुमोदन नसल्याने वगळण्यात आला असून सदर विषयाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मनपा ठराव क्र.२२, दि. ३०/४/२०१२.

२) नाव समिती ( नैमित्तीक समितीची) दि. २९/१०/२०१५ रोजी दुपारी १२=०० ( बारा ) वाजताचे नाव समितीचे निवेदन.

३) मनपा ठराव क्र.६४५, दि. ३०/११/२०१५

४) मा.अशोक येनपुरे व मा.गणेश बिडकर यांची दि. १८/१२/२०१५ ची उपसूचना.

५) मनपा ठराव क्र.९०७,दि.१४/१२/२०१८

६) मनपा ठराव क्र.१३६, दि.११/७/२०१९

----

मुख्य सभा ठराव क्र.६७१, दि. १८/१२/२०१५ मधील नाव समितीच्या निवेदनातील अ.क्र.७८ मधील नांव वगळून राजमाता जिजाऊ उड्डाणपूल असे नाव देण्यात यावे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३१४, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र. ४३७**

संदर्भः– १) मा.राजेश बराटे व मा.सौ.वृषाली चौधरी यांची सूचना दि.२३/४/२०१८

२) मनपा ठराव क्र.१८७, दि.१९/७/२०१८

३) मनपा ठराव क्र.९१७,दि.१४/१२/२०१८

४) मनपा ठराव क्र.१३८, दि.११/७/२०१९

––––

महाराष्ट्र शासनाने ६ महिन्यापूर्वी महाराष्ट्रातील नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये झालेल्या बेकायदा बांधकामे नियमीत करण्यासाठी जो अध्यादेश काढला आहे. त्या आदेशाप्रमाणे सर्व सामान्य नागरिकाना भरावयास लागणारी दंडाची व मिप्रिमीयमचे अवाढव्य दर भरणे शक्य नाही. त्यामुळे गेले ६ महिन्यात फक्त १० प्रकरणे दाखल झाली आहेत.त्यामुळे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत २ लाखाहून अधिक बांधकामे नियमितीकरणाच्या प्रतिक्षेत आहे. त्या ठरावाद्वारे आम्ही महाराष्ट्र शासनास विनंती करतो की, गुंठेवारी पध्दतीने ही घरे नियमीत करून हया सर्व डेव्हलमेंट चार्जेस व प्रिमीयमचा महानगरपालिकांनी दर कमी करून दिल्यास नागरिकांना दिलासा मिळेल व दंडाद्वारे शेकडो कोटी रूपयांचे उत्पन्न महानगरपालिकेस मिळेल.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३१५, दि. २१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४३८**

संदर्भ – मा. धनराज घोगरे यांची सूचना दि.११/७/२०१९

––––

कै.सन्माननीय मनोहर पर्रीकर यांचे तैल चित्र व त्यांचे नावे बगीचा, छत्रपती शिवाजी महाराज उड्डाण पुलाच्या खाली लुल्लानगर येथे करण्यात यावे. सदर उड्डाण पुलासाठी कै.मनोहर पर्रीकर यांचे फार मोठे योगदान आहे. सदर तैलचित्र व बगीच्यामुळे त्यांच्या स्मृती जागृत राहतील.

तरी पुलाखालील पिलरवर तैलचित्र व पिलरच्या मधील मोकळया जागेत बगीचा तयार करण्यात यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२५०, दि.२१/९/२०२१ चा झाला आहे.)**

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ८/१०/२०२१

**शिवाजी दौंडकर**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना –** कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.